



# शेतकरी

जुलै २०२४ ▪ किंमत ३५ रुपये ▪ पाने ६०

Pune, Shetkari- Vol. 24, Issue 4 - July 2024 - Monthly - Price Rs. 35.00, Pages-60

१९६५ पासून शेतकऱ्यांच्या आवडीचे एकमेव मासिक. श्रमाच्या शेतीला ज्ञानाची जोड देऊन समृद्धीच्या वाटेवर.





# वसंतराव नाईक: हरितक्रांतीचे प्रणेते आणि द्रष्टे राजकारणी

**डॉ. अरविंद सुनंदा संजय तोत्रे,** वरिष्ठ संशोधन सहकारी, कडधान्य सुधार प्रकल्प मफुकृवि, राहुरी
**पुनम सुहास खटावकर,** कृषी उपसंचालक, शेतकरी मासिक, कृषी आयुक्तालय, पुणे

*महाराष्ट्र राज्याच्या विकासाचा पाया मा. यशवंतराव चव्हाण यांनी घातला पण त्यावर कळस चढवण्याचे काम वसंतराव नाईक यांनी केले. वसंतराव नाईक यांचा जन्म 1 जुलै १९१३ रोजी महाराष्ट्राच्या दक्षिण विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील पुसद जवळील गहुली या गावात झाला. यांचे प्राथमिक शिक्षण विविध खेड्यामध्ये झाले. पुढे विठोली व अमरावती येथे माध्यमिक शिक्षण घेऊन नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधून बी.ए. ही पदवी घेतली व नंतर पुढे एल.एल.बी. ही पदवीही मिळवली. त्यांच्या जीवनावर डेल कार्नेगी यांच्या विचारांचा प्रभाव होता. तसेच महाविद्यालयात असताना त्यांची नागपूरमधील प्रख्यात घाटे या कुटुंबाशी ओळख झाली. १९४१ मध्ये त्यांनी वत्सलाताई घाटे यांच्याशी प्रेमविवाह केला. वत्सलाताई पदवीपर्यंत शिकलेल्या होत्या. त्या वसंतरावांच्या बरोबरीने समाजकार्यात सहभागी असत. महिला सक्षमीकरणासाठी महिला संवाद, महिला मेळाव्याच्या माध्यमातून जनजागृती करीत असत. वसंतरावांनी कायद्याची पदवी घेऊन पुसद इथे वकिलीला सुरवात केली. गोरगरिबांचा वकील म्हणून ते ओळखले जाऊ लागले. त्यानंतर ते पुसद कृषी मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. याशिवाय राष्ट्रीय वसतिगृहाचे ते अध्यक्ष झाले. यामुळे त्यांचा सर्वसामान्यांशी जनसंपर्क वाढत गेला. त्यांचे राजकारण तळागाळाच्या लोकांसाठी होते. त्यामुळे राजकारणातील त्यांचा अनुभव त्यांना जबाबदार विधायक बनवत असे.*

*१९५२ ते १९५७ ते मध्यप्रदेश राज्य विधानसभेचे सदस्य होते. १९५६ मध्ये राज्यपुनर्रचनेनंतर विदर्भ व मराठवाडा हे प्रदेश मुंबई द्विभाषिक राज्यात समाविष्ट झाल्यानंतर वसंतराव यशवंतरावांच्या मंत्रिमंडळात कृषिमंत्री झाले. १९५७ मध्ये इंडिया कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चर सोसायटीचे सदस्य झाले. १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर ते स्वतंत्र महाराष्ट्र राज्यचे प्रथम महसूल मंत्री होते. १९६२ च्या निवडणुकीनंतरही कन्नमवारांच्या मंत्रिमंडळात ते महसूल मंत्री होते, पण कन्नमवारांच्या मृत्यूनंतर वसंतराव फुलसिंग नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. १९६३ ते १९७५ दरम्यान त्यांनी सतत अकरा वर्ष सर्वात जास्त काळ मुख्यमंत्री म्हणून काम केले आहे. त्यांना महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे जनक मानले जाते. महाराष्ट्राचे औद्योगिकीकरण प्रामुख्याने त्यांच्या प्रगतशील औद्योगिक धोरणांचा वारसा आहे. वसंतराव नाईक यांची मुख्यमंत्री म्हणून एक तपाची कारकीर्द गतिमान विकास यासाठी उल्लेखनीय ठरली. दोन युद्धे, तीन मोठे राज्यव्यापी दुष्काळ यांसारख्या संकटाना तोड देत त्यांनी शेतीचा अमूलाग्र विकास करून महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केला. म्हणूनच त्यांना हरितक्रांतीचे प्रणेते मानले जाते.*

**(पान १९ वर)**

# अनुक्रमणिका

## शेतकरी जुलै २०२४


- वसंतराव नाईक : हरितक्रांतीचे प्रणेते आणि द्रष्टे राजकारणी ................. *डॉ. अरविंद सुनंदा संजय तोत्रे* ................ ०२
- संपादकीय ................ ०४
- मा. कृषीमंत्री यांचे आवाहन ................ ०५
- मा. आयुक्त कृषी यांचे मनोगत ................ ०६

### विस्तार व प्रशिक्षण योजना

- अन्न आणि पोषण सुरक्षा : अन्नधान्य पिके (FNS) ................ ०७
- राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन आणि इतर गळीतधान्य उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना ................ १४
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान– व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम ................ १६
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान– व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम ................ १६
- राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस पिकाची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना ................ १७
- वसंतराव नाईक : हरितक्रांतीचे प्रणेते आणि द्रष्टे राजकारणी ................ १९
- प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY) ................ २१
- मृग बहारातील फळपिकांसाठी विमा योजना ................ २३
- पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना ................ २५
- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना ................ २९
- बिरसा मुंडा कृषी क्रांति योजना ................ ३१
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ................ ३३
- राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना : अन्नधान्य, कडधान्य, व गळीतधान्य पिके ................ ३५

### फलोत्पादन योजना

- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH) ................ ३६
- भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना ................ ४१
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम ................ ४२
- महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी काजू फळपिक विकास योजना ................ ४४
- डाळिंब पिकासाठी अ‍ॅन्टी हेलनेट कव्हर (गारा विरोधक जाळी) तंत्रज्ञान ................ ४६
- राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत संरक्षित शेती घटकांतर्गत द्राक्ष पिकासाठी प्लास्टिक कव्हर तंत्रज्ञान ................ ४८

### मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र योजना

- मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना – वैयक्तिक शेततळे ................ ५०
- राष्ट्रीय कृषी विकास योजना – प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन योजना) ................ ५१

### निविष्ठा व गुणनियंत्रण विभाग योजना

- कृषी यांत्रिकीकरण ................ ५५
- शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा अंदाज अहवाल– बाजार माहिती विश्लेषण व जोखिम निवारण कक्ष, स्मार्ट प्रकल्प ................ ५६

# शेतकरी

■ अंक ४ था ■ वर्ष ५९ वे

**१९६५ पासून शेतकऱ्यांच्या आवडीचे एकमेव मासिक.**
**श्रमाच्या शेतीला ज्ञानाची जोड देऊन समृद्धीच्या वाटेवर...**

- **प्रमुख मार्गदर्शक**
  श्री. रविंद्र बिनवडे, आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य
- **प्रकाशक**
  श्री. सुनील बोरकर,
  कृषी सहसंचालक (विस्तार व प्रशिक्षण)
- **तांत्रिक मार्गदर्शन**
  श्री. विनयकुमार आवटे, कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
- **संपादक :**
  श्रीमती पुनम खटावकर- परब, कृषी उपसंचालक, शेतकरी मासिक
- **सहाय्यक संपादक :**
  कु. पूजा खुशालचंद गायकवाड, कृषी अधिकारी
- **जाहिरात प्रसिद्धी व वर्गणीदार नोंदणी** : सौ. गीता खिस्ती
- **मांडणी व सजावट** : मिडीया व्हीजन, पुणे
- **मुद्रण** : आनंद पब्लिकेशन, एनएच ६, मुसळीफाटा, जळगाव
- **संपर्क कार्यालये**
  जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक, आत्मा
  उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी,
  तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी
- **कृषी विभागाचे संकेतस्थळ** : www.krishi.maharashtra.gov.in
- **महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ** : www.maharashtra.gov.in
- **केंद्र शासन कृषी व सहकार विभाग संकेतस्थळ** : www.agricoop.nic.in
- **शेतकरी मासिक ई-मेल** : agrishetkari@gmail.com
- कृषी विभागाच्या वेबसाईटवर 'शेतकरी कॉर्नर (कट्टा)' या शीर्षकाखाली शेतकरी मासिक दरमहा वाचनास उपलब्ध आहे.
- **किसान कॉल सेंटर टोल फ्री दूरध्वनी** : १८००-१८०१५५१
- **कृषी विभाग टोल फ्री दूरध्वनी** : १८००-२३३४०००
- **वार्षिक वर्गणी** : रु. ४००/- आणि **द्विवार्षिक वर्गणी** : रु. ८००/-
- **पत्रव्यवहार व वर्गणीसाठी पत्ता** :
  संपादक, शेतकरी मासिक, समिती सभागृह, दुसरा मजला,
  साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५
- **वर्गणीदारांसाठी निवेदन** : शेतकरी मासिक वर्गणी आता ऑनलाईन पद्धतीने gras.mahakosh.gov.in या कार्यप्रणालीद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. माहितीसाठी ०२०-२५५३७३३१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, जाहिरात व अन्य कोणत्याही मजकुराशी कृषी विभाग सहमत असेलच असे नाही. अंकातील काही छायाचित्रे प्रातिनिधीक स्वरूपाची आहेत.**


## संपादकीय

शेतकरी बंधू व भगिनींना माझा नमस्कार,

तुम्हाला आठवत असेल की मागील वर्षी याच महिन्यात आपण निरनिराळ्या कृषी योजनांची तपशीलवार माहिती देणारा विशेषांक प्रकाशित केला होता. त्या अंकाचे मोठ्या प्रमाणात स्वागत झाले होते. शेतकरी बांधवांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादामुळे यावर्षी देखील योजना विशेषांक प्रसिद्ध करीत आहोत. मॉन्सून आता सर्वदुर पसरलेला आहे आणि या वर्षीही शेतकरी बांधवांना उपयुक्त ठरणाऱ्या व शासकीय अनुदान असणाऱ्या विविध विकासोपयोगी कृषी योजनांची सविस्तर माहिती या अंकात आम्ही समाविष्ट केलेली आहे.

विविध यंत्रे, बी-बियाणे, खते, नवीन फळबागांची लागवड, शेतात विहिरी पाडणे, सिंचनाची साधने या आणि अशा अनेक बाबींसाठी शासनातर्फे मिळणाऱ्या सर्व अनुदान योजना तुम्ही या अंकात वाचू शकणार आहात. योग्य तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ, उत्तम यंत्रे आणि आर्थिक पाठबळ यांचा योग्य संगम झाला तर भारतात नवी कृषी क्रांती घडण्यास वेळ लागणार नाही.

महाराष्ट्रात हरितक्रांती घडवून आणणारे व राज्याला अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी बनवणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै रोजी साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाच्या सर्व शेतकरी बंधू भगिनींना शुभेच्छा. येणारा खरीप हंगाम सर्वांना चांगला जावो, अन्नधान्यांची कोठारे भरून जावो आणि जगासाठी सतत राबणारा बळीराजा संतुष्ट होवो, याच शुभेच्छासह.....

धन्यवाद.



**पुनम खटावकर- परब**



**मंत्री, कृषी**
**महाराष्ट्र राज्य**

# आवाहन

सर्व शेतकरी बंधू भगिनींनो नमस्कार...

आपला भारत देश हा कृषी प्रधान देश आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे देशाच्या शेती अर्थकारणात मोलाचे योगदान आहे. या शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन हरितक्रांतीला महाराष्ट्रात रुजवणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय मा. वसंतराव नाईक यांची जयंती १ जुलै आपण शेतकऱ्यांच्या व शेतीच्या गौरवार्थ कृषी दिन म्हणून साजरी केली. या औचीत्याने मी सर्व शेतकरी बंधू भगिनींचे अभिनंदन करू इच्छितो.

हे शासन माननीय मुख्यमंत्री मा. श्री. एकनाथरावजी शिंदे, माननीय उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस व मा. श्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कार्यरत आहे. आपल्या महाराष्ट्रातील खरीप हंगामातील प्रमुख पिकांकरिता आवश्यक निविष्ठा जसे की खते, बियाणे, पीक संरक्षक औषधे इ. चा पुरवठा सुरळीत होण्याकरिता कृषी विभागामार्फत नियोजन करण्यात आले आहे. मात्र साठेबाजी किंवा लिंकिंग अथवा चढ्या भावाने विक्री होत असल्यास तशी तक्रार शेतकऱ्यांनी व्हाट्सअप द्वारे ९८२२४४६६५५ या क्रमांकावर करावी असे आवाहन मी आपल्याला करतो. यावर्षी पावसाचे आगमन वेळेवर आणि जोमात झाले आहे. याचा आपल्या शेती पिकांना नक्कीच फायदा होईल. परंतु हवामानातील अनिश्चिततेपासून आपल्या पिकांना संरक्षण देण्याकरिता सर्व शेतकरी बंधूंनी पीक विमा योजनेत मोठ्या प्रमाणात सहभागी झाले पाहिजे. चालू वर्षीही आपण प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना एक रुपया विमा हफ्त्यामध्ये त्यांच्या पिकांना विमा संरक्षण देणार आहोत. हवामानाच्या लहरीपणामुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी पिक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असेही आवाहन मी याप्रसंगी करीत आहे. अपघाताच्या परिस्थितीमध्ये शेतकरी कुटुंबाला तात्काळ दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून आपल्या कृषी विभागाकडून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेच्या माध्यमातून प्रकरणांचा जलद गतीने निपटारा केला जात आहे.

महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत शेतकरी हितार्थ राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती या मासिकात प्रसिद्ध करण्यात येत आहे. या योजना विशेषांकाच्या माध्यमातून आपणास उपयुक्त असलेल्या कृषी योजनांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा व आपल्या पीक पद्धतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरून पिकांचे नियोजन केल्यास तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेतल्यास कृषी क्षेत्राचा विकास नक्कीच गगनभरारी घेईल याची मला खात्री आहे.

सर्व शेतकरी बंधूंना खरीप हंगामाच्या मनपूर्वक शुभेच्छा....

**आपला स्नेहांकित**

**धनंजय मुंडे**
कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य.



आयुक्त कृषी

महाराष्ट्र राज्य

# मनोगत

शेतकरी बंधू आणि भगिनींनो,

नमस्कार !

माझी नुकतीच कृषी आयुक्तपदी नियुक्ती झाली असून दि. २६ जून २०२४ रोजी मी कृषी आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकृत केला आहे. राज्याचा शेतकरी हा काळ्या मातीत राबणारा अन्नदाता आहे. तो ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कृषी आयुक्त म्हणून त्याची सेवा करण्याची संधी मला मिळत असून याक्षणी मी खूप उत्साही व आनंदी आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी मी प्रयत्नशील राहीन.

शेतकरी मासिकाचा जुलै २०२४ महिन्याचा अंक योजना विशेषांक म्हणून आपल्याकडे सोपविताना अत्यंत आनंद होत आहे. यावर्षी देशात समाधानकारक मान्सूनचा अंदाज वर्तविण्यात आला आहे व त्यानुसार पर्जन्यराजाचे आगमन देखील महाराष्ट्राच्या बहुतांश भागात झालेले आहे. २८ जून अखेर ७८ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरण्या देखील पूर्ण झालेल्या आहेत. महाराष्ट्रात खरीप हंगामात भात, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन व कापूस ही प्रमुख पिके घेतली जातात. खरीप हंगाम २०२४ मध्ये खरीप पिकांचे १४२.३८ लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली अपेक्षित आहे. खरीपाच्या काळात शेतकऱ्यांना बियाणे, खते व अन्य कृषी निविष्ठांचा तुटवडा भासू नये यासाठी कृषी विभागाने परिपूर्ण नियोजन केलेले आहे. मात्र साठेबाजी किंवा लिंकिंग होत असल्यास तशी तक्रार शेतकऱ्यांनी व्हॉट्सॅपद्वारे करावी, असे आवाहन मी आपल्याला करतो. तक्रार नोंदविण्यासाठी फोन नंबर तसेच इमेल या अंकात दिलेले आहेत.

शेतकरी मासिकाच्या योजना विशेषांकात आपण केंद्र व राज्य सरकारच्या समन्वयाने राबविण्यात येणाऱ्या निरनिराळ्या शासकीय कृषी योजनांची सविस्तर माहिती घेणार आहोत. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (FNS), राष्ट्रीय कृषी विकास योजना, फलोत्पादन विषयक विविध योजना, निविष्ठा व गुण नियंत्रण विषयक योजना इत्यादीची सविस्तर माहिती आपल्याकरिता दिली आहे.

आपण अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्ण झालो असलो तरी अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता हे राज्याचे एकमेव उद्दीष्ट नसून शेतकऱ्यांना उपलब्ध संसाधनांचा परिपूर्ण वापर करुन अधिकाधिक आर्थिक फायदा मिळवून देणे नितांत गरजेचे आहे. यासाठी व्यापारक्षम शेतीची कास धरावी लागेल. मुक्त आर्थिक व्यवस्था व जागतिक व्यापार व्यवस्थेचा फायदा करुन घेण्याच्या दृष्टिने फलोत्पादन क्षेत्रात उत्पादन वाढ, निर्यातवृध्दी व प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. अशाप्रकारे शेतीव्यवसायातून स्वयंपूर्णतेबरोबरच आर्थिक उन्नती साधणे व जागतिक शेतमालाच्या बाजारपेठेत महत्वाचे स्थान मिळविणे या निर्धाराने कृषी विभागाची वाटचाल सुरु आहे. महाराष्ट्र शासन राबवत असलेल्या अशा अनेक महत्वाकांक्षी योजना हा या धोरणाचाच भाग आहे. पिक विमा हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. हवामानाच्या लहरीपणामुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी पिक विमा योजनांमध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन मी याप्रसंगी करीत आहे. त्याचप्रमाणे इतरही कृषी योजनांचा लाभ शेतकरी बंधू भगिनी घेतील याची खात्री आहे.

आधुनिक कृषीतंत्रज्ञानाच्या वापरासाठी शेतकरी हा केंद्रबिंदू मानून आवश्यक त्या सर्व संसाधनांचा, योजनांचा योग्य वापर करण्याच्या दृष्टिने मार्गदर्शन करणारी सर्व माहिती एकत्रितपणे वाचता यावी या हेतूने विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले आहे. आपणा सर्वांना हा अंक नक्की आवडेल याची खात्री आहे. महाराष्ट्राला अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनवणारे माजी मुख्यमंत्री कै. श्री. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त एक जुलै रोजी साजरा होणाऱ्या कृषी दिनाच्या आपल्या सर्वांना शुभेच्छा.

धन्यवाद!

आपला स्नेहांकित

Ravi

रविंद्र बिनवडे भाप्रसे

# अन्न आणि पोषण सुरक्षा : अन्नधान्य पिके (FNS)

सन २००७-०८ पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान भात, गहू व कडधान्य या पिकांसाठी राबविण्यात येत आहे. सन २०१४-१५ पासुन सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार अभियानात भरडधान्य पिकाचा समावेश करण्यात आला आहे. सन २०१८-१९ पासून या अभियानात पौष्टिक तृणधान्य पिकांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानासाठी निधीची तरतूद केंद्र व राज्य ६० : ४० या प्रमाणात आहे.

**समाविष्ट पिके :** भात, गहू, कडधान्य, भरडधान्य (मका) व पौष्टिक तृणधान्य (ज्वारी, बाजरी, नागली, वरई इ.)

**योजनेचा उद्देश :**

- क्षेत्र विस्तार व उत्पादकतेमध्ये वाढ करून शेतकऱ्यांच्या उत्पादनात शाश्वत वाढ करणे.
- जमिनीची सुपीकता व उत्पादन क्षमता वाढविणे.
- शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे.

**लाभार्थी पात्रतेचे निकष**

- सर्व घटकातील महिलांना एकूण कार्यक्रमाच्या ३० टक्के लाभ देणे आवश्यक.
- अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एकूण कार्यक्रमाच्या १६.६ टक्के लाभ देणे आवश्यक.
- अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एकूण कार्यक्रमाच्या ८.६ टक्के लाभ देणे आवश्यक.
- शेतकऱ्यांची सोडत पद्धतीने लाभासाठी निवड.

**योजनेची अंमलबजावणी –** कार्यक्रमामध्ये खालील बाबी राबविल्या जातात.

१. पीक प्रात्यक्षिके – पीक प्रात्यक्षिके, पीक पद्धतीवर आधारित प्रात्यक्षिके, आंतरपिक प्रात्यक्षिके इ. (महाडीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी)
२. प्रमाणित बियाणे वितरण (महाडीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी)
३. प्रमाणित बियाणे उत्पादनास अर्थसहाय्य
४. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन व एकात्मिक कीड व्यवस्थापन
५. सिंचन साधने सुविधा (महाडीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी )
६. पीक पध्दतीवर आधारित प्रशिक्षण
७. स्थानिक पुढाकाराच्या बाबी.
८. जिल्हास्तरीय प्रदर्शन इ.

**योजनेची व्याप्ती :**

| अ.क्र | पीक | समाविष्ट जिल्हे | |
|---|---|---|---|
| | | संख्या | जिल्ह्यांची नावे |
| १ | भात | ८ | नाशिक, पुणे, सातारा, नागपुर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली. |
| २ | गहू | ३ | बीड, सोलापूर, नागपूर |
| ३ | कडधान्य | ३४ | सर्व जिल्हे |
| ४ | भरडधान्य (मका) | १४ | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, छ. संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव आणि बुलढाणा |
| ५ | पौष्टिक तृणधान्य | ३१ | ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छ. संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ६ | भात पड क्षेत्रावर कडधान्य उत्पादन वाढविणे कार्यक्रम (TRFA Pulses ) | १७ | ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नंदुरबार, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नागपुर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |






**घटकनिहाय आर्थिक मापदंड –** योजनेची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे,

- अन्न आणि पोषण सुरक्षा भात – नाशिक, पुणे, सातारा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली (८ जिल्हे)

| अ. क्र | बाब/घटक | अनुदान दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **अ) पीक प्रात्यक्षिके** | | | |
| १ | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ९०००/– प्रति हेक्टर | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषी विद्यापीठाच्या सल्यानुसार जिल्हा/तालुकानिहाय व पीकनिहाय निर्धारित तंत्रज्ञान पॅकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी, रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे. यासाठी अनुदान देय नाही. |
| २ | पीक पद्धतीवर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. १५०००/– प्रति हेक्टर | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषी विद्यापीठाच्या सल्यानुसार जिल्हा/तालुका निहाय व पीक निहाय निर्धारित तंत्रज्ञान पॅकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी, रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे. यासाठी अनुदान देय नाही. |
| **ब) प्रमाणित बियाणे वितरण** | | | |
| १ | अधिक उत्पादन देणारे सुधारित वाण (१० वर्षाच्या आतील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. २०००/– प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे. |
| २ | अधिक उत्पादन देणारे सुधारित वाण (१० वर्षाच्या वरील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १०००/– प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाचे वरील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे. |
| **क–१) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| १ | सूक्ष्म मुलद्रव्ये | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. डीबीटी कार्यप्रणाली लागू |
| **क–२) एकात्मिक कीड व्यवस्थापन (आय.पी.एम.)** | | | |
| १ | पीक संरक्षण औषधे व जैविक घटक | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. डीबीटी कार्यप्रणाली लागू |
| २ | तणनाशके | | |
| **ड) फ्लेक्झी फंड** | | | |
| **१** | **प्रभावी सिंचन साधने** | | |
| i) | पंपसंच | अनुदान मर्यादा कृषी अभियांत्रिकी उप अभियान प्रमाणे राहील. | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १००००/प्रति पंपसंच याप्रमाणे अजा/अज/ अल्प व अत्यल्प भूधारक/ महिला लाभार्थ्यांसाठी, किंमतीच्या ४० टक्के किंवा उच्चतम रु. ८०००/ प्रति पंपसंच याप्रमाणे सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी. डीबीटी कार्यप्रणाली लागू. |
| ii) | सिंचन सुविधेकरीता – पाईप | HDPE- किंमतीच्या ५० टक्के रु. ५०/– प्रति मीटर मर्यादेत, PVC- किंमतीच्या ५० टक्के रु. ३५/– प्रति मीटर मर्यादेत, HDPE laminated woven lay flat tubes- किंमतीच्या ५० टक्के रु. २०/– प्रति मीटर मर्यादेत | एका शेतकऱ्याला रु.१५०००/– मर्यादेतच अनुदान देय राहील |
| **२** | **शेतकरी प्रशिक्षण** | एकूण १४०००/– प्रति प्रशिक्षण | ३० शेतकऱ्यांसाठी (पीक पद्धतीवर आधारित प्रशिक्षण ) |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **स्थानिक पुढाकाराच्या बाबी** | | |
| i) | FPO करिता गोदाम बांधकाम (२५० मे. टन क्षमता) | खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १२.५० लाख प्रति पैकी किमान अनुदान अनुज्ञेय राहील. | शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतकरी गट यांना अनुदान अनुज्ञेय राहील |
| ii) | स्थानिक वाणाची लागवड प्रात्यक्षिके | ५० टक्के अनुदानावर उच्चतम मर्यादा रु. ४५०० प्रति हेक्टर | स्थानिक वाण जे त्यांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे प्रसिद्ध आहेत व त्यांना चांगला बाजारभाव मिळतो अशा वाणांची प्रात्यक्षिके कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्राच्या सहाय्याने राबविणे. प्रात्यक्षिके, प्राथमिक प्रक्रिया व पॅकिंग इ. बाबत वि.कृ.स.सं. यांचे स्तरावर तंत्रज्ञान पॅकेज निश्चित करण्यात यावे. |

**● अन्न आणि पोषण सुरक्षा गहू – सोलापूर, बीड, नागपूर (३ जिल्हे)**

| **अ.क्र** | **बाब/घटक** | **अनुदान दर** | **अनुदान पात्रतेचे निकष** |
|---|---|---|---|
| **अ) पीक प्रात्यक्षिके** | | | |
| १ | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ९०००/– प्रति हेक्टर | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषी विद्यापीठाच्या सल्लृयानुसार जिल्हा/तालुका निहाय व पीक निहाय निर्धारित तंत्रज्ञान पँकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी, रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे यासाठी अनुदान देय नाही. |
| २ | पीक पद्धतीवर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. १५०००/– प्रति हेक्टर | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषी विद्यापीठाच्या सल्ल्यानुसार जिल्हा/तालुका निहाय व पीक निहाय निर्धारित तंत्रज्ञान पॅकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे. यासाठी अनुदान देय नाही. |
| **ब) प्रमाणित बियाणे वितरण** | | | |
| १ | अधिक उत्पादन देणारे सुधारित वाण (१० वर्षाच्या आतील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. २०००/– प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे. |
| २ | अधिक उत्पादन देणारे सुधारित वाण (१० वर्षाच्या वरील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १०००/– प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाचे वरील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे. |
| **क–१ ) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| १ | सूक्ष्म मुलद्रव्ये | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/– प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. DBT कार्यप्रणाली लागू. |
| **क–२) एकात्मिक कीड व्यवस्थापन (आय.पी.एम.)** | | | |
| १ | पीक संरक्षण औषधे व जैविक घटक | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/– प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. DBT कार्यप्रणाली लागू. |
| २ | तणनाशके | | |
| **ड) फ्लेक्झी फंड** | | | |
| १ | **प्रभावी सिंचन साधने –** | | |
| i) | पंपसंच | अनुदान मर्यादा कृषी अभियांत्रिकी उप अभियान प्रमाणे राहील | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १००००/– प्रति पंपसंच याप्रमाणे अजा/अज/ अल्प व अत्यल्प भूधारक/ महिला लाभार्थ्यांसाठी, किंमतीच्या ४० टक्के किंवा उच्चतम रु. ८०००/– प्रति पंपसंच याप्रमाणे सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी. MahaDBT कार्यप्रणाली लागू. |

| | | | |
|---|---|---|---|
| ii) | सिंचन सुविधेकरिता – पाईप | HDPE- किंमतीच्या ५० टक्के रु. ५०/– प्रति मीटर मर्यादेत, PVC- किंमतीच्या ५० टक्के रु. ३५/– प्रति मीटर मर्यादेत, HDPE laminated woven lay flat tubes- किंमतीच्या ५० टक्के रु.२०/– प्रति मीटर मर्यादेत | एका शेतकऱ्याला रु. १५०००/– मर्यादेतच अनुदान देय राहील. |
| २ | **शेतकरी प्रशिक्षण** | एकूण १४०००/– प्रति प्रशिक्षण | ३० शेतकऱ्यासाठी (पीक पद्धतीवर आधारित प्रशिक्षण ) |
| ३ | **स्थानिक पुढाकाराच्या बाबी** | | |
| i) | FPO करिता गोदाम बांधकाम (२५० मे. टन क्षमता) | खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १२.५० लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतकरी गट यांना अनुदान अनुज्ञेय राहील. |

- **अन्न आणि पोषण सुरक्षा कडधान्य – सर्व जिल्हे**

| अ.क्र | बाब/घटक | अनुदान दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **अ) पीक प्रात्यक्षिके** | | | |
| १ | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ९०००/– प्रति हेक्टर | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषी विद्यापीठाच्या सल्ल्यानुसार जिल्हा/तालुका निहाय व पीक निहाय निर्धारित तंत्रज्ञान पँकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी, रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे यासाठी अनुदान देय नाही. |
| २ | आंतरपीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ९०००/– प्रति हेक्टर | |
| ३ | पीक पद्धतीवर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. १५०००/– प्रति हेक्टर | |
| **ब) प्रमाणित बियाणे वितरण व उत्पादन** | | | |
| १ | अधिक उत्पादन देणारे सुधारित वाण (१० वर्षाच्या आतील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ५०००/– प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| २ | अधिक उत्पादन देणारे सुधारित वाण (१० वर्षाच्या वरील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. २५००/– प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाचे वरील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| ३ | प्रमाणित बियाणे उत्पादनास अर्थसहाय्य – (१० वर्षाच्या आतील बियाणे) | रु. ५०००/– प्रति क्विंटल | (महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या मुक्तता अहवालानुसार) उत्पादनाच्या समप्रमाणात मागील १० वर्षाचे आतील व राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे राज्यात उत्पादित प्रमाणित बियाणे, निधी उपलब्धतेच्या मर्यादेत. |
| **क-१) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| १ | सूक्ष्म मुलद्रव्ये | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/– प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. DBT कार्यप्रणाली लागू |
| २ | जैविक खते | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ३००/– प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. DBT कार्यप्रणाली लागू |

| | | | |
|---|---|---|---|
| **क-२ ) एकात्मिक कीड व्यवस्थापन (आय.पी.एम.)** | | | |
| १ | पीक संरक्षण औषधे व जैविक घटक | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/- प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. DBT कार्यप्रणाली लागू |
| २ | तणनाशके | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/- प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. DBT कार्यप्रणाली लागू |
| **ड ) फ्लेक्झी फंड** | | | |
| १ | **प्रभावी सिंचन साधने -** | | |
| i) | सिंचन सुविधेकरिता - पाईप | HDPE- किंमतीच्या ५० टक्के रु. ५०/- प्रति मीटर मर्यादेत, PVC- किंमतीच्या ५० टक्के रु. ३५/- प्रति मीटर मर्यादेत, HDPE laminated woven lay flat tubes- किंमतीच्या ५० टक्के रु. २०/- प्रति मीटर मर्यादेत | एका शेतकऱ्याला रु.१५०००/- मर्यादेतच अनुदान देय राहील |
| ii) | पंपसंच | अनुदान मर्यादा कृषी अभियांत्रिकी उपअभियान प्रमाणे राहील | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १००००/- प्रति पंपसंच याप्रमाणे अजा/अज/ अल्प व अत्यल्प भूधारक/ महिला लाभार्थ्यांसाठी, किंमतीच्या ४० टक्के किंवा उच्चतम रु ८०००/- प्रति पंपसंच याप्रमाणे सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी. MahaDBT कार्यप्रणाली लागू. |
| २ | **शेतकरी प्रशिक्षण** | एकूण १४०००/- प्रति प्रशिक्षण | ३० शेतकऱ्यासाठी (पीक पद्धतीवर आधारित प्रशिक्षण ) |
| ३ | स्थानिक पुढाकाराच्या बाबी | | |
| i) | FPO करिता गोदाम बांधकाम (२५० मे. टन क्षमता) | खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १२.५० लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतकरी गट यांना अनुदान अनुज्ञेय राहील |
| ii) | FPO करीता बीज प्रक्रिया संच | खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १०.०० लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | DBT कार्यप्रणाली लागू |
| iii) | स्थानिक वाणाची लागवड प्रात्यक्षिके | ५० टक्के अनुदानावर उच्चतम मर्यादा रु. ७५००/- प्रति हेक्टर | स्थानिक वाण जे त्यांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे प्रसिद्ध आहेत व त्यांना चांगला बाजार भाव मिळतो अशा वाणांची प्रात्यक्षिके कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्राच्या सहाय्याने राबविणे. प्रात्यक्षिके, प्राथमिक प्रक्रिया व पॅकिंग इ. बाबत वि.कृ.स.सं. यांचेस्तरावर तंत्रज्ञान पॅकेज निश्चित करण्यात यावे. |
| iv) | बीज प्रक्रिया मोहीम | रु. ४०० प्रति कार्यक्रम/ प्रात्यक्षिक | -- |
| v) | वैयक्तिक तसेच शेतकरी गटासाठी बीज प्रक्रिया ड्रम (मनुष्यचलित) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ८०००/- यापैकी जे कमी असेल ते कृषी यांत्रिकीकरण उपअभियान प्रमाणे | अ.ज /अ.जा./ महिला / अल्प व अत्यल्प भूधारक इतर शेतकरी पात्र |
| ४ | **प्रकल्प व्यवस्थापन चमू** | राज्यस्तर व जिल्हास्तर | १ तंत्र सल्लागार व २- तंत्र सहाय्यक प्रति चमू |

● **अन्न आणि पोषण सुरक्षा भरडधान्य (मका) - (एकूण १४ जिल्हे)**

| अ.क्र | बाब/घटक | अनुदान दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **अ) पीक प्रात्यक्षिके** | | | |
| १ | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ६०००/- प्रति हेक्टर | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर कृषी विद्यापीठाच्या सल्यानुसार जिल्हा/तालुकानिहाय व पीकनिहाय निर्धारित तंत्रज्ञान पॅकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे. यासाठी अनुदान देय नाही. |
| २ | आंतरपीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ६०००/- प्रति हेक्टर | |
| **ब) प्रमाणित बियाणे वितरण** | | | |
| १ | अधिक उत्पादन देणारे सुधारित वाण (१० वर्षाच्या आतील) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ३०००/- प्रति क्विंटल मर्यादेत | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाआतील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे. |
| २ | अधिक उत्पादन देणारे सुधारित वाण (१० वर्षाच्या वरील) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १५००/- प्रति क्विंटल मर्यादेत | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षावरील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे. |
| ३ | संकरीत बियाणे वितरण (१० वर्षाच्या आतील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १००००/- प्रति क्विंटल मर्यादेत | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाआतील अधिसूचित व राज्यासाठी शिफारस केलेल्या संकरीत वाणांचे प्रमाणित बियाणे. |
| **क-१) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| १ | सूक्ष्म मुलद्रव्ये | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. |
| २ | जैविक खते | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ३००/- प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. |
| **क-२) एकात्मिक कीड व्यवस्थापन (आय.पी.एम.)** | | | |
| १ | तणनाशके | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/- प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. |
| २ | पीक संरक्षण औषधे व जैविक घटक | | |
| ड | **शेतकरी प्रशिक्षण** | एकूण रु. १४०००/- प्रति प्रशिक्षण | ३० शेतकऱ्यासाठी (पीक पद्धतीवर आधारित प्रशिक्षण) |

● **अन्न आणि पोषण सुरक्षा : पौष्टीक तृणधान्य (न्युट्री सिरीयल) - ज्वारी, बाजरी, नाचणी व वरई : (सिंधुदुर्ग, नागपूर व भंडारा वगळून उर्वरीत ३१ जिल्हे)**

| अ.क्र | बाब/घटक | अनुदान दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **अ) पीक प्रात्यक्षिके** | | | |
| १ | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ६०००/- प्रति हेक्टर | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषी विद्यापीठाच्या सल्यानुसार जिल्हा/तालुका निहाय व पीक निहाय निर्धारित तंत्रज्ञान पॅकेजनुसार अंमलबजावणीसाठी. रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे यासाठी अनुदान देय नाही. |
| **ब) प्रमाणित बियाणे वितरण** | | | |
| १ | अधिक उत्पादन देणारे सुधारीत वाण (१० वर्षाच्या आतील वाण) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ३०००/- प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाचे आतील अधिसूचित व राज्यासाठी शिफारस केलेल्या सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे. |
| २ | अधिक उत्पादन देणारे सुधारीत वाण (१० वर्षाच्या वरील वाण) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १५००/- प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | शासकीय बियाणे पुरवठादार संस्था यांच्याकडील मागील १० वर्षाचे वरील अधिसूचित व राज्यासाठी शिफारस केलेल्या सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **क) प्रमाणित बियाणे उत्पादन** | | | |
| १ | सुधारित बियाणे (१० वर्षाच्या आतील वाण) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. ३०००/- प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | (महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या मुक्तता अहवालानुसार) उत्पादनाच्या समप्रमाणात मागील १० वर्षाचे आतील अधिसूचित व राज्यासाठी शिफारस केलेल्या सुधारित वाणांचे राज्यात उत्पादित प्रमाणित बियाणे उपलब्ध निधीच्या मर्यादेत. |
| **ड-१) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| १ | सूक्ष्म मुलद्रव्ये | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/- प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. |
| २ | जैविक खते | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ३००/- प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. |
| **ड-२) एकात्मिक कीड व्यवस्थापन (आय.पी.एम.)** | | | |
| १ | तणनाशके | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५००/- प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषी विद्यापीठांच्या शिफारसीनुसार. |
| २ | पीक संरक्षण औषधे व जैविक घटक | | |
| | | | |
| **इ - फ्लेक्झी फंड** | | | |
| **स्थानिक पुढाकाराच्या बाबी** | | | |
| १ | सर्व प्रकारचे ग्राइंडर/ पल्व्हरायझर/पॉलिशर (सर्व प्रकारच्या अन्नधान्यासाठी) | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ६००००/- प्रति नग याप्रमाणे अजा/अज/ अल्प व अत्यल्प भूधारक/ महिला लाभार्थ्यांसाठी, किंमतीच्या ४० टक्के किंवा उच्चतम रु. ५००००/- प्रति नग याप्रमाणे सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी. | MahaDBT कार्यप्रणाली लागू राहील. |
| २) | शेतकरी प्रशिक्षण | एकूण रु. १४०००/- प्रति प्रशिक्षण | ३० शेतकऱ्यासाठी (पीक पद्धतीवर आधारित प्रशिक्षण ) |
| ३) | जनजागृती / प्रचार प्रसिद्धी | | |
| ४ | जिल्हास्तरीय महोत्सव | रु. ४ लाख/जिल्हा | जिल्हास्तरीय महोत्सव आयोजनासाठी |





सपना कन्नाके
कृषी सहाय्यक तालुका कृषी अधिकारी, कुरखेडा, जि. गडचिरोली


*शेतकरी दादा रे शेतकरी दादा*
*मिरूग संपला आता तयारीला लागा*
*पेरणीपूर्वी करा तुम्ही बीजप्रक्रिया*
*रोगमुक्त शेतीचा होवूनी धागा*

*बुरशीजन्य रोगासा उपाय भारी*
*बीजप्रक्रिया घरच्या घरी*
*बियाणे खरेदीचा वाचवूनी खर्च*
*शुद्ध बियाणे मिळकत बरी*

*रोपांची लागवड सुटसुटीत करा*
*हवा, पाणी, प्रकाश खेळते ठेवा*
*संतुलित खतांचा करूनी वापर*
*फवारणी करा गरज वाटेल तेव्हा*

*निंबाळी, दशपर्णी, जीवामृत*
*रसायनांना पर्याय असे*
*पिकासाठी हेच खरे अमृत*
*विषमुक्त शेतीचे भविष्य वसे.*

# राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन आणि इतर गळीतधान्य उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना



### योजनेचा उद्देश

१. सोयाबीन व इतर गळीतधान्य आधारित पीक पध्दतीस चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.

२. उत्पादकता वाढविणे (प्रामुख्याने कमी उत्पादकता असलेल्या जिल्हा व तालुक्यांवर भर देणे.

३. सोयाबीन व इतर गळीतधान्य पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे.

४. काढणी पश्चात नुकसान टाळण्यासाठी साठवणूक सुविधा उपलब्ध करून देणे.

५. नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी करणे.

६. विद्यापीठ, शासकीय संस्था/ एफपीओ यांच्याकडे बिजोत्पादनाकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

७. स्तरावर प्राथमिक प्रक्रिया व साठवणूक सुविधा निर्माण करणे.

८. शेतकरी उत्पादक कंपन्यांचे मूल्यसाखळी बळकटीकरण करण्याकरिता प्रोत्साहनपर अनुदान देणे.

९. प्रक्रिया धारकांना योग्य दर्जाच्या मालाचा पुरवठा सुनिश्चित करणे.

१०.प्रक्रियेमुळे मिळणाऱ्या मूल्यवर्धनाचा हिस्सा शेतकऱ्यांना मिळवून देणे.

**समाविष्ट जिल्हे :** नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, सोलापूर, पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, छ. संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर.

### योजनेची संकल्पना

सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत राज्यातील सोयाबीन व इतर गळीतधान्य उत्पादक जिल्ह्यांतील ३.०० लाख हेक्टर क्षेत्रावर सदरील योजना राबविण्यात येणार आहे. सदरील योजना समूह आधारित संकल्पनेनुसार राबविण्यात येत आहे. या अंतर्गत सोयाबीन पिकाच्या बाबतीत २७०० समूह, भूईमुग- २०० समूह तर करडई, जवस, मोहरी, तीळ, सुर्यफुल या पिकांकरिता १०० समूहांची बांधणी करण्यात येत आहे. तालुकानिहाय सोयाबीन पिकाखालील क्षेत्र व उत्पादकतेचा विचार करून राबवावयाचे तालुकानिहाय समूहांची संख्या निश्चित केली आहे. त्यानुसार संबंधित तालुका कृषी अधिकारी यांनी अधिनस्त महसूल मंडळाचे क्षेत्र व उत्पादकता विचारात घेऊन मंडळ कृषी अधिकारी यांचेमार्फत सन २०२२-२३ पासून समूह बांधणी करण्याची कार्यवाही चालू केली आहे. पिकांची उत्पादकता वाढ व क्षमता बांधणी, मूल्य साखळी विकास, बियाणे साखळी बळकटीकरण व प्रचलित योजनांची सांगड या चार घटकांसाठी रू. ५५० कोटी तरतूद सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षासाठी करण्यात आली आहे.

**कार्यान्वयीन यंत्रणा :** कृषी विभाग (जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी)

### योजनेतील लाभार्थी निवडीचे निकष

१. कृषी सहाय्यक यांनी ग्राम कृषी विकास समितीच्या मान्यतेने लाभार्थी निवड करावी. सदर निवड ऑनलाईन पद्धतीने महा-डीबीटीद्वारे करण्यात येईल.

२. शेतकऱ्याचे स्वतःचे नावे ७/१२ व ८अ उतारा असणे बंधनकारक राहील.

३. समूहामध्ये विहीत प्रमाणानुसार अनु.जाती/ जमाती प्रवर्गाचे लाभार्थी, ३० टक्के महिला व ५ टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ द्यावा.

४. अल्प/अत्यल्प भूधारक यांचा प्राधान्याने समावेश करण्यात यावा.

५. शेतकऱ्याचे सोयाबीन पिकाखालील क्षेत्र किमान १ एकर असणे बंधनकारक आहे.

### घटकनिहाय आर्थिक मापदंड :

| अ.क्र. | प्रमुख घटक | बाब |
|---|---|---|
| १ | **पिकांची उत्पादकता वाढ व शेतकऱ्यांची क्षमता बांधणी** | शेतकरी समूहासाठी उत्पादकता वाढ करणेसाठी बाबी |
| | | सोयाबीन प्रात्यक्षिक २७०० समूह (रु. ७५००/हे. ) |
| | | भुईमुग (रु.११०००/हे.)/करडई /जवस / तीळ / मोहरी / सुर्यफुल : रु. ३०००/हे. ) |
| २ | **बियाणे साखळी बळकटीकरण** | इतर तेलबिया प्रमाणित/ पायाभूत बिजोत्पादन कार्यक्रम |
| | | विद्यापीठ स्तरावरील संशोधन व बियाणे साखळी बळकटीकरण व आदर्श प्रात्यक्षिक प्लॉट कार्यासाठी (प्रति विद्यापीठ रु. ८ कोटी) |
| | | बियाणे उत्पादनाकरीता तालुका बिजगुणन केंद्र (ताबिके) बळकटीकरण (वार्षिक ३३३३ क्विंटल तीन वर्षासाठी प्रति क्विंटल रुपये ५०००/-) |
| ३ | **मूल्य साखळी विकास** | शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन, बळकटीकरण |
| | | स्थापन करावयाच्या नवीन शेतकरी उत्पादक कंपन्या/ गटांना संलग्न करावयाच्या अस्तित्वात असलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्या. |
| | | शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या पायाभूत सुविधा. |
| | | १) गोडाऊन (२७० संख्या *२५ लाख ) |
| | | २) क्लीनिंग व ग्रेडिंग युनिट (३०० संख्या *९ लाख ) |
| | | ३) सायलो (१००० मे. टन. ) (१०० संख्या *७५ लाख ) |
| | | शेतकरी उत्पादक कंपन्यांचे मूल्यसाखळी बळकटीकरण करण्याकरिता प्रोत्साहनपर अनुदान (३०० संख्या *१ लाख प्रति वर्ष / एकूण ३ वर्षासाठी ) |
| | | बीजप्रक्रिया युनिट (३०० युनिट *०.५० लाख) |
| | | शेतकरी उत्पादक गटांना/कंपन्यांना ड्रोन खरेदी व ड्रोनद्वारे औषध फवारणी करण्यासाठी अनुदान व अर्थसहाय्य (१५० संख्या *७.५ लाख) |
| ४ | **मूल्य साखळी विकास** | शेतकऱ्यांच्या बांधावर जैविक निविष्ठा निर्मिती |
| | | अ) मास्टर लॅब (रु. १.०० लाख *१५० लॅब) |
| | | ब) बेसिक लॅब (रु. ०.१५ लाख *६०० लॅब) |
| | | तेलघाणा प्रक्रिया युनिट करिता अर्थ सहाय्य (३०० संख्या *२ लाख) |

तेलघाणा





ड्रोनद्वारे फवारणी

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान– व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम

■ **उद्देश :**

१) ऊसाच्या उत्पादन खर्चात कपात करुन उत्पादकता वाढविणे.

२) दर्जेदार बेण्याच्या वापरास प्रोत्साहन देणे व बेणे निर्मितीसाठी बेणे वितरण कार्यक्रम राबविणे.

३) विकसित तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी क्षेत्रिय स्तरावर ऊस पिकात आंतरपिकाच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे.

■ **समाविष्ट जिल्हे :**

१) अहमदनगर २) पुणे ३) सोलापूर ४) सातारा ५) सांगली ६) कोल्हापूर ७) छ.संभाजीनगर ८) जालना ९) बीड १०) लातूर ११) धाराशीव १२) नांदेड १३) परभणी १४) हिंगोली १५) यवतमाळ

■ **लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष :**

या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील संबंधित अनुसूचित जाती (किमान १६.६० टक्के) व अनुसूचित जमाती (किमान ८.६० टक्के) यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गाच्या मंजूर कार्यक्रमापैकी ५ टक्के लाभ दिव्यांग प्रवर्गास देण्यात येतो. तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थींच्या ३० टक्के महिलांची



निवड करण्यात येते. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबविताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात येतो.

■ **योजनेचे स्वरूप :**

ऊस हे महाराष्ट्रातील महत्वाचे नगदी पीक आहे. ऊसाच्या वाढीस लागणारे अनुकूल हवामान राज्यात उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य देशात साखर उत्पादन व साखर उताऱ्याच्या बाबतीत आघाडीवर आहे. परंतु सरासरी प्रति हेक्टरी ऊस उत्पादन कमी आहे. त्यामुळे ऊस उत्पादन प्रगत तंत्रज्ञान जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन उत्पादन खर्च कमी केल्यास शेतकऱ्यांना ऊस पिकातून शाश्वत उत्पन्न मिळु शकेल. ऊस पिकाचा उत्पादन खर्च कमी करुन उत्पादकतेत वाढ करण्याच्या दृष्टीने सन २०२४–२५ मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानाअंतर्गत ऊस विकास कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे.

■ **योजनेची अंमलबजावणी व घटकनिहाय आर्थिक मापदंड :**

१) एक डोळा पध्दतीचा अवलंब करुन आंतरपिकाची प्रात्यक्षिके आयोजित करणे यासाठी प्रति हेक्टर रु. ९००० इतके अर्थसहाय्य आहे.

२) ऊती संवर्धित रोपे तयार करुन अनुदानावर वाटप करणे. यासाठी रु. ३.५०/– प्रति रोप अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते .

३) मुलभूत बियाणे उत्पादनासाठी अर्थसहाय्य (विद्यापीठ व संशोधन संस्थांसाठी) रू.४००००/– प्रति हेक्टर अर्थसहाय्य देण्यात येते.

४) पिक संरक्षण औषधी व बायो एजंटसचे वितरण– खर्चाच्या ५० टक्के, कमाल रु.५००.०० प्रति हेक्टर इतके अर्थसहाय्य देय आहे.

५) राज्यस्तरीय प्रशिक्षण रू. ४००००/– प्रति प्रशिक्षण.

---

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान– व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम

■ **उद्देश :**

■ १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

■ कापूस आधारित पीक पध्दतीस चालना देणे.

■ कापूस पिकात एकात्मिक कीड



व्यवस्थापनास चालना देणे

■ कापसाच्या सरळ वाणांची अतिघन लागवड पध्दतीचा अवलंब करून, अधिक लांब धाग्याच्या कापसाच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करुन कापूस उत्पादनास चालना देणे.

■ **समाविष्ट जिल्हे :**

१) धुळे २) जळगाव ३) अहमदनगर

४) छ. संभाजीनगर ५) जालना ६) बीड ७) नांदेड ८) परभणी ९) बुलढाणा १०) अकोला ११) वाशिम १२) अमरावती १३) यवतमाळ १४) वर्धा १५) नागपूर १६) चंद्रपूर

■ **लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष :**

या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील संबंधित अनुसूचित जाती (किमान १६.६० टक्के) व अनुसूचित जमाती (किमान ८.६० टक्के) यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गाच्या मंजूर कार्यक्रमापैकी ५ टक्के लाभ दिव्यांग प्रवर्गास देण्यात येतो. तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थींच्या ३० टक्के महिलांची निवड करण्यात येते. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबविताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात येतो.

■ **योजनेचे स्वरूप :**

सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- व्यापारी पिके या अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी केंद्र राज्य ६०:४० टक्के याप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. १२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकांचा समावेश करण्यात आला आहे.

■ **योजनेची अंमलबजावणी व घटकनिहाय आर्थिक मापदंड :**

१) एकात्मिक पीक व्यवस्थापन आद्यरेषीय प्रात्यक्षिके - यासाठी प्रति हेक्टर रु.८००० इतके अर्थसहाय्य आहे.
२) आंतरपिक पद्धतीची आद्य रेषीय प्रात्यक्षिके (कापूस पिकात मूग, उडीद) यासाठी प्रति हेक्टर रु.८००० इतके अर्थसहाय्य आहे.
३) कपाशीच्या सरळ वाणांच्या अतीघन लागवडीच्या चाचण्या रु.१०००० प्रति हेक्टर इतके अर्थसहाय्य आहे.
४) पिक संरक्षण औषधी व बायो एजंटसचे वितरण- खर्चाच्या ५० टक्के, कमाल रु. ५०० प्रति हेक्टर इतके अर्थसहाय्य देय आहे.
५) आद्यरेषिय प्रात्यक्षिके (देशी आणि अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन) यासाठी प्रति हेक्टर रु. ९००० इतके अर्थसहाय्य आहे.
६) ऑनलाईन पेस्ट मॉनिटरिंग ॲण्ड ॲडवायझरी सिस्टीम (ओपीएमएएस)

---

# राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस पिकाची उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना

■ **उद्देश :**

१) कापूस आधारित पीक पध्दतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे.
२) कापूस पिकातील उत्पादकता वाढविणे.
३) कापूस पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे.
४) कापूस पिकातील नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी करणे.
५) शेतकऱ्यांना कापसाच्या गुणवत्तेनुसार दर मिळणेबाबत प्रयत्न करणे.
६) कापूस विकण्याऐवजी कापसाच्या गाठी करून विकण्यास शेतकरी गटांना व शेतकरी उत्पादक कंपनींना प्रोत्साहित करणे

■ **समाविष्ट जिल्हे**

१) नाशिक २) धुळे ३) नंदूरबार ४) जळगाव ५) अहमदनगर ६) औरंगाबाद ७) जालना ८) बीड ९) उस्मानाबाद १०) नांदेड ११) परभणी १२) हिंगोली १३) बुलढाणा १४) अकोला १५) वाशिम १६) अमरावती



१७) यवतमाळ १८) वर्धा १९) नागपूर २०) चंद्रपूर २१) गडचिरोली

■ **लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष :**

१. कृषी सहाय्यक यांच्यामार्फत ग्राम कृषी विकास समितीच्या मान्यतेने लाभार्थी निवड करण्यात येते.
२. शेतकऱ्याचे स्वत:चे नावे ७/१२ व ८ अ उतारा असणे बंधनकारक आहे.
३. समूहामध्ये विहीत प्रमाणानुसार अनु. जाती/जमाती प्रवर्गाचे लाभार्थी, ३० टक्के महिला व ५ टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.
४. अल्प/अत्यल्प भूधारक यांचा प्राधान्याने समावेश करण्यात येतो.
५. शेतकऱ्याचे कापूस पिकाखालील क्षेत्र किमान १ एकर असणे बंधनकारक आहे.

■ **योजनेचे स्वरूप :**

सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत राज्यातील कापूस उत्पादक जिल्ह्यांतील २.६० लाख हेक्टर क्षेत्रावर सदरील योजना राबविण्यात येणार आहे. सदरील योजना समूह आधारित संकल्पनेनुसार (Cluster Based Approach) राबवायची आहे. या अंतर्गत कापूस पिकाच्या बाबतीत २६०० समूह निर्माण करावयाचे असून त्यापैकी २००० समूह हे उत्पादकता वाढ, ३०० समूह अतिघन लागवड व ३०० समूह सेंद्रिय कापूस निर्मितीसाठी तयार करावयाचे आहेत. एक समूह हा १०० हे. कापूस क्षेत्र असणाऱ्या १०० वा अधिक शेतकऱ्यांचा मिळून तयार करावयाचा आहे. सदर समूह निर्माण झाले नंतर त्यांचे शेतावर उत्पादकता

वाढ आधारित, अतिघन आधारित लागवड व सेंद्रिय कापूस प्रात्यक्षिके घेऊन प्रात्यक्षिकांद्वारे तसेच त्यांना प्रशिक्षण, शेतीशाळा, प्रक्षेत्र भेट इ. माध्यमातून समूहातील शेतकऱ्यांचे उत्पन्न १५ टक्के वाढविणेबाबत लक्षांक निर्धारित करण्यात आला आहे.

समूह तयार झाल्यानंतर या समुहांनी एकत्र येऊन शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे अभिप्रेत आहे. १०० हेक्टर क्षेत्राच्या ४ शेतकरी समुहामागे एक शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्यात येईल. शेतकरी उत्पादक कंपनी तयार झाल्यानंतर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना स्वच्छ, कापड उद्योगाच्या गरजेनुरूप व आवश्यक त्या गुणवत्तेचा कापूस तयार करून देण्यासाठी तांत्रिक मार्गदर्शन करून अशा पध्दतीने कापूस पिकाची मूल्य साखळी विकसित करण्यात येणार आहे.

## योजनेची अंमलबजावणी व घटकनिहाय आर्थिक मापदंड :

सदरील योजनेस सन २०२२-२३ ते २०२४-२५ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी रू. ४५० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

| अ.क्र | बाब/घटक | अनुदान दर |
|---|---|---|
| १ | उत्पादन वाढ तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा ८,००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक |
| २ | अतिघन लागवड आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा १०,००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक |
| ३ | सेंद्रिय कापूस आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा १०,००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक |
| ४ | प्रशिक्षण | रुपये १२५ प्रति शेतकरी प्रति दिन (हंगामात दोन दिवसाचे प्रशिक्षण) २५००० मर्यादेत |
| ५ | शेतीशाळा | रु १२५०० प्रति शेतीशाळा |
| ६ | प्रक्षेत्र भेट | ५० शेतकाऱ्यांकरिता रुपये ५००००/- |
| ७ | कृषीप्रवर्तक मानधन | रु. ६०००/- रुपये प्रति वर्ष |
| ८ | नवीन शेतकरी उत्पादक कंपन्या व अस्तित्वात असलेल्या शेतकरी गटांना संलग्न करावयाच्या शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य | रु. १ लाख प्रति शेतकरी उत्पादक कंपनी |
| ९ | कापूस साठवणूकीसाठी शेड | प्रति शेड रु. २० लाख |
| १० | शेतावरील जिनिंग आणि प्रेसेसिंग युनिट | प्रति युनिट रु. ५ लाख |
| ११ | ऑइल एस्क्ट्रॅक्टर (Oil extractor) | प्रति एस्क्ट्रॅक्टर रु. २० लाख |
| १२ | शेतकरी उत्पादक कंपन्यांचे मूल्यसाखळी बळकटीकरण करण्याकरिता प्रोत्साहनपर अनुदान | रु. ३ लाख प्रति शेतकरी उत्पादक कंपनी |
| १३ | शेतकरी उत्पादक कंपन्यांना ड्रोन खरेदी व ड्रोनद्वारे औषध फवारणी करण्यासाठी अनुदान व अर्थसहाय्य | प्रति उत्पादक कंपनी रु ७.५ लाख किंवा ७५ टक्के |
| १४ | बांधावर जैविक निविष्ठा निर्मिती करिता<br>१. मास्टर लॅब २. बेसिक लॅब | रु. १ लाख प्रति मास्टर लॅब<br>रु. ०.१५ लाख प्रति बेसिक लॅब |
| १५ | शेतकरी उत्पादक कंपनीस कोमोडिटी मार्केटशी जोडणेकरिता अर्थसहाय्य | रु. २ लाख प्रति शेतकरी उत्पादक कंपनी |
| १६ | नावीन्यपूर्ण बाबी | रु. २ लाख प्रति शेतकरी उत्पादक कंपनी |
| १७ | विद्यापीठ स्तरावरील संशोधन व आदर्श प्रात्यक्षिक प्लॉट तयार करण्यासाठी तसेच बियाणे साखळी बळकटीकरण | प्रति विद्यापीठ रु. ५ कोटी |
| १८ | ठिबक सिंचन | Convergence द्वारे |
| १९ | सिंचन साधने व सुविधा (शेततळे, विहीर, पम्प सेट, पाईप इ.) | |
| २० | कापूस पिकातील यांत्रिकीकरण | |
| २१ | अवजारे बँक | |

**अधिक माहितीसाठी योजनेतील नमूद जिल्ह्यांतील कृषी कार्यालयांशी संपर्क करावा.**



# वसंतराव नाईक : हरितक्रांतीचे प्रणेते आणि द्रष्टे राजकारणी

(पान २ वरून)....

## वसंतराव नाईक यांचे महाराष्ट्राच्या विकासातील योगदान:

### १. भूदान चळवळ

सन १९५५ साली वसंतराव नाईक यांनी यवतमाळ जिल्ह्यामधून त्यांनी हजारो एकर जमीन भूदानासाठी मिळवून दिली. याच कालावधीमध्ये इंदिरा गांधी व डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते ५००० एकर जमिनीचे भूदान त्यांनी केले. या कार्याची सुरुवात त्यांनी स्वत:च्या हिश्श्यातील जमिनीतून सहावा हिस्सा जमीन भूदानासाठी देऊन केली.

### २. लोकशाहीचे विकेंद्रीकरण

महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पंचायत राज समितीचे अध्यक्ष वसंतराव नाईक हे होते. त्यांनी २९३ पानी अहवाल सादर केला. यातील शिफारशीवरून जिल्हा परिषदेची निर्मिती १ मे १९६२ ला झाली आणि ही व्यवस्था देशाने स्वीकारली. त्यांनी केलेल्या पंचायतराजच्या शिफारशीवरून आजच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचा कारभार सुरू आहे.

### ३. मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा

मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळवून देण्यात वसंतराव नाईक यांचा खारीचा वाटा आहे. १ मे १९६६ रोजी त्यांनी घोषणा केली व मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळवून दिला. राज्यातील सरकारी कामकाज मराठीतून चालवण्याचे आदेश दिले. राज्यात नागपूर, पुणे, छ. संभाजीनगर या ठिकाणी भाषा संचनालयाची विभागीय कार्यालये सुरू करण्याचे ठरविण्यात आले.

### ४. पहिले खुले कारागृह स्थापना

१० मे १९६८ रोजी गुन्हेगारांना मुक्त जगता यावे यासाठी पहिले खुले कारागृह औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे स्थापन केले व गुन्हेगारांना माणूस म्हणून जगण्यास मार्ग दाखविला.

### ५. कुटुंब नियोजन

१९६३ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर

राज्यात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला होता. यावेळी अन्नधान्य उत्पादन घटले होते आणि लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत होती. त्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची कमरता भासू लागली. त्या वेळी मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी विचार मांडला की संरक्षण आघाडी व अन्न आघाडी सांभाळण्यासाठी आपण जसे प्रयत्न करतो त्याच प्रमाणे कुटुंब नियोजन आघाडी कडेही लक्ष देणे तितकेच आवश्यक आहे. त्यांनी राष्ट्रीय कर्तव्य समजून कुटुंब नियोजन करण्यास लोकांना सांगितले.

### ६. रोजगार हमी योजना

२६ जानेवारी १९६९ रोजी वि. स. पागे. यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेली रोजगार हमी योजना अंमलात आणली. १९७२ च्या दुष्काळात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात रोजगार हमी अंतर्गत करण्यात आली. पुढे आपल्याला माहीत आहेच की केंद्राने या योजनेची दखल घेऊन महात्मा गांधी रोजगार हमी योजना म्हणून ही योजना संपूर्ण देशभर राबवली.

### ७. जमीन विषयक सुधारणा

जमीन सुधारणा कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे. जमिनीच्या बाबतीत असणारी विषमता दूर करणे आणि लोकांना जमीन महसूल पिळवणूकीपासून संरक्षण देणे ही महत्वाची कामे केली. जमीन सुधारणाविषयक निर्णयामुळे सामाजिक न्यायाचे तत्व प्रस्थापित झाले.

### ८. सहकार क्षेत्रातील योगदान

देशात समाजवादी समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी सहकार हा एक मार्ग आहे. वसंतराव नाईक हे महाराष्ट्र राज्याचे पहिले सहकारमंत्री म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. सहकार क्षेत्रामुळे शेतकऱ्यांना आपले पैसे उद्योगात गुंतवता आले. ग्रामीण भागातील प्रश्न सहकारातून सोडवता आले. त्यामुळे खेडे व शहर यातील अंतर कमी होण्यास मदत झाली. वसंतराव यांचे मत होते की शेती व शेतकऱ्यांचे कल्याण यासाठी सहकार क्षेत्राची नितांत आवश्यकता आहे.

### ९. उद्योगाच्या विकेंद्रीकरणास प्रोत्साहन

यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली व १९६३ मध्ये या महामंडळाच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती प्राप्त झाली. उद्योग मुंबई पर्यंत न थांबता इतर शहरात विस्तार पावले. आपण आज विकास पाहत आहोत पुणे, छ. संभाजीनगर, नाशिक, नागपूर, कोल्हापूर इथे मोठ्या औद्योगिक वसाहती आहेत हे खऱ्या अर्थाने वसंतराव यांच्या दुरदृष्टीचे योगदान आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांना व मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळू लागला आहे.

### १०. कृषी क्षेत्रातील योगदान

वसंतराव नाईक यांना ग्रामीण भागातील कृषी क्षेत्राचा खूप जवळून अभ्यास केला होता. त्यांना यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळात कृषी मंत्री म्हणून काम करताना या क्षेत्रातील अडचणी त्यांनी अभ्यासल्या होत्या. त्यासाठी काय करता यईल असा विचार करताना त्यांनी स्वत: मुख्यमंत्री म्हणून अनेक निर्णय घेतले ज्यामुळे आज त्यांना हरितक्रांतीचे प्रणेते म्हटले जाते. शेतीला आधुनिक स्वरूप देण्यासाठी त्याच्या मुख्यमंत्री पदाच्या कालखंडात राज्यात चार कृषी विद्यापीठाची स्थापना झाली. १९६८ मध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, त्यांनतर १९६९ मध्ये अकोला इथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला तसेच परभणी इथे वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, कोकणासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीची स्थापना झाली. या कृषी विद्यापिठांतील संशोधनामुळे महाराष्ट्राच्या कृषी विषयक धोरणात अमुलाग्र बदल झाले आणि शेतकऱ्यांना नवीन वाण तसेच नवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाले. विविध कृषी विषयक धोरण राबवून महाराष्ट्र राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले. तसेच त्यांच्या या काळात शेतीमध्ये विविध प्रयोग केले. ज्वारीचे संकरीत वाण महाराष्ट्रात आणले. कल्याण सोना गव्हाच्या जातीचे प्रयोग केले. कापूस एकाधिकार योजना आणली. यासाठी विधिमंडळात १९७१ मध्ये कापूस संकलन प्रक्रिया व विपणन हा कायदा संमत करण्यात आला. त्यामुळे कापसाची आधारभूत किंमत ठरवली जाऊ लागली. या कापसावर प्रक्रिया करून विपणन व्यवस्था करण्यासाठी यंत्रणा उभारली गेली. गरजवंत शेतकरी वर्गाला याचा फायदा झाला. तसेच त्यांनी कृषिमंत्री बाळासाहेब सावंत यांच्या मदतीने संकरीत गाईची खरेदी केली आणि दुग्ध उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्याना बँकेकडून कर्ज उपलब्ध करून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात धवलक्रांती घडून आली. त्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना दुष्काळात राबविली व रोजगार हमी योजनेमधून जलसंधारणाची कामे केली. त्याचप्रमाणे उजनी, जायकवाडी, चासकमान, पेंच, वर्धा, धोम ही धरणे आणि पारस, कोराडी हे औष्णिक विद्युत प्रकल्प व फोपळी, येलदरी प्रकल्प उभे केले. विकासासाठी वीज व पाणी या मुलभूत गरजांची त्यांनी सोय केली.

वसंतराव नाईक यांनी कृषी–औद्योगीक क्षेत्रात अमुलाग्र अशी कामगिरी केली. ते हाडाचे शेतकरी होते. याशिवाय शेती आणि माती हा त्यांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय होता. आपले संपूर्ण आयुष्य शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी झिजवले. अनेक क्रांतीकारी शेतकरी हिताचे निर्णय त्यांनी घेतले. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याचा सन्मान म्हणून १ जुलै ही त्यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन १९८९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घेतला. आज गाव, शहर, कार्यालयाबरोबरच थेट शेतकरी बांधावर कृषी दिन साजरा केला जातो. त्यांनी भारतीय कृषी क्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या जयंतीनिमित्त कृषी विभागाद्वारे 'कृषी संजिवनी सप्ताह' साजरा केला जातो. थेट शेत बांधावर शेतकऱ्यांना कृषीविषयक मार्गदर्शन केले जाते.

अशा या महान व्यक्तीमत्वास विनम्र अभिवादन!

✪

# प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY)

**श्री. विनयकुमार शांता जयसिंग आवटे**, कृषी संचालक, विस्तार व प्रशिक्षण, म.रा., कृषि आयुक्तालय, पुणे -१

प्रधान मंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे.

**■ योजनेचा उद्देश :**

अधिसूचित पिकांना नैसर्गिक आपत्ती, कीड व रोग इ. बाबींपासून विमा संरक्षण देणे व नुकसानीच्या प्रमाणात नुकसान भरपाई देऊन पीक नुकसानीच्या कठीण कालावधीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य राखणे.

**■ लाभार्थी निवडीचे निकष :** सहभागी शेतकरी

१. अधिसूचित क्षेत्रात अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत.

२. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजना ऐच्छिक राहील.

३. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरार पिक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे.

४. ई-पीक पाहणी - शेतकऱ्याने लागवड केलेल्या पिकाची नोंद ई-पीक पाहणी मध्ये करावी.

**■ समाविष्ट पिके :** (१४ पिके) (खरीप हंगाम)

- तृणधान्य : भात, ख.ज्वारी, बाजरी, नाचणी, मका.
- कडधान्य : तूर, मूग, उडीद.
- गळीत धान्य : भुईमूग, सोयाबीन, तीळ, कारळे.
- नगदी पिके :- कापूस व कांदा.

**■ समाविष्ट पिके :** (०६ पिके) (रब्बी हंगाम)

- तृणधान्य व कडधान्य : गहू , रब्बी ज्वारी, हरभरा, उन्हाळी भात



- गळीत धान्य : उन्हाळी भुईमूग.
- नगदी पिके : रब्बी कांदा.

**■ विमा संरक्षण/जोखीम बाबी :**

१) पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट.

२) प्रतिकूल हवामानामुळे पिकाची पेरणी/ लावणी न झाल्यास होणारे नुकसान.

३) पीक कालावधीत प्रतिकूल हवामानामुळे होणारे नुकसान.

४) काढणी पश्चात नुकसान.

५) स्थानिक नैसर्गिक आपत्ती (गारपीट, भुस्खलन, पुराचे पाणी शेतात आल्यास).

खरीप हंगाम २०२४ व रब्बी हंगाम २०२४-२५ करीता सदरची योजना खाली नमूद केलेल्या विमा कंपनीच्या माध्यमातून संबंधीत जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येते.

| अ.क्र | विमा कंपनी | समाविष्ठ जिल्हे |
|---|---|---|
| १ | ओरिएन्टल इंन्शुरन्स कं.लि. | अहमदनगर, नाशिक, चंद्रपूर, सोलापूर, जळगाव, सातारा |
| २ | आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंन्शुरन्स | परभणी, वर्धा, नागपूर |
| ३ | युनिव्हर्सल सोम्पो जनरल इंन्शुरन्स | जालना, गोंदिया, कोल्हापूर |
| ४ | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स | नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| ५ | चोलामंडलम एम एस जनरल इंन्शुरन्स | छ. संभाजीनगर, भंडारा, पालघर, रायगड |
| ६ | भारतीय कृषि विमा कंपनी | वाशिम, बुलडाणा, सांगली, नंदुरबार, बीड |
| ७ | एचडीएफसी जनरल इर्गो इंन्शुरन्स | हिंगोली, अकोला, धुळे, पुणे, धाराशिव |
| ८ | रिलायन्स जनरल इंन्शुरन्स | यवतमाळ, अमरावती, गडचिरोली |
| ९ | एसबीआय जनरल इंन्शुरन्स | लातुर |

**■ योजनेत सहभागाचा अंतिम दिनांक :** खरीप हंगाम १५ जुलै, रब्बी हंगाम : रब्बी ज्वारी-३० नोव्हेंबर, गहू, हरभरा, कांदा : १५ डिसेंबर, उन्हाळी भुईमुग, उन्हाळी भात : ३१ मार्च.

■ **विमा हप्ता व अनुदान :**

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के तसेच खरीप व रब्बी हंगामातील नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. तथापि सन २०२३-२४ पासून महाराष्ट्र शासनाने सर्वसमावेशक पिक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला असून शेतकऱ्यांना प्रति अर्ज केवळ १/- रुपया भरून पिक विमा पोर्टलवर नोंदणी करावयाची आहे. या योजनेअंतर्गत निश्चित करण्यात आलेला पिकनिहाय प्रति हेक्टरी विमा हप्ता व शेतकऱ्यांनी भरलेला विमा हप्ता रक्कम रू.१/- वजा जाता उर्वरीत फरक हा सर्वसाधारण विमा हप्ता अनुदान म्हणून राज्य शासनामार्फत दिला जातो.

खरीप हंगामातील सर्वसाधारण पिकनिहाय विमा संरक्षित रक्कम पुढील प्रमाणे आहे. यात जिल्हानिहाय फरक संभवतो.

| अ.क्र. | पिक | सर्वसाधारण विमा संरक्षित रक्कम रु./हे |
|---|---|---|
| १ | भात | ४०००० ते ५१७६० |
| २ | ज्वारी | २०००० ते ३२५०० |
| ३ | बाजरी | १८००० ते ३३९१३ |
| ४ | नाचणी | १३७५० ते २०००० |
| ५ | मका | ६००० ते ३५५९८ |
| ६ | तूर | २५००० ते ३६८०२ |
| ७ | मूग | २०००० ते २५८१७ |
| ८ | उडीद | २०००० ते २६०२५ |
| ९ | भुईमूग | २९००० ते ४२९७१ |
| १० | सोयाबीन | ३१२५० ते ५७२६७ |
| ११ | तीळ | २२००० ते २५००० |
| १२ | कारळे | १३७५० |
| १३ | कापूस | २३००० ते ५९९८३ |
| १४ | कांदा | ४६००० ते ८१४२२ |

## विमा योजनेत सहभागी होण्याकरिता काय करावे ?

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांस देखील या विमा योजनेत सहभाग बंधनकारक नाही. मात्र त्यासाठी शेतकऱ्याने विमा योजनेत भाग घेण्याच्या अंतिम दिनांक आधी किमान ७ दिवस संबंधित बँकेस विमा हप्ता न भरणे बाबत लेखी कळवणे गरजेचे आहे. इतर बिगर कर्जदार शेतकऱ्याने आपला ७/१२ चा उतारा, बँक पासबुक , आधार कार्ड व पिक पेरणीचे स्वयं घोषणापत्र घेवून प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देवून व हप्ता भरुन सहभाग घ्यावा. हप्ता भरलेली पोहोच पावती त्याने जपून ठेवावी. या शिवाय कॉमन सर्विस सेंटर (CSC) आपले सरकार च्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे सहाय्य घेऊ शकता .

## महत्वाच्या बाबी

१. आपल्या मालकीच्या नसलेल्या जमिनीवर विमा काढणे, उदाहरणार्थ शासकीय जमीन, अकृषक जमीन, कंपनी, संस्था, मंदिर, मस्जिद यांची जमीन वर विमा काढल्यास त्याची अत्यंत गंभीर दाखल घेतली जाईल.

२. या योजनेत आपण जे पीक शेतात लावले आहे त्याचाच विमा घ्यावा. शेतात विमा घेतलेले पीक नसेल तर आपणास विमा नुकसान भरपाई पासून वंचित राहावे लागेल.

३. या वर्षी भात, कापूस, सोयाबीन पिकांमध्ये महसूल मंडळमधील पिकाचे सरासरी उत्पादन नोंदवताना रिमोट सेसिंग तंत्रज्ञान चा वापर करून येणाऱ्या उत्पादनास ४०% भारांकन आणि पीक कापणी प्रयोगाद्वारे आलेल्या उत्पादनास ६०% भारांकन देऊन मंडळाचे सरासरी उत्पादन निश्चित केले जाणार आहे.

४. भाडे कराराद्वारे पिक विमा योजनेत सहभाग घेणाऱ्या शेतकऱ्यांना नोंदणीकृत भाडे करार प्रत पिक विमा पोर्टल वर अपलोड करावी लागेल.

५. पीक विमा योजनेत सहभागी होण्यापूर्वी मयत असलेल्या शेतकऱ्याच्या नावे अथवा त्याचे नावे असलेल्या जमिनीवर विमा योजनेत भाग घेतल्याचे निदर्शनास असल्यास विमा अर्ज अपात्र होईल.

६. अर्ज करण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक आहे.

७. पीक विम्यातील अर्ज हा आधार वरील नावाप्रमाणे असावा.

८. पीक विम्यातील नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या विमा पोर्टलद्वारे आधार संलग्न बँक खात्यामध्ये करण्यात येते. यासाठी आपले बँक खाते आधार संलग्न पेमेंट मिळण्यासाठी अधिकृत असणे आवश्यक आहे. याकरिता आपला बँक मॅनेजर माहिती देऊ शकतो.

९. आधार कार्ड वरील नाव व बँक खात्यावरील नाव सारखे असावे.

१०. विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास रुपये ४० मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. ते संबंधित विमा कंपनी मार्फत सीएससी विभागास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रति अर्ज एक रुपया प्रमाणे रक्कम सीएससी चालकांना देणे अभिप्रेत आहे.

योजनेच्या अधिक माहितीसाठी कोठे संपर्क साधावा.

पीक विमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाई साठी संबंधित पीक विमा कंपनीचा टोल-फ्री नंबर किंवा केंद्र शासनाचे कृषि रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७ वर संपर्क करावा. संबंधित विमा कंपनी, स्थानिक कृषि विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

**शेतकऱ्यांनी वर्गणी कशी भरावी याची सविस्तर माहिती घेण्याकरिता शेजारी दिलेला QR Code स्कॅन करा**

# मृग बहारातील फळपिकांसाठी विमा योजना

**श्री. विनयकुमार शांता जयसिंग आवटे**, कृषी संचालक, विस्तार व प्रशिक्षण, म.रा., कृषि आयुक्तालय, पुणे -१

कमी पाऊस/जास्त पाऊस, पावसातील खंड , सापेक्ष आर्द्रता अशा विविध हवामान धोक्यांमुळे फळपिकांचे मोठे नुकसान होते. अशा नुकसानीच्या परिस्थितीत शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यासाठी शासनाने हवामान आधारित फळपिक विमा योजना लागू केली आहे . मृग बहार २०२४ मध्ये संत्रा, मोसंबी, डाळींब, पेरू, चिकू , लिंबू, सिताफळ व द्राक्ष या ८ फळपिकांचा समावेश आहे. दिनांक १२ जून २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाने याबाबत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

सर्वसाधारणपणे ज्या महसूल मंडळात त्या फळपिकाखाली २० हेक्टर किंवा त्याहून अधिक उत्पादनक्षम क्षेत्र आहे. अशा महसूल मंडळांना त्या फळपिकासाठी अधिसूचित करण्यात येवून तेथे ही योजना राबविण्यात येते. केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच विमा संरक्षण लागू राहणार आहे. त्यासाठी फळपिकांचे उत्पादनक्षम वय पुढीलप्रमाणे राहील.

| फळपिक | उत्पादनक्षम वय वर्ष |
|---|---|
| आंबा, चिकू, काजू | ५ |
| लिंबू | ४ |
| संत्रा, मोसंबी, पेरू, सिताफळ | ३ |
| डाळिंब, द्राक्ष | २ |
| केळी, पपई, स्ट्रॉबेरी | - - |

ही योजना पुढीलप्रमाणे कंपन्यांच्या माध्यमातून अधिसूचित जिल्हात राबविण्यात येणार आहे.

| जिल्हे | संबंधित विमा कंपनीचे नांव |
|---|---|
| जळगाव, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, सिंधुदुर्ग, कोल्हापुर, वर्धा, रत्नागिरी | भारतीय कृषी विमा कंपनी लिमिटेड |
| जालना | फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. |
| छ. संभाजीनगर, धाराशिव, अमरावती, अकोला, नागपूर, परभणी, रायगड, नंदुरबार | युनिवर्सल सोम्पो जनरल इंश्युरन्स कं. लि. |
| ठाणे, पालघर, धुळे, पुणे, सांगली, लातुर, बुलढाणा, नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा, बीड, वाशिम | बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड |








- या योजनेत अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित फळपिकासाठी कुळाने, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसहित इतर सर्व शेतकरी भाग घेऊ शकतात.
- पीककर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदारांसाठी योजनेतील सहभाग ऐच्छिक राहणार आहे.
- बिगर कर्जदार शेतकरी विहित मुदतीत बँकेने किंवा ऑनलाइन फळपीक विमा पोर्टल www.pmfby.gov.in वर विमा हप्ता जमा करुन सहभाग घेऊ शकतात. त्यासाठी आधार कार्ड, जमीन धारणा ७ /१२ , ८(अ) उतारा व पिक लागवड स्वयंघोषणा पत्र, फळबागेचा (Geo Tagging) केलेला फोटो, बँक पासबूक वरील बँक खाते बाबत सविस्तर माहिती लागेल. कॉमन सर्विस सेंटर मार्फत अर्ज ऑनलाइन भरता येतील.
- शेतकऱ्यांनी फळपिक लागवड केलेली नसताना किंवा उत्पादन योग्य फळपिक नसताना दुसऱ्याच्या जमिनीवर किंवा शासनाच्या जमिनीवर अकृषक जमिनीवर विमा काढून विमा योजनेत सहभाग घेतल्यास त्यांचे विरुद्ध कडक कारवाई होऊ शकते. यासाठी ज्या शेतकऱ्यांकडे उत्पादन योग्य वयाची फळबाग आहे त्यांनीच योजनेत सहभाग घ्यावा.
- शेतकऱ्यांनी स्वतःच्या जमिनीवर फक्त विमा घ्यावा.
- शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता हा सर्वसाधारणपणे विमा संरक्षित रकमेच्या ५% च्या मर्यादेत असतो. मात्र एकूण वास्तवदर्शी विमा हप्ता ३५% हून अधिक असल्यास त्या अधिक विमा हप्त्यातील ५०% भार शेतकऱ्यांना उचलावा लागतो. विमा हप्ता दर जिल्हानिहाय वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे शेतकऱ्याने भरावयाच्या विमा हप्त्यात जिल्हानिहाय फरक असू शकतो .

फळपिकनिहाय विमा योजना लागू असलेले जिल्हे, प्रति हेक्टर विमा संरक्षित रक्कम रु. आणि शेतकऱ्याने भरावयाचा विमा हप्ता पुढीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **फळपिकाचे नाव** | **प्रति हेक्टर विमा संरक्षित रक्कम रु.** | **शेतकऱ्याने भरायचा विमा हप्ता रु. प्रति हेक्टर** |
|---|---|---|---|
| १ | संत्रा | १,००,०००/- | ५०००/- ते १२,०००/- |
| २ | मोसंबी | १,००,०००/- | ५,०००/- |
| ३ | पेरु | ७०,०००/- | ३,५००/- |
| ४ | चिकू | ७०,०००/- | ३५००/- ते १२,२५०/- |
| ५ | लिंबू | ८०,०००/- | ४,००० /- |
| ६ | डाळिंब | १,६०,०००/- | ८,०००/- ते २०,००० |
| ७ | सीताफळ | ७०,०००/- | ३,५००/- |
| ८ | द्राक्ष (क) | ३,८०,०००/- | १९,०००/- |

- एक शेतकरी त्याच्याकडे एकापेक्षा अधिक फळपिके असल्यास योजना लागू असलेल्या पिकांसाठी तो विमा योजनेत सहभाग घेऊ शकतो (मात्र त्या फळपिकासाठी ते महसूल मंडळ अधिसूचित असणे आवश्यक आहे)
- अधिसूचित फळपिकांपैकी एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहार पैकी कोणत्याही एकाच हंगामासाठी विमा संरक्षण अर्ज करता येईल (उदा. संत्रा, मोसंबी, द्राक्ष, डाळिंब.)
- या योजनेत राज्यात प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरिता एका फळपिकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हे) आणि उर्वरित विभागाकरिता कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हे.) अशी मर्यादा राहील. तसेच जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रति शेतकरी ४ हे. मर्यादेपर्यंत राहील.
- सदर फळपीक विमा योजनेतील शेतकऱ्यांनी ई - पीक पाहणी करणे अनिवार्य आहे.
- विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळणेसाठी शेतकऱ्याचे बँक खाते आधार आधारित पेमेंटसाठी लिंक असावे.
- भाडे पट्टीने शेती करत असल्यास भाडेकरार नोंदणीकृत असावा.
- शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन हप्ता भरण्यासाठी विमा पोर्टल www.pmfby.gov.in वर हप्ता भरावा. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या संबंधित विमा कंपनी, तालुका कृषी अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा.

**मृग हंगामात फळपिकनिहाय विमा संरक्षण प्रकार (हवामान धोके), विमा संरक्षण कालावधी आणि विमा योजनेत भाग घेण्याचा अंतिम दिनांक पुढीलप्रमाणे.**

| **अ. क्र.** | **फळपिकाचे नाव** | **विमा संरक्षण प्रकार (हवामान धोके)** | **विमा संरक्षण कालावधी** | **विमा योजनेत भाग घेण्याचा अंतिम दिनांक** |
|---|---|---|---|---|
| १ | संत्रा | कमी पाऊस | १५ जून ते १५ जुलै | २५ जून २०२४ |
| | | पावसाचा खंड | १६ जुलै ते १५ ऑगस्ट | |
| २ | पेरु | कमी पाऊस | १५ जून ते १४ जुलै | |
| | | पावसाचा खंड व जास्त तापमान | १५ जुलै ते १५ ऑगस्ट | |
| ३ | लिंबू | कमी पाऊस | १५ जून ते १५ जुलै | |
| | | पावसाचा खंड | १६ जुलै ते १५ ऑगस्ट | |
| ४ | द्राक्ष (क) | पाऊस, आर्द्रता व किमान तापमान | १५ जून ते १५ नोव्हेंबर | |
| ५ | मोसंबी | कमी पाऊस | १ जुलै ते ३१ जुलै | ३० जून २०२४ |
| | | पावसाचा खंड | १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट | |
| ६ | चिकू | जास्त आर्द्रता व जास्त पाऊस | १ जुलै ते ३० सप्टेंबर | |
| ७ | डाळिंब | पावसाचा खंड | १५ जुलै ते १५ ऑक्टोबर | १४ जुलै २०२४ |
| | | जास्त पाऊस | १६ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर | |
| ८ | सिताफळ | पावसाचा खंड | ०१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर | ३१ जुलै २०२४ |
| | | जास्त पाऊस | ०१ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | |

या विमा योजनेअंतर्गत हवामान धोक्याच्या ट्रिगर कार्यान्वित झाल्यास त्या महसूल मंडळातील त्या पिकासाठी भाग घेतलेल्या शेतकऱ्यास नुकसान भरपाई रक्कम संबंधित विमा कंपनीकडून देण्यात येणार आहे.





# पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षांसाठी शासन निर्णय दिनांक १२ जून,२०२४ अन्वये राज्यात राबविण्यात येत आहे.

**■ योजनेत सामाविष्ट फळपिके**

- **मृग बहार-** संत्रा, मोसंबी, लिंबू, डाळिंब, पेरु, सिताफळ, चिकू व द्राक्ष (क) (मृग बहार) (८)
- **आंबिया बहार-** द्राक्ष, डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, आंबा, काजू, स्ट्रॉबेरी (प्रायोगिक तत्वावर) व पपई (९)

फळपिकासाठी महसूल मंडळ हा घटक धरुन राज्यात योजना राबविण्यात येत आहे.

**■ योजनेची उद्दिष्टे :**

१. नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे फळ पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे.

२. पिकांच्या नूकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे.

३. सदरची योजना ही अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील अधिसूचित फळपिकांसाठी असेल.

४. राज्यातील अधिसूचित फळपिकाखालील एकुण २० हे. व त्यापेक्षा जास्त क्षेत्र असणाऱ्या अधिसूचित महसूल मंडळात योजना राबविण्यात येते.

५. सदरची योजना ही कर्जदार, बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे.

६. सदरच्या योजनेत खातेदारांचे व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरार पिक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे.

७. या योजनेत शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरिता एका फळपिकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हे) आणि उर्वरित विभागाकरिता कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हे.) अशी मर्यादा राहील. तसेच जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रति शेतकरी ४ हे. मर्यादेपर्यंत राहील.

८. अधिसूचित फळपिकांपैकी एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग अथवा आंबिया बहारापैकी कोणत्याही एकाच हंगामा करिता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल. (उदा. संत्रा, मोसंबी, डाळिंब व द्राक्ष)

९. सदर फळपीक विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांनी ई - पीक पाहणी करणे बंधनकारक आहे.

१०. विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळणेसाठी शेतकऱ्याचे बँक खाते आधार आधारित पेमेंटसाठी लिंक असावे .

११. विमा संरक्षणाचे केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच लागू आहे. विहित वयापेक्षा कमी वयाच्या फळबाग लागवडीस विमा संरक्षणाची नोंद झाल्याचे पडताळणीत निदर्शनास आल्यास विमा संरक्षण केव्हाही संपुष्टात येईल आणि शेतकऱ्याने भरलेला विमा हप्ता जप्त होईल. योजनेत भाग घेण्यासाठी अधिसूचित फळपिकांचे उत्पादनक्षम वय खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अधिसूचित फळ पिक | उत्पादनक्षम वय वर्ष |
|---|---|---|
| १ | पेरू | ३ |
| २ | चिकू | ५ |
| ३ | संत्रा | ३ |
| ४ | मोसंबी | ३ |
| ५ | डाळिंब | २ |
| ६ | लिंबू | ४ |
| ७ | द्राक्ष | २ |
| ८ | आंबा | ५ |
| ९ | काजू | ५ |
| १० | सीताफळ | ३ |

**■ आर्थिक मापदंड**

- या योजनेंतर्गत केंद्र शासनाने त्यांचे विमा हप्ता अनुदान ३० टक्के दरापर्यंत मर्यादित केले आहे. त्यामुळे ३० टक्क्यावरील विमा हप्ता राज्यशासन व शेतकरी यांनी स्विकारणे क्रमप्राप्त आहे.
- या योजनेंतर्गत ३० ते ३५ टक्के पर्यंतचे अतिरिक्त ५ टक्के विमा हप्ता दायित्व राज्य शासनाने स्विकारले असून ३५ टक्क्यांवरील विमा हप्ता राज्य शासन व शेतकरी यांनी प्रत्येकी ५०: ५० टक्क्याप्रमाणे भरावयाचा आहे.

**■ योजनेची अंमलबजावणी - समाविष्ट फळपिकांच्या जोखमीच्या बाबी** : अधिसूचित महसूल मंडळातील अधिसूचित फळपीकांकरिता, पाऊस (जास्त, कमी, अवेळी व पावसाचा खंड) आर्द्रता, तापमान (कमी व जास्त), वेगाचा वारा व गारपीट हे हवामान धोके निश्चित करण्यात आलेले आहेत.

| ४. सहभागी जिल्हे व विमा कंपन्या- | | |
|---|---|---|
| **जिल्हा समूह क्र.** | **जिल्हे** | **विमा कंपनीचे नांव व पत्ता** |
| १ | जळगाव | भारतीय कृषी विमा कंपनी लिमिटेड, मुंबई क्षेत्रिय कार्यालय, स्टॉक एक्चेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रिट, फोर्ट मुंबई - ४०००२३. टोल फ्री क्र. : १८००४१९५००४ दूरध्वनी क्र. ०२२ - ६१७१०९१२ ई-मेल - pikvimaaicofindia.com |
| २ | जालना | फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. पत्ता - युनिट क्र.८०१ आणि ८०२, टॉवर सी, २४७ एम्बेसी पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम) मुंबई - ४०० ०८३. टोल फ्री - १८०० २२० २३३/ १८६० ५०० ३३३३ ई-मेल - crop.insurancefuturegenerali.in |
| ३ | छ.संभाजीनगर, धाराशिव, अमरावती, अकोला, नागपूर, परभणी, रायगड, नंदूरबार | युनिवर्सल सोम्पो जनरल इंन्शुरन्स कं. लि. पत्ता :१०३, पहिला मजला , आकृती स्टार,MIDC सेन्ट्रल रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई-४०००९३ टोल फ्री क्र. : १८०० २२ ४०३०/१८०० २०० ४०३० ई-मेल : contactusuniversalsompo.com |
| ४ | नांदेड, हिंगोली, यवतमाळ, सिंधुदूर्ग | भारतीय कृषि विमा कंपनी लिमिटेड, मुंबई क्षेत्रिय कार्यालय, स्टॉक एक्चेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रिट, फोर्ट मुंबई - ४०००२३ टोल फ्री क्र. : १८००४१९५००४. दूरध्वनी क्र. ०२२ - ६१७१०९१२ ई-मेल - pikvimaaicofindia.com |
| ५ | ठाणे, पालघर, धुळे, पुणे, सांगली, लातूर, बुलढाणा | बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे क्षेत्रिय कार्यालय, ४ था मजला, टॉवर नं. ०७, कॉमर झोन IT पार्क, सम्राट अशोक पथ, येरवडा जेल रोड, पुणे ४११ ००६. टोल फ्री क्र. : १८०० २०९ ५९५९ ई-मेल - bagichelpbajajallianz.co.in |
| ६ | नाशिक, अहमदनगर, सोलापूर, सातारा, बीड, वाशिम | बजाज अलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे क्षेत्रिय कार्यालय, ४ था मजला, टॉवर नं. ०७, कॉमर झोन IT पार्क, सम्राट अशोक पथ, येरवडा जेल रोड, पुणे ४११ ००६. टोल फ्री क्र. : १८०० २०९ ५९५९ ई-मेल - bagichelpbajajallianz.co.in |
| ७ | कोल्हापुर, वर्धा, रत्नागिरी | भारतीय कृषि विमा कंपनी लिमिटेड, मुंबई क्षेत्रिय कार्यालय, स्टॉक एक्चेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रिट, फोर्ट मुंबई - ४०००२३ टोल फ्री क्र. : १८००४१९५००४ दूरध्वनी क्र. ०२२ - ६१७१०९१२ ई-मेल - pikvimaaicofindia.com |

**विमा सहभागाची अंतिम मुदत-**

मृग बहार सन २०२४ मध्ये फळपिक निहाय योजनेमध्ये शेतकऱ्यांनी (कर्जदार/बिगर कर्जदार) खालील वेळापत्रकाप्रमाणे सहभागाचा अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

| **मृग बहार** | | **आंबिया बहार** | |
|---|---|---|---|
| मोसंबी | दि. ३० जून | द्राक्ष | दि. १५ ऑक्टोबर |
| | | मोसंबी | दि. ३१ ऑक्टोबर |
| | | केळी | |
| | | पपई | |
| संत्रा | * २५ जून (केवळ मृग २०२४ करीता) १४ जून (मृग २०२५ साठी ) | संत्रा | दि. ३० नोव्हेंबर |
| द्राक्ष - (क) | | काजू | |
| पेरु | | आंबा (कोकण) | |
| लिंबू | | | |
| चिकू | दि. ३० जून | आंबा (इतर जिल्हे) | दि. ३१ डिसेंबर |
| डाळिंब | दि. १४ जुलै | डाळिंब | दि.१४ जानेवारी |
| सीताफळ | दि. ३१ जुलै | स्ट्रॉबेरी | दि.१४ ऑक्टोबर |

*टिप - केवळ सन २०२४ मृग बहारातील संत्रा, पेरु, लिंबू व द्राक्ष (क) या फळपिकांसाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत दि. २५ जून २०२४ राहील.

मृग बहार (२०२४-२५ व २०२५-२६) फळपिक निहाय हवामान धोके व विमा संरक्षण कालावधी.

| अ. क्र. | फळ पिके | समाविष्ट धोके | विमा संरक्षण कालावधी | विमा संरक्षित रक्कम (रु. प्रति हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| १ | संत्रा | १) कमी पाऊस<br>२) पावसाचा खंड | १५ जून ते १५ जुलै<br>१६ जुलै ते १५ ऑगस्ट | १,००,००० |
| २ | मोसंबी | १) कमी पाऊस<br>२) पावसाचा खंड | ०१ जुलै ते ३१ जुलै<br>०१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट | १,००,००० |
| ३ | पेरु | १) कमी पाऊस<br>२) पावसाचा खंड व जास्त तापमान | १५ जून ते १४ जुलै<br>१५ जुलै ते १५ ऑगस्ट | ७०,००० |
| ४ | चिकू | जास्त आर्द्रता व जास्त पाऊस | ०१ जुलै ते ३० सप्टेंबर | ७०,००० |
| ५ | डाळिंब | १) पावसाचा खंड<br>२) जास्त पाऊस | १५ जुलै ते १५ ऑक्टोबर<br>१६ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर | १,६०,००० |
| ६ | लिंबू | १) कमी पाऊस २) पावसाचा खंड | १५ जून ते १५ जुलै, १६ जुलै ते १५ ऑगस्ट | ८०,००० |
| ७ | सिताफळ | १) पावसाचा खंड २) जास्त पाऊस | १ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर | ७०,००० |
| ८ | द्राक्ष -(क) | पाऊस, आर्द्रता व किमान तापमान | १५ जून ते १५ नोव्हेंबर | ३,८०,००० |

आंबिया बहार (२०२४-२५ व २०२५-२६) मध्ये फळपिक निहाय हवामान धोके व विमा संरक्षण कालावधी

| अ.क्र. | फळपिके | समाविष्ट धोके | विमा संरक्षण कालावधी | विमा संरक्षित रक्कम (रु. प्रति हेक्टर) |
|---|---|---|---|---|
| १ | संत्रा | १) अवेळी पाऊस<br>२) कमी तपामान<br>३) जादा तापमान | ०१ डिसेंबर ते १५ जानेवारी<br>१६ जानेवारी ते २८ फेब्रुवारी<br>०१ मार्च ते ३१ मे | १,००,००० |
| | | ४) गारपीट | ०१ जानेवारी ते ३० एप्रिल | ३३,००० |
| २ | मोसंबी | १) अवेळी पाऊस<br>२) जास्त तापमान<br>३) जास्त पाऊस | ०१ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर<br>०१ मार्च ते ३१ मार्च<br>१५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर | १,००,००० |
| | | ४) गारपीट | ०१ जानेवारी ते ३० एप्रिल | ३३,००० |
| ३ | डाळिंब | १) अवेळी पाऊस<br>२) जादा तापमान<br>३) जास्त पाऊस | १५ जानेवारी ते ३१ मे<br>०१ एप्रिल ते ३१ मे<br>०१ जून ते ३१ जुलै | १,६०,००० |
| | | ४) गारपीट | १५ जानेवारी ते ३० एप्रिल | ५३,००० |
| ४ | काजू | १) अवेळी पाऊस<br>२) कमी तापमान | ०१ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी<br>०१ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी | १,२०,००० |
| | | ३) गारपीट | ०१ जानेवारी ते ३० एप्रिल | ४०,००० |
| ५ | केळी | १) कमी तापमान<br>२) वेगाचा वारा<br>३) जादा तापमान | ०१ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी<br>०१ मार्च ते ३१ जुलै<br>०१ एप्रिल ते ३१ मे | १,७०,००० |
| | | ४) गारपीट | ०१ जानेवारी ते ३० एप्रिल | ५७,००० |
| ६ | द्राक्ष | १) अवेळी पाऊस<br>२) दैनंदिन कमी तापमान | १६ ऑक्टोबर ते ३० एप्रिल<br>०१ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी | ३,८०,००० |
| | | ३) गारपीट | ०१ जानेवारी ते ३१ मे | १,२७.००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | आंबा<br>(कोकण) | १) अवेळी पाऊस<br>२) कमी तापमान<br>३) जास्त तापमान<br>४) वेगाचा वारा | ०१ डिसेंबर ते १५ मे<br>०१ जानेवारी ते १० मार्च<br>०१ मार्च ते १५ मे<br>१६ एप्रिल ते १५ मे | १,७०,००० |
| | | ५) गारपीट | ०१ फेब्रुवारी  ते ३१ मे | ५७,००० |
| | आंबा (इतर जिल्हे) | १) अवेळी पाऊस<br>२) कमी तापमान<br>३) जास्त तापमान<br>४) वेगाचा वारा | ०१ जानेवारी  ते ३१ मे<br>०१ जानेवारी  ते २८ फेब्रुवारी<br>०१ मार्च ते ३१ मार्च<br>०१ एप्रिल ते ३१ मे | १,७०,००० |
| | | ५) गारपीट | ०१ फेब्रुवारी ते ३१ मे | ५७,००० |
| ८ | स्ट्रॉबेरी | १) अवेळी पाऊस व सापेक्ष आर्द्रता<br>२) अवेळी पाऊस, सापेक्ष आर्द्रता व जास्त तापमान<br>३) कमी तापमान | १५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर<br>०१ फेब्रुवारी ते ३० एप्रिल<br>०१ डिसेंबर ते ३१ मार्च | २,४०,००० |
| | | ४) गारपीट | ०१ जानेवारी ते ३० एप्रिल | ८०,००० |
| ९ | पपई | १) कमी तापमान<br>२) वेगाचा वारा<br>३) जास्त पाऊस व आर्द्रता | ०१ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी<br>०१ फेब्रुवारी ते ३० जून<br>१५ जून ते ३० सप्टेंबर | ४०,००० |
| | | ४) गारपीट | ०१ जानेवारी ते ३० एप्रिल | १३,००० |





या योजनेअंतर्गत राज्य शासनाने महावेध प्रकल्पातंर्गत कार्यान्वित केलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रावर नोंदविल्या गेलेल्या हवामानाची आकडेवारी व फळपिकनिहाय निश्चित करण्यात आलेले हवामान धोके यांची सांगड घालून शेतकऱ्यांना संबंधित विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

शेतकऱ्यांनी अधिसूचित फळपिकांच्या हवामान धोक्यांची तसेच त्यांना भरवयाच्या विमा हप्त्याची माहिती करून घेऊन विहित मुदतीमध्ये नजीकच्या ई-सेवा केंद्र किंवा बँक/ वित्तीय संस्था यांच्याशी संपर्क साधून सहभाग नोंदवावा. हंगामनिहाय अधिसूचीत फळपिकांचे हवामान धोके, विमा संरक्षित रक्कम, विमा संरक्षण कालावधी, विमा हप्ता इत्यादी बाबत सविस्तर माहितीचा शासन निर्णय दिनांक १२ जून, २०२४ महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच ई सेवा केंद्र व बँक स्तरावरही याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्याच्या सूचना कृषी विभागाने सहभागी विमा कंपन्यांना दिल्या आहेत. शेतकऱ्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विमा कंपनीचे जिल्हा/तालुका कार्यालय किंवा कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. ✪

## बियाणे, खतांची साठेबाजी होत असल्यास करा व्हॉट्सअ‍ॅप

**राज्यात चालू खरीप हंगामासाठी खते, किटकनाशके व बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. मात्र साठेबाजी किंवा लिंकिंग होत असल्यास शेतकऱ्यांनी व्हॉट्सअ‍ॅपद्वारे तक्रार करावी, असे आवाहन कृषी आयुक्तालयाने केले आहे.**

### ■ तक्रारसाठी पर्याय

व्हॉट्सअ‍ॅपद्वारे तक्रार देण्यासाठी ९८२२४४६६५५, भ्रमणध्वनीद्वारे तक्रार देण्यासाठी १८००२३३४०००, ई-मेलद्वारे तक्रार देण्यासाठी controlroom.qc.maharashtra@gmail.com

### ■ अशी नोंदवा व्हॉट्सअ‍ॅपद्वारे तक्रार

- निविष्ठाविषयक गुणवत्ता, किंमत, साठेबाजी व लिंकिंग याबाबत तक्रारीचा संक्षिप्त तपशील आधी साध्या कागदावर लिहावा.
- तक्रारीत शेतकऱ्याचे नाव , पत्ता, संपर्क क्रमांक, समस्या नमूद करावी.
- तक्रार लिहिलेल्या कागदाचे छायाचित्र काढून ते आयुक्तालयाकडे व्हॉट्सअ‍ॅपद्वारे ९८२२४४६६५५ या क्रमांकावर पाठवावे.



# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

■ **योजनेचे स्वरुप :** राज्यात शेती व्यवसाय करताना होणारे अपघात रस्ता/ रेल्वे अपघात, पाण्यात बूडून मृत्यू, जंतूनाशके हाताळताना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरून पडून झालेला अपघात, सर्पदंश व विंचुदंश, नक्षलवाद्यांकडून झालेल्या हत्या, जनावरांच्या खाल्ल्यामुळे/ चावण्यामुळे जखमी/ मृत्यू, दंगल, अन्य कोणतेही अपघात तसेच अपघाताच्या व्याख्येनूसार कोणत्याही अनपेक्षित, आकस्मिक दुर्दैवी अपघातामुळे होणारे मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास सदर योजनेतून अपघातग्रस्त शेतकरी/ शेतकऱ्याच्या वारसदारास गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतून लाभ देण्यात येईल.

■ **योजनेची व्याप्ती व लाभार्थी पात्रता :** कृषी गणनेनुसार निर्धारीत केलेल्या सर्व वहितीधारक खातेदार असलेले शेतकरी व वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्यांच्या कुटुंबातील कोणताही १ सदस्य (आई-वडील, शेतकऱ्याची पती/ पत्नी, मुलगा व अविवाहित मुलगी यापैकी कोणताही एक व्यक्ती) असे १० ते ७५ वयोगटातील एकूण २ जणांचा समावेश असेल.

■ **वारसदार :** १) अपघातग्रस्ताची पत्नी/ अपघातग्रस्त स्त्रीचा पती २) अपघातग्रस्ताची अविवाहित मुलगी ३) अपघातग्रस्ताची आई ४) अपघातग्रस्ताचा मुलगा ५) अपघातग्रस्ताचे वडील ६) अपघातग्रस्ताची सून ७) अन्य कायदेशीर वारसदार.

■ **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत मिळणारे लाभ नुकसान भरपाई.**

| अपघाताची बाब | नुकसान भरपाई (रु.लाख) |
|---|---|
| अपघाती मृत्यू | २,००,०००/- |
| अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे | २,००,०००/- |
| अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे | २,००,०००/- |
| अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी होणे | १,००,०००/- |

■ **योजनेमध्ये समाविष्ट बाबी :**

१) रस्ता/रेल्वे अपघात २) पाण्यात बूडून मृत्यू ३) जंतूनाशके हाताळताना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा ४) विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात. ५) वीज पडून मृत्यू ६) खून ७) उंचावरुन पडून झालेला अपघात ८) सर्पदंश व विंचूदंश ९) नक्षलवाद्यांकडून झालेल्या हत्या १०) जनावरांच्या खाल्ल्यामुळे / चावण्यामुळे जखमी/ मृत्यू ११) दंगल १२) बाळंतपणातील मृत्यू १३) अन्य कोणतेही अपघात.

■ **योजनेमध्ये समाविष्ट नसणाऱ्या बाबी :**

१) नैसर्गिक मृत्यू २) विमा कालावधीपुर्वीचे अपंगत्व ३) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वत:ला जखमी करुन घेणे ४) गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करताना झालेला अपघात ५) अंमली पदार्थाच्या अमलाखाली असताना झालेला अपघात ६) भ्रमिष्टपणा ७) शरीरांतर्गत रक्तस्त्राव ८) मोटार शर्यतीतील अपघात ९) युध्द १०) सैन्यातील नोकरी ११) जवळच्या लाभधारकाकडून झालेला खून.

■ **सदर योजना विहित कालावधीतील प्रत्येक दिवसाच्या २४ तासांसाठी लागू राहील.**

- वहितीधारक खातेदार असलेले शेतकरी व शेतकऱ्यांच्या कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले कोणताही १ सदस्य यापैकी कोणत्याही व्यक्तिला केव्हाही अपघात झाला किंवा अपंगत्व आले तरीही ते या योजनेंतर्गत लाभासाठी पात्र राहतील.
- सदर योजनेंतर्गत लाभास पात्र असणाऱ्या शेतकऱ्याने/ शेतकऱ्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने अथवा वारसदाराने शासनाच्या अन्य विभागांकडून अपघातग्रस्तांसाठी कार्यान्वित असलेल्या योजनेचा लाभ घेतला असल्यास सदर लाभार्थी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत देय लाभास पात्र ठरणार नाहीत.
- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाभ प्राप्त होणेसाठी अर्जासोबत खालील कागदपत्रे सादर करावी.

१) ७/१२ उतारा २) मृत्यूचा दाखला

३) शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गांव नमुना नं. ६- क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद.

४) शेतकऱ्याच्या वयाच्या पडताळणीकरिता शाळा सोडल्याचा दाखला/ आधारकार्ड / निवडणूक ओळखपत्र. ज्या कागदपत्राआधारे ओळख/ वयाची खात्री होईल असे कोणतेही कागदपत्रे.

५) प्रथम माहिती अहवाल/ स्थळ पंचनामा/ पोलीस पाटील अहवाल.

६) अपघाताच्या स्वरुपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे.

■ **विमा प्रस्ताव सादर/ मंजूर करण्याबाबत पध्दती :**

१) जेव्हा शेतकऱ्यांचे अपघाताचे प्रकरण निदर्शनास येईल तेव्हा संबंधित अपघातग्रस्त शेतकरी/ शेतकऱ्यांचे वारसदार यांनी सर्व निर्धारीत कागदपत्रांसह परिपूर्ण विमा प्रस्ताव संबंधित तालुका कृषी अधिकारी

■ अपघाताच्या स्वरुपानूसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे

| अ.क्र. | अपघाताचे स्वरुप | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | रस्ता/रेल्वे अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, विमा संरक्षित व्यक्ती वाहन चालविताना अपघात झाल्यास त्याचा मोटार वाहन परवाना. |
| २ | पाण्यामध्ये बुडून मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, बुडून बेपत्ता झाल्यास फक्त प्रथम माहिती अहवाल व क्षतीपूर्ती बंधपत्र आवश्यक. |
| ३ | जंतूनाशक अथवा अन्य कारणामुळे विषबाधा | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, रासायनिक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल). |
| ४ | विजेचा धक्का अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल. |
| ५ | विज पडून मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल. |
| ६ | खून | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, रासायनीक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल), दोषारोप पत्र |
| ७ | उंचावरून पडून झालेला मृत्यू | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, पोलिस अंतिम अहवाल. |
| ८ | सर्पदंश/ विंचू दंश | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, वैद्यकीय उपचारा पुर्वीच निधन झाल्याने पोस्ट मॉर्टेम झाले नसल्यास या अहवालातून सूट मात्र वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र शासकीय आरोग्य केंद्र अधिकाऱ्याकडून प्रतिस्वाक्षरीत असणे आवश्यक. |
| ९ | नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, नक्षलवादी हत्येसंदर्भातील कार्यालयीन कागदपत्र |
| १० | **जनावरांच्या हल्लयामुळे / चावण्यामुळे जखमी / मृत्यू** | |
| | अ) जनावरांच्या चावण्यामूळे रेबिज होऊन मृत्यू | औषधोपचाराची कागदपत्रे, वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र |
| | ब) जखमी होऊन मृत्यू क) जनावरांच्या हल्ल्यात मृत्यू होऊन शव न मिळणे | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम, क्षतीपूर्ती बंधपत्र आवश्यक |
| ११ | दंगल | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, दंगली बाबतची कार्यालयीन कागदपत्रे. |
| १२ | बाळंतपणातील मृत्यू | बाळंतपणात मृत्यू झाला असलेबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र शासकीय आरोग्य केंद्र अधिकाऱ्याकडून प्रतिस्वाक्षरीत केलेले |
| १३ | अन्य कोणतेही अपघात | इन्क्वेस्ट पंचनामा, पोस्टमार्टम अहवाल, पोलिस अंतिम अहवाल. |
| १४ | अपंगत्वाच्या लाभाच्या पुराव्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे | १) अपंगत्व अथवा अवयव निकामी होण्याचे कारणाबाबचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र अथवा दवाखान्याच्या नोंदी<br>२) प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र/ जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिस्वाक्षरीसह कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र |
| **टिप :** १) वरील कागदपत्र मुळ किंवा राजपत्रित अधिकारी यांनी सांक्षाकीत केलेले अथवा स्वयंसाक्षांकीत असल्यास ग्राह धरण्यात येईल. २) मृत्यू कारणाची नोंद सक्षम प्राधिकाऱ्याने स्पष्ट केली असल्यास रासायनिक विश्लेषण अहवाल (व्हिसेरा अहवाल) या कागदपत्रांची आवश्यकता राहणार नाही. | | |

यांचेकडे ३० दिवसांच्या आत सादर करावा.

२) अपघातग्रस्त शेतकऱ्याबाबत प्राथमिक माहिती प्राप्त झाल्यावर सखोल चौकशी करण्यासाठी संबंधित महसूल अधिकारी, पोलीस अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्या पथकाने प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी करून त्याबाबतचा अहवाल तहसिलदार यांना घटना घडल्यापासून ८ दिवसांच्या आत सादर करावा.

३) तालुका कृषी अधिकारी यांनी प्राप्त झालेल्या विमा प्रस्तावांची छाननी करुन पात्र विमा प्रस्ताव संबंधित तहसिलदार यांचेकडे सादर करावा.

४) तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीमध्ये ३० दिवसाच्या आत संबंधित शेतकरी/ शेतकरी कुटुंबाच्या वारसदारांना मदत देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल व यानंतर संबंधित तालुका कृषी अधिकारी यांचेमार्फत अपघातग्रस्त शेतकरी/ वारसदारांच्या बँक खात्यात ECS द्वारे निधी अदा करण्यात येईल.

५) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत वारसदारांची निवड पुढीलप्रमाणे करण्यात येईल.

१) अपघातग्रस्ताची पत्नी/ अपघातग्रस्त स्त्रीचा पती २) अपघातग्रस्ताची अविवाहित मुलगी ३) अपघातग्रस्ताची आई ४) अपघातग्रस्ताचा मुलगा ५) अपघातग्रस्ताचे वडील ६) अपघातग्रस्ताची सून ७) अन्य कायदेशीर वारसदार

■ **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना कार्यान्वयीन यंत्रणा :**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजने अंतर्गत शेतकरी/ शेतकऱ्याचे वारसदार यांना तातडीने मदत मिळण्यासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली अपिलिय समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

✪

# बिरसा मुंडा कृषी क्रांति योजना





**योजनेचा उद्देश :** अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करुन देणे.

**समाविष्ट जिल्हे : टि.एस.पी.–** ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, व गडचिरोली या १६ जिल्ह्यात योजना राबविण्यात येते.

**ओ.टि.एस.पी.–** ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापुर, सातारा, छ. संभाजीनगर, जालना, बीड, लातुर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, व गडचिरोली या ३० जिल्ह्यात योजना राबविण्यात येते.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. लाभार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी असणे आवश्यक.
२. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.
३. नवीन विहिरीचा लाभ घ्यावयाचा असल्यास शेतकऱ्याकडे त्याच्या स्वत:चे नावे किमान ०.४० हेक्टर व नविन विहिर खोदणे ही बाब वगळून योजनेतील अन्य बाबींसाठी किमान ०.२० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे.
४. शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगर पंचायत, नगरपालिका व महानगर पालिका क्षेत्राबाहेरील)
५. लाभार्थ्यांचे स्वत:चे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.
६. अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/– पेक्षा जास्त नसावे.
७. ज्या शेतकऱ्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये १,५०,०००/– चे मर्यादेत आहे अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसिलदार यांचेकडून मागील वर्षाचा उत्पन्नाचा अद्यावत दाखला घेणे व अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.
८. लाभार्थीस योजनेअंतर्गत लाभ देण्यासाठी ग्रामसभेची शिफारस आवश्यक आहे.

**योजनेचे स्वरुप/घटकनिहाय आर्थिक मापदंड :** अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना खालील ९ बाबींवर योजनेअंतर्गत अनुदान अनुज्ञेय आहे.

| अ. क्र. | बाब | अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन विहीर | २,५०,०००/– |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५०,०००/– |
| ३ | इनवेल बोअरींग | २०,०००/– |
| ४ | वीज जोडणी आकार | १०,०००/– |
| ५ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | १,००,०००/– |
| ६ | परसबाग | ५००/– |
| ७ | सुक्ष्म सिंचन संच | ठिबक ५०,०००/–<br>तुषार २५,०००/– |
| ८ | पंप संच | २०,०००/– |
| ९ | एचडीपीई/पीव्हीसी पाईप्स | ३०,०००/– |

- **नवीन विहीर पॅकेज–** नवीन विहीर, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक, पंप संच, एचडीपीई/पीव्हीसी पाईप्स असे एकूण रु. ३.३५ ते ३.६० लाख.
- **जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज –** जुनी विहीर दुरुस्ती, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक, पंप संच, एचडीपीई/पीव्हीसी

पाईप्स असे एकूण रु. १.३५ ते १.६० लाख.

- **शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज –** शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक, पंप संच, एचडीपीई/पीव्हीसी पाईप्स असे एकूण रु. १.८५ ते २.१० लाख.
- लाभार्थ्याकडे जर काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ विहीत मर्यादेत देण्यात येईल.
- उपरोक्त घटकांचा लाभ घेतल्यानंतरही लाभार्थ्याने ईनवेल बोअरींग व परसबाग या घटकांची मागणी केल्यास सदर घटकांचा अतिरिक्त लाभ देण्यात येईल.
- **सोलरपंपासाठी अनुदान** : जर शेतकऱ्यास महावितरण कंपनीकडून सोलरपंप मंजूर झाला असेल तर पंपसंच व वीज जोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु. ३०,०००) लाभार्थी हिश्श्याची रक्कम महावितरण कंपनीस अदा करता येईल.

**योजनेची अंमलबजावणी :** क्षेत्रीय स्तरावर सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

**घटक अंमलबजावणी :**

१) **नवीन विहीर** : नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र / राज्य / जिल्हा परिषद अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेतून नवीन सिंचन विहीरीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच, यापुर्वी शासकीय योजनेतून घेतलेल्या व अर्धवट राहिलेल्या अपूर्ण विहीरीचे काम करण्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. लाभार्थ्याच्या ७/१२ वर तसेच शेतात प्रत्यक्ष विहीर असल्यास या घटकाचा लाभ घेता येणार नाही. नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासून ५०० फूटाचे अंतरामध्ये दूसरी विहीर नसावी. भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे वरीष्ठ भू वैज्ञानिक यांचेकडील पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

२) **जुनी विहीर दुरुस्ती :** जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर विहिरीची नोंद असावी. विहीर दुरुस्तीच्या कामास उच्चतम अनुदान मर्यादेपेक्षा (रु. ५०,०००/–) अधिक रक्कम लागल्यास ती रक्कम लाभार्थीने स्वत: उभी करावयाची आहे.

३) **इनवेल बोअरींग :** नवीन विहीर/ जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने इनवेल बोअरींगची मागणी केल्यास रु. २०,०००/– च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. इनवेल बोअरींगचे काम करताना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता (Feasibility Report) भुजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावा.

४) **वीज जोडणी आकार :** नवीन विहीर पॅकेज/ जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज/ शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेजमधील तथा आवश्यकतेनुसार केवळ वीजजोडणी मागणी करणाऱ्या लाभार्थ्याने विद्युत वितरण कंपनीकडे कोटेशन भरल्याची पावती सादर केल्यानंतर खातरजमा करुन लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्स्फरद्वारे विहीत अनुदान मर्यादित अनुदान वर्ग करण्यात येईल.

५) **शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण :** ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) योजनेचे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्याने शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण या घटकाची मागणी केल्यास राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सुचना व आर्थिक मापदंडानुसार प्रत्यक्ष खर्च किंवा रु. १,००,०००/– यापेक्षा जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

६) **सुक्ष्म सिंचन संच :** बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेतून सुक्ष्मसिंचन या बाबीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना प्रथमत: प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रति थेंब अधिक पिक योजनेमधून लाभ घेणे अपेक्षित असून या योजनेमधून फक्त Top up साठी अनुदान देण्यात येईल.

७) **पंपसंच (डिझेल/विद्युत) :** पंपसंचाच्या लाभासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना पंपसंच खरेदीकरिता कृषी अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांची पूर्वसंमती घ्यावी. सदर लाभार्थ्यांनी एक महिन्याच्या कालावधीत पंपसंचाची खरेदी करणे आवश्यक राहील अन्यथा संबंधीत शेतकऱ्यांची पूर्वसंमती रद्द करण्यात येईल. केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम संस्थांनी पंपसंचाची रितसर तपासणी (testing) करुन ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार (standards) असल्याचे प्रमाणित केले असेल त्याच पंपसंचाची खरेदी पूर्वसंमती प्राप्त लाभार्थी शेतकऱ्याने करावयाची आहे.

८) **पाईप (पीव्हीसी/एचडीपीई) :** सिंचनासाठी मान्यताप्राप्त प्रकाराच्या आय.एस.आय.मार्क पाईपची खरेदी लाभार्थ्यांनी पूर्व संमतीने त्यांच्या पसंतीनुसार करावी. लाभार्थ्याकडे सिंचनासाठी स्त्रोत उपलब्ध असल्याची खात्री करुन पाईपच्या किमतीच्या १०० टक्के किंवा उच्चतम रु. ३००००/– च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

९) **परसबाग :** आदिवासी शेतकऱ्यांना कुटुंबासाठी लागणारा भाजीपाला त्यांचे घराभोवतीच पिकविणे शक्य आहे. यासाठी शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचा भाजीपाला उदा. भेंडी, गवार, चवळी, दुधी भोपळा, डांगर भोपळा, शेवगा, काकडी, दोडका इ. बियाणांचे किट लाभार्थ्यांनी महाबीज/ एनएससी इत्यादी बियाणे उत्पादक कंपनींच्या अधिकृत परवानाधारक विक्रेत्याकडून खरेदी करण्यासाठी जास्तीत जास्त रु. ५००/– पर्यंत लाभ देता येईल. या योजनेसाठी महा–डीबीटी पोर्टलचे mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या संकेतस्थळावर शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीचे कृषी विभागाशी संपर्क साधावा.

✪

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना





**योजनेचा उद्देश :** अनुसूचित जाती /नवबौध्द प्रवर्गातील शेतकऱ्यांना सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करुन देणे.

**समाविष्ट जिल्हे :** मुंबई वगळता राज्यातील इतर सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये सदर योजना राबविण्यात येत आहे.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. लाभार्थी हा अनुसूचित जाती/ नवबौध्द शेतकरी असला पाहिजे.

२. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

३. ज्या शेतकऱ्यांना नवीन विहीर या घटकाचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्यासाठी किमान ०.४० हे शेतजमीन असणे आवश्यक आहे. सामुहिक शेतजमीन किमान ०.४० हे धारण करणारे एकत्रीत कुटुंब नवीन विहीर या घटकाचा लाभ घेण्यासाठी पात्र असेल.

४. ज्या शेतकऱ्यांना नवीन विहीर व्यतिरीक्त इतर घटकांचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांच्यासाठी किमान ०.२० हे शेतजमीन असणे आवश्यक आहे.

५. सदर योजनेअंतर्गत कमाल शेतजमिनीची अट ६.०० हे. आहे.

६. शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगरपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्राबाहेरील)

७. लाभार्थ्यांचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

८. अनुसूचित जाती/ नवबौध्द शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.१,५०,०००/– पेक्षा जास्त नसावे.

९. ज्या शेतकऱ्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये १,५०,०००/– चे मर्यादेत आहे अशा शेतकऱ्यांनी संबंधीत तहसिलदार यांचेकडून मागील आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा अद्यावत दाखला घेऊन तो अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१०. लाभार्थीस योजनेअंतर्गत लाभ देण्यासाठी ग्रामसभेची शिफारस आवश्यक आहे.

**योजनेचे स्वरुप/घटकनिहाय आर्थिक मापदंड :** अनुसूचित जाती/ नवबौध्द प्रवर्गातील शेतकऱ्यांना खालील ७ बाबींवर योजनेअंतर्गत अनुदान अनुज्ञेय आहे.

| अ. क्र. | बाब | अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन विहीर | २,५०,०००/– |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५०,०००/– |
| ३ | इनवेल बोअरींग | २०,०००/– |
| ४ | वीज जोडणी आकार | १०,०००/– |
| ५ | शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | १,००,०००/– |
| ६ | सूक्ष्म सिंचन संच | ठिबक ५०,०००/–<br>तुषार २५,०००/– |
| ७ | पंप संच | २०,०००/– |

- **नवीन विहीर पॅकेज–** नवीन विहीर, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक, पंप संच, असे एकूण रु. ३.०५ ते ३.३० लाख.
- **जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज –** जुनी विहीर दुरुस्ती, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक, पंप संच , असे एकूण रु. १.०५ ते १.३० लाख.
- **शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज –** शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, तुषार किंवा ठिबक, पंप संच असे एकूण रु. १.५५ ते १.८० लाख.
- लाभार्थ्याकडे जर काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ विहीत मर्यादेत देण्यात येईल.
- उपरोक्त घटकांचा लाभ घेतल्यानंतरही लाभार्थ्याने ईनवेल बोअरींग या घटकाची मागणी केल्यास सदर घटकांचा अतिरिक्त





लाभ देण्यात येईल.

- **सोलरपंपासाठी अनुदान–** जर शेतकऱ्यास महावितरण कंपनीकडून सोलरपंप मंजूर झाला असेल तर पंपसंच व वीज जोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु. ३०,०००) लाभार्थी हिश्श्याची रक्कम महावितरण कंपनीस अदा करता येईल.

**योजनेची अंमलबजावणी :** क्षेत्रीय स्तरावर सदर योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

**घटक अंमलबजावणी :**

१) **नवीन विहीर :** नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र / राज्य / जिल्हा परिषद अथवा इतर कोणत्याही शासकीय योजनेतून नवीन सिंचन विहिरीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच, यापूर्वी शासकीय योजनेतून घेतलेल्या व अर्धवट राहिलेल्या अपूर्ण विहिरीचे काम करण्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. लाभार्थ्याच्या ७/१२ वर तसेच शेतात प्रत्यक्ष विहीर असल्यास या घटकाचा लाभ घेता येणार नाही. नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासून ५०० फूटाचे अंतरामध्ये दूसरी विहीर नसावी. भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे वरीष्ठ भू वैज्ञानिक यांचेकडील पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

२) **जुनी विहिर दुरुस्ती :** जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर विहीरीची नोंद असावी. विहीर दुरुस्तीच्या कामास उच्चतम अनुदान मर्यादेपेक्षा (रु.५०,०००/–) अधिक रक्कम लागल्यास ती रक्कम लाभार्थीने स्वत: उभी करावयाची आहे.

३) **इनवेल बोअरींग :** नवीन विहीर/ जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने इनवेल बोअरींगची मागणी केल्यास रु. २०,०००/– च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. इनवेल बोअरींगचे काम करताना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता (Feasibility Report) भूजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावा.

४) **वीज जोडणी आकार :** नवीन विहीर पॅकेज/ जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज/ शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेजमधील तथा आवश्यकतेनुसार केवळ वीजजोडणी मागणी करणाऱ्या लाभार्थ्याने विद्युत वितरण कंपनीकडे कोटेशन भरल्याची पावती सादर केल्यानंतर खातरजमा करुन लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात इलेक्ट्रॉनिक फंड ट्रांसफरव्दारे विहीत अनुदान मर्यादेत अनुदान वर्ग करण्यात येईल.

५) **शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण :** ज्या शेतकऱ्यास ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्याने शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण या घटकाची मागणी केल्यास राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सूचना व आर्थिक मापदंडानुसार प्रत्यक्ष खर्च किंवा रु. १,००,०००/– यापेक्षा जी रक्कम कमी असेल त्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील.

६) **सूक्ष्म सिंचन संच :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या योजनेतून सूक्ष्म सिंचन या बाबीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना प्रथमत: प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना प्रति थेंब अधिक पिक योजनेमधून लाभ घेणे अपेक्षित असून या योजनेमधून फक्त Top up साठी अनुदान देण्यात येईल.

७) **पंपसंच (विद्युत) :** पंपसंचाच्या लाभासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना पंपसंच खरेदीकरिता कृषी अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांची पूर्वसंमती घ्यावी. सदर लाभार्थ्यांनी एक महिन्याच्या कालावधीत पंपसंचाची खरेदी करणे आवश्यक राहील अन्यथा संबंधित शेतकऱ्यांची पुर्वसंमती रद्द करण्यात येईल. केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम संस्थांनी पंपसंचाचे रितसर तपासणी (testing) करुन ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार (standards) असल्याचे प्रमाणित केले असेल त्याच पंपसंचाची पुर्वसंमती प्राप्त लाभार्थी शेतकऱ्याने खरेदी करावयाची आहे.

या योजनेसाठी महा–डीबीटी पोर्टलचे mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या संकेतस्थळावर शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीचे कृषी विभागाशी संपर्क साधावा. ✪



# राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना : अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिके





राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल. हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पिकस्पर्धा योजना राबविण्यात येत आहे.

सदरची स्पर्धा एकाच वर्षात तालुकास्तरावर आयोजित करण्यात येते. सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पिकस्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येते.

## १. पीकस्पर्धेतील पिके :

या स्पर्धेमध्ये खालील पिकांचा समावेश आहे.

- **खरीप पिके –** भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, सूर्यफुल (एकूण ११ पिके)
- **रब्बी पिके–** ज्वारी, गहू, हरभरा, करडई, जवस (एकूण ०५ पिके)

## २. अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

पीकस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी खालील कागदपत्रांची पूर्तता संबंधीत तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे करावयाची आहे.

१) विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र–अ).
२) ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याचे चलन.
३) ७/१२, ८–अ चा उतारा .
४) जात प्रमाणपत्र (केवळ आदिवासी असल्यास).
५) पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्याने संबंधित ७/१२ वरील घोषित केलेल्या क्षेत्राचा चिन्हांकित केलेला नकाशा.
६) बँक खाते चेक/पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकीत प्रत.

## ३. अर्ज दाखल करण्याची अंतीम तारीख :

निरनिराळ्या हंगामामध्ये पीकस्पर्धेसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख खालील प्रमाणे राहील.

**खरीप हंगाम –** मूग व उडीद पिक – **३१ जुलै**

भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफुल – **३१ ऑगस्ट**

**रब्बी हंगाम –** ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस – **३१ डिसेंबर**

अर्ज दाखल करण्याच्या अंतिम तारखेच्या दिवशी शासकीय सुट्टी असल्यास त्यापुढील शासकीय सुट्टी नसलेली तारीख गृहीत धरण्यात यावी.

## ४. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क :

- पीकनिहाय (प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र) सर्वसाधारण गटासाठी रक्कम रु. ३०० व आदिवासी गटासाठी रक्कम रु. १५० राहील.
- सहभागी शेतकऱ्यांनी प्रवेश शुल्क स्वतः खालील लेखा शिर्षामध्ये शासकीय कोषागारात विहित मुदतीत जमा करावे.

| मराठी | इंग्रजी |
|---|---|
| ०४०१– पीक संवर्धन<br>१०४– शेती क्षेत्रांपासून प्राप्त जमा रकमा<br>(००) (०२) – पीकस्पर्धा योजनेखालील जमा रकमा<br>०४०१०४७३०१ | 0401- Crop Husbandry<br>104 - Receipts from gricultural Farms<br>(00) (02) - Receipts under crop competition scheme 0401047301 |

## ५. पिकस्पर्धा विजेते – बक्षिसाचे स्वरूप व वितरण

| अ. क्र | स्पर्धा पातळी | सर्वसाधारण व आदिवासी गट बक्षिस रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | पहिले | दुसरे | तिसरे |
| १ | तालुका पातळी | ५,००० | ३,००० | २,००० |
| २ | जिल्हा पातळी | १०,००० | ७,००० | ५,००० |
| ३ | राज्य पातळी | ५०,००० | ४०,००० | ३०,००० |

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान (MIDH)

**केंद्र शासनाने फलोत्पादन क्षेत्राच्या सर्वंकष विकासासाठी सन २००५-०६ पासून राष्ट्रीय फलोत्पादन अभियान या महत्वाकांक्षी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस सुरुवात केलेली आहे. सन २०१४-१५ पासून बाराव्या पंचवार्षिक योजनेतंर्गत 'एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान' हा कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम फलोत्पादन क्षेत्राच्या सर्वंकष विकासासाठी केंद्र/ राज्य हिस्सा अनुक्रमे (६०:४०) प्रमाणे राबविण्यात येतो.**



एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान  या अंतर्गत गुणवत्तापूर्ण लागवड साहित्य निर्माण करणे, नविन फळबागांची लागवड करणे, जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन करणे, सामुहिक शेततळ्यांच्या माध्यमातून सिंचन क्षमता वाढविणे, हरितगृह, शेडनेटमध्ये नियंत्रित शेती करणे, एकात्मिक अन्नद्वे व एकात्मिक किड व्यवस्थापन, सेंद्रीय शेती, मनुष्यबळ विकास, काढण्योत्तर व्यवस्थापन या बाबींसाठी अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातील विविध घटकांचे मापदंड व अर्थसहाय्याचे स्वरूप**

| अ. क्र. | घटक | ग्राह्य प्रकल्प खर्च | अर्थसहाय्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| | **अ. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान** | | |
| १ | गुणवत्तापुर्ण लागवड साहित्य<br>अ. उच्च तंत्रज्ञान आधारित रोपवाटीका तयार करणे (४ हे.) | रू. २५.०० लाख प्रति  हेक्टर | सार्वजनिक क्षेत्रासाठी १०० टक्के अर्थसहाय्य जास्तीत जास्त रु. १००.०० लाख खाजगी क्षेत्रासाठी ४० टक्के अर्थसहाय्य जास्तीत जास्त रु. ४०.०० लाख (बँक कर्जाशी निगडीत)<br>सदर रोपवाटिकेमधून गुणवत्तेची व प्रमाणिकरण केलेली कमीत कमी ५० हजार कलमे / रोपे प्रति  हेक्टर तयार करणे बंधनकारक राहील. |
| | ब. लहान रोपवाटीका तयार करणे. | रू. १५.०० लाख प्रति  हेक्टर | सार्वजनिक क्षेत्रासाठी १०० टक्के अर्थसहाय्य जास्तीत जास्त रु.१५.०० लाख खाजगी क्षेत्रासाठी ५० टक्के अर्थसहाय्य जास्तीत जास्त रु.७.५० लाख (बँक कर्जाशी निगडीत) सदर रोपवाटिकेमधून गुणवत्तेची व प्रमाणिकरण केलेली कमीत कमी २५ हजार कलमे / रोपे प्रति  हेक्टर तयार करणे बंधनकारक राहील. |
| | क. नवीन उती संवर्धन प्रयोगशाळा उभारणे | रु. २५०.०० लाख | प्रकल्प खर्चाच्या १०० टक्के (रु.२५०.०० लाख मर्यादेत) (सार्वजनिक क्षेत्र)<br>प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के (रु.१००.०० लाख मर्यादेत) (खाजगी क्षेत्र) |
| | ड. अस्तित्वात असलेल्या उतीसंवर्धन प्रयोगशाळेचे बळकटीकरण करणे | रू. २०.०० लाख प्रति युनिट | प्रकल्प खर्चाच्या १०० टक्के (रु.२०.०० लाख) (सार्वजनिक क्षेत्र)<br>खाजगी क्षेत्र प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के (रु.१०.०० लाख) |

| अ. क्र. | घटक (विदेशी पिके) | ग्राह्य प्रकल्प खर्च | | अर्थसहाय्याचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| २ | **क्षेत्र विस्तार** Exotic Crops | **ठिबकसह** | **ठिबक विरहीत** | **तीन हप्त्यात (६०:२०:२०)** |
| | ड्रॅगन फ्रुट | रु. ४.०० लाख | -- | ठिबक व आधारस्तंभासह खर्चाच्या ४० टक्के जास्तीत-जास्त १.६० लाख/हे. |
| | स्ट्रॉबेरी | रु. २.८० लाख | रु. १.२५ लाख | ठिबकसह खर्चाच्या ४० टक्के  जास्तीत-जास्त १.१२ लाख/हे. ठिबक विरहीत खर्चाच्या ५० टक्के  रु.०.६२५ लाख/हे |
| | अॅव्होकॅडो | रु. १.०० लाख | रु. ०.६० लाख | ठिबकसह खर्चाच्या ४० टक्के  जास्तीत-जास्त ०.४० लाख/हे. ठिबक विरहीत रु.०.२४ लाख/हे |

| ३. नवीन बगीच्यांची स्थापना करणे (पुष्पोत्पादन विकास कार्यक्रम) कमाल २ हेक्टर प्रति लाभार्थी | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र** | **बाब** | **प्रकल्प खर्च** | **अर्थसहाय्याचे स्वरूप** |
| अ. | कट फ्लॉवर्स | गुलाब, शेवंती, हेलईकोनिया, जरबेरा, निशिगंध | |
| | अल्पभुधारक शेतकरी | रु. १,००,०००/- प्रति हेक्टर | एकूण खर्चाच्या ४० टक्के किंवा कमाल रु. ४०,०००/- प्रति हेक्टर |
| | इतर शेतकरी | रु. १,००,०००/- प्रति हेक्टर | एकूण खर्चाच्या २५ टक्के किंवा कमाल रु. २५,०००/- प्रति हेक्टर |
| ब. | कंदवर्गीय फुले | ग्लॅडीओलस, ट्युबरोज, लिलियम, डेलिया | |
| | अल्पभुधारक शेतकरी | रु. १,५०,०००/- प्रति हेक्टर | एकूण खर्चाच्या ४० टक्के किंवा कमाल रु.६०,०००/- प्रति हेक्टर |
| | इतर शेतकरी | रु. १,५०,०००/- प्रति हेक्टर | एकूण खर्चाच्या २५ टक्के किंवा कमाल रु.३७,५००/- प्रति हेक्टर |
| क. | सुटी फुले | झेंडू, मोगरा, चाफा, ॲस्टर, शेवंती, झिनीया, जाई, जुई | |
| | अल्पभुधारक शेतकरी | रु.४०,०००/- प्रति हेक्टर | एकूण खर्चाच्या ४० टक्के किंवा कमाल रु. १६,०००/- प्रति हेक्टर |
| | इतर शेतकरी | रु.४००००/- प्रति हेक्टर | एकूण खर्चाच्या २५ टक्के किंवा कमाल रु. १०,०००/- प्रति हेक्टर |

| ४. मसाला पिके- जास्तीत जास्त ४ हे. प्रति लाभार्थी | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **बाब** | **प्रकल्प खर्च** | **अर्थसहाय्य स्वरूप** |
| अ. | बियाणे व कंदवर्गीय मसाला पिके | रु. ३०००० प्रति हे. | एकूण खर्चाच्या ४० टक्के किंवा कमाल रु.१२,०००/हे. |
| ब. | बहुवर्षिय मसाला पिके | रु. ५०००० प्रति हे. | एकूण खर्चाच्या ४० टक्के किंवा कमाल रु. २०,०००/हे. |

| ५. जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन (आंबा, चिकू, संत्रा, मोसंबी इ.) | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **बाब** | **प्रकल्प खर्च** | **अर्थसहाय्य स्वरूप** |
| अ. | जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन करुन उत्पादकतेत वाढ करणे | रु. ४०,०००/- प्रति हे. | एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रू. २०,०००/- प्रति हे. कमाल २ हेक्टरपर्यंत |

| ६. अळिंबी उत्पादन प्रकल्प | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **घटक** | **ग्राह्य प्रकल्प खर्च** | **अर्थसहाय्याचे स्वरूप** |
| अ. | अळिंबी उत्पादन प्रकल्प | रु. २०.०० लाख प्रति युनिट | खर्चाच्या ४० टक्के किंवा रू. ८.०० लाख / युनिट (बँक कर्ज निगडीत) |
| ब. | अळिंबी बीज उत्पादन प्रकल्प | रु. १५.०० लाख प्रति युनिट | खर्चाच्या ४० टक्के किंवा रू. ६.०० लाख /युनिट (बँक कर्जाशी निगडीत) |
| क. | कंम्पोस्ट मेकिंग युनिट | रु. २०.०० लाख प्रति युनिट | खर्चाच्या ४० टक्के किंवा रू.८.०० लाख / युनिट (बँक कर्ज निगडीत) |
| **७. सामुहिक शेततळे** | | | |
| अ.<br>ब.<br>क.<br>ड. | २४ मी. X २४ मी. X ४.० मी (२००० घमी)<br>३० मी. X ३० मी. X ४.७ मी. (३५०० घमी)<br>३४ मी. X ३४ मी. X ४.७ मी. (५५०० घमी)<br>१४ मी. X १४ मी. X ३.४ मी. (५०० घमी) | अ. रु. १.७५ लाख.<br>ब. रु. २.४८ लाख.<br>क. रु.३.३९ लाख.<br>ड. रु. ०.६५५ लाख. | अ. खर्चाच्या १०० % जास्तीत जास्त रु. १.७५ लाख.<br>ब. खर्चाच्या १०० % जास्तीत जास्त रु. २.४८ लाख.<br>क. खर्चाच्या १०० % जास्तीत जास्त रु. ३.३९ लाख.<br>ड. खर्चाच्या १०० % जास्तीत जास्त रु. ०.६५५ लाख |
| ८ | **वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण** | रु. १.५० लाख | खर्चाच्या ५० % जास्तीत जास्त रु. ०.७५ लाख. |



| ९. फलोत्पादन यांत्रिकीकरण | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **यंत्रसामुग्री प्रकार** | **मापदंड** | **इतर लाभार्थी अनुदान मर्यादा** | **अनु. जाती, अनु.जमाती, महिला, लहान व सीमांत शेतकरी** |
| अ. | ट्रॅक्टर २० अश्वशक्तीपर्यंत | रु.३.०० लाख प्रति युनिट | किंमतीच्या २५ टक्के जास्तीत जास्त रु.०.७५ लाख प्रति युनिट | किंमतीच्या ३५ टक्के जास्तीत जास्त रु. १.०० लाख प्रति युनिट |
| ब. | पॉवर टिलर | | | |
| i) | पॉवर टिलर (८ अश्वशक्ती व त्यापेक्षा जास्त.) | रु.१.५० लाख प्रति युनिट | किंमतीच्या ४० टक्के जास्तीत जास्त रु. ०.६० लाख प्रति युनिट | किंमतीच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु. ०.७५ लाख प्रति युनिट |
| ii) | पॉवर टिलर (८ अश्व शक्तीपेक्षा कमी) | रु.१.०० लाख प्रति युनिट | किंमतीच्या ४० टक्के जास्तीत जास्त रु. ०.४० लाख प्रति युनिट | किंमतीच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु. ०.५० लाख प्रति युनिट |

| क. | **ट्रॅक्टर / पॉवर टिलर (२० अश्वशक्तीपेक्षा कमी) चलीत अवजारे** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **यंत्रसामुग्री प्रकार** | **मापदंड** | **इतर लाभार्थी अनुदान मर्यादा** | **अनु. जाती, अनु.जमाती, महिला, लहान व सीमांत शेतकरी अनुदान मर्यादा** | **यंत्रसामुग्री यादी** |
| i) | जमिन सुधारणा, मशागत, पेरणीयोग्य जमीन तयार करण्यासाठीची अवजारे | रु.०.३० लाख प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. ०.१२ लाख प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. ०.१५ लाख प्रति युनिट | MB/ Disc Plow/Cultivator Harrow /Leveler Blade/ Cage Wheel/ Furrow Opener/ Ridger/ Weed Slasher /Laser Land Leveller /Reversible Mechanical Plough |
| ii) | पेरणी /लागवड/ काढणी /खणणी करण्यासाठीची अवजारे | रु.०.३० लाख प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.०.१२ लाख प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.०.१५ लाख प्रति युनिट | Post Hole digger / Potato Planter / Potato Digger/Tractor Drawn Reaper/ Onion Harvester/ Raised Bed Planter / Planter/ Multi Crop Planter / Ridge Furrow Planter |
| iii) | प्लॅस्टीक आच्छादन करण्यासाठी अवजारे | रु. ०.७० लाख प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.०.२८ लाख प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.०.३५ लाख प्रति युनिट | Plastic Mulch Laying Machine |
| ड. | स्वयंचलित फलोत्पादन अवजारे | रु. २.५० लाख प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. १.०० लाख प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.१.२५ लाख प्रति युनिट | Fruit Plucker / Tree pruners Fruit Harvesters / Fruit Graders / Track Trolley / Nursery Media Filling Machine / Multipurpose Hydraulic System / Power Operated / Horticulture Tools for / Pruning, Budding, Grafting, Shearing etc. |

| ई. | **पीक संरक्षण उपकरणे** | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **यंत्रसामुग्री प्रकार** | **मापदंड** | **इतर लाभार्थी** | **अनु. जाती, अनु.जमाती, महिला, लहान व सीमांत शेतकरी** |
| i) | मॅन्युअल स्प्रेअर अ.नॅपसॅक/फूट स्प्रेअर | रु. १२००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. ५००/-प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. ६००/- प्रति युनिट |
| ii) | पॉवर नॅपसॅक स्प्रेअर/पॉवर ऑपरेटेड तैवान स्प्रेअर (क्षमता ८-१२ लीटर) | रु. ६२००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.२५००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. ३१००/- प्रति युनिट |
| iii) | पॉवर नॅपसॅक स्प्रेअर/पॉवर ऑपरेटेड तैवान स्प्रेअर (क्षमता १२ ली. पेक्षा जास्त व १६ ली. पर्यंत) | रु. ७६००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. ३०००/-प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.३८००/- प्रति युनिट |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| iv | पॉवर नॅपसॅक स्प्रेअर/पॉवर ऑपरेटेड तैवान स्प्रेअर (क्षमता १६ ली. पेक्षा जास्त) | रु.२००००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.८०००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. १००००/-प्रति युनिट |
| v | ट्रॅक्टर आरोहित/ चलित स्प्रेअर (२० अश्वशक्तीपेक्षा कमी) | रु.२००००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.८०००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. १००००/- प्रति युनिट |
| vi | ट्रॅक्टर आरोहित/ चलित स्प्रेअर (३५ अश्वशक्तीपेक्षा जास्त.)/ इलेक्ट्रोस्टॅटीक स्प्रेअर | रु.१.२६ लाख प्रति युनिट | किंमतीच्या ४० टक्के जास्तीत जास्त रु.०.५० लाख प्रति युनिट | किंमतीच्या ५० टक्के जास्तीत जास्त रु. ०.६३ लाख प्रति युनिट |
| vii | इकोफ्रेंडली प्रकाश सापळा | रु.२८००/- प्रति युनिट | जास्तीत जास्त रु.१२००/-प्रति युनिट | जास्तीत जास्त रु. १४००/-प्रति युनिट |

| **१० . नियंत्रित शेती घटक अर्थसहाय्य स्वरुप** | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **बाब** | **प्रकल्प खर्च** | **अर्थसहाय्य स्वरुप** |
| i) | **हरितगृह**<br>अ) उच्च तंत्रज्ञानावर आधारित हरितगृह कमीत कमी १००८ ते जास्तीत जास्त ४००० चौ. मी. | रु. १४०० ते रु. १४६५ पर्यंत प्रति चौ. मी.(मॉडेलनुसार) | प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल ते अनुदान कमाल क्षेत्र मर्यादा ४००० चौ. मी प्रति लाभार्थी |
| | ब) सर्वसाधारण हरितगृह कमीत कमी ५६० ते जास्तीत जास्त ४००० चौ. मी. | रु. ८४४ ते रु. ९३५ पर्यंत प्रति चौ. मी. (मॉडेलनुसार) | प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल ते अनुदान कमाल क्षेत्र मर्यादा ४००० चौ. मी. प्रति लाभार्थी |
| ii) | **शेडनेट हाऊस**<br>i. NHM-RT कमीत कमी १००० ते जास्तीत जास्त ४००० चौ. मी. | रु. ५०३ ते रु. ७१० पर्यंत प्रति चौ. मी. (मॉडेलनुसार) | प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल ते अनुदान कमाल मर्यादा ४००० चौ. मी. प्रति लाभार्थी |
| | ii. NHM-FT कमीत कमी १००० ते जास्तीत जास्त ४००० चौ. मी. | रु. ३८१ ते रु. ७१० पर्यंत प्रति चौ. मी. (मॉडेलनुसार) | प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के यापैकी जे कमी असेल ते अनुदान कमाल मर्यादा ४००० चौ. मी. प्रति लाभार्थी |
| iii) | पक्षीरोधक जाळी (Anti birdnet) / गारपिट रोधक जाळी (Anti hailnet) | रुपये ३५/- प्रति चौ.मी. | ५० टक्के अनुदान ५००० चौ.मी. पर्यंत प्रति लाभार्थी देय राहिल. |
| iv) | प्लॅस्टिक आच्छादन<br>अ) सर्वसाधारण क्षेत्र | हेक्टरी रु. ३२०००/- | ५० टक्के अनुदान, कमाल रु.१६,०००/- प्रति हे. याप्रमाणे २ हेक्टर मर्यादेपर्यंत |
| | ब) डोंगराळ क्षेत्रासाठी | हेक्टरी रु. ३६८००/- | ५० टक्के अनुदान कमाल रु.१८,४००/- प्रति हे. याप्रमाणे २ हेक्टर मर्यादेपर्यंत |
| v) | प्लॅस्टीक टनेल<br>अ) सर्वसाधारण क्षेत्र | रु. ६० प्रति चौ. मी. | ५० टक्के अनुदान कमाल रु. ३०.०० प्रति चौ.मी. याप्रमाणे प्रति लाभार्थी १००० चौ.मी.पर्यंत |
| | ब) डोंगराळ क्षेत्रासाठी | रु.७५ प्रति चौ. मी. | ५० टक्के अनुदान कमाल रु. ३७.५० प्रति चौ.मी. याप्रमाणे प्रति लाभार्थी १००० चौ.मी.पर्यंत |
| vii) | पॉलीहाऊसमधील उच्च दर्जाच्या भाजीपाला लागवड साहित्यासाठी व निविष्ठांसाठी अनुदान | भाजीपाला लागवड - रु. १४० प्रति चौ. मी. | देय खर्चाच्या ५० टक्के अनुदान, जास्तीत जास्त ४००० चौ.मी. क्षेत्र मर्यादेपर्यंत |
| viii) | पॉलीहाऊस/ शेडनेट हाऊसमधील उच्च दर्जाच्या फुलपिकांच्या लागवड साहित्यासाठी व निविष्ठांसाठी अनुदान | १. ॲन्थुरियम व ऑर्चिड - रु. ७०० प्रति चौ. मी.<br>२. कार्नेशन व जरबेरा - रु. ६१० प्रति चौ. मी. | देय खर्चाच्या ५० टक्के अनुदान, जास्तीत जास्त ४००० चौ.मी. क्षेत्र मर्यादेपर्यंत |



| अ. क्र. | घटक | ग्राह्य प्रकल्प खर्च | अर्थसहाय्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ११ | **मधुमक्षिका पालन–** | | |
| | मधुमक्षिका वसाहत | रू.२०००/– प्रति वसाहत किंवा संच | खर्चाच्या ४० टक्के (रू. ८००/– प्रति वसाहत) |
| | मधुमक्षिका संच | रू.२०००/– प्रति वसाहत किंवा संच | खर्चाच्या ४० टक्के (रू. ८००/– प्रति संच) |
| १२ | **काढणीपश्चात व्यवस्थापन** | | |
| i) | प्राथमिक प्रक्रिया केंद्र (फलोत्पादित पिके) | प्रकल्प खर्च रु.२५.०० लाख (बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र– ४० टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र– ५५ टक्के |
| ii) | शितखोली (३० मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च रू. १५.०० लाख (बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| iii) | पूर्वशितकरण गृह (६ मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च रू. २५.०० लाख (बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| iv) | कांदाचाळ | रू. ७००० प्रति मे.टन | खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रू. ३५००/– प्रति मे.टन ( १५, २०, २५ मे.टन क्षमतेच्या कांदाचाळीसाठी) |
| v) | एकात्मिक पॅक हाऊस (रु. ५०.०० लाख प्रकल्प खर्च) (९ मी x १८ मी. आकारमान) | प्रकल्प खर्च रू. ५०.०० लाख (बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डांगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| vi) | शितगृह (अधिकतम ५००० मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च प्रति मे.टन<br>रू. ८०००/– (Type-I)<br>रु. १००००/– (Type-II) | (बँक कर्जाशी निगडीत)<br>अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| vii) | एकात्मिक शितसाखळी | प्रकल्प खर्च रू. ६००.०० लाख (बॅक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| viii) | रेफ्रिजेटर व्हॅन (४ ते ९ मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च रू. २६.०० लाख | (बॅक कर्जाशी निगडीत) अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के ब. डांगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| ix) | रायपनिंग चेंबर (अधिकतम ३०० मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च रू. १.०० लाख प्रति मे. टन (बॅक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| x) | पॅक हाऊस ९ x ६ मी आकार | प्रकल्प खर्च रू. ४.०० लाख | भांडवली खर्चाच्या ५० टक्के |

| **१३. फलोत्पादन पिकांसाठी पणन सुविधा स्थापन करणे** | | |
|---|---|---|
| **फिरते विक्री केंद्र** | | |
| (राज्य/राष्ट्रीय महामार्गालगतच्या शेतकरी/ शेतकरी गट) | रू. ०.३० लाख प्रति युनिट. | खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ०.१५ लाख |

| **१४. शेतकरी प्रशिक्षण** | | | **खर्चाच्या मंजुर बाबी** |
|---|---|---|---|
| अ) | राज्याअंतर्गत प्रशिक्षण | रु.१००० प्रति दिवस प्रति शेतकरी | १०० टक्के अनुदान देय आहे. |
| ब) | राज्याबाहेरील प्रशिक्षण | प्रकल्प आधारित (प्रत्यक्ष खर्चानुसार) | १०० टक्के अनुदान देय आहे. |
| **१५. शेतकरी अभ्यास दौरा/भेटी** | | | **खर्चाच्या मंजुर बाबी** |
| अ) | राज्याबाहेरील भेटी (Outside the state Exposure Visits) (प्रकल्प आधारित) | प्रकल्प आधारीत (प्रत्यक्ष खर्चानुसार) १०० टक्के अनुदान देय आहे. | वाहतुक व्यवस्था, निवास व भोजन व्यवस्था, प्रशिक्षण साहित्य इ. |
| ब) | देशाबाहेरील भेटी (Outside India) | रु.४.०० लाख प्रति शेतकरी, १०० टक्के अनुदान देय आहे. | (प्रकल्प आधारीत) प्रशिक्षण साहित्य |
| **१६. अधिकारी/कर्मचारी यांचे प्रशिक्षण व अभ्यास दौरे** | | | |
| अ) | राज्यांतर्गत प्रशिक्षण/अभ्यास दौरा | रु. ३००/– प्रति प्रशिक्षणार्थी अधिक प्रवास व दैनंदिन भत्ता. | |
| ब) | राज्याबाहेरील प्रशिक्षण/अभ्यास दौरा | रु. ८००/– प्रति प्रशिक्षणार्थी अधिक प्रवास व दैनंदिन भत्ता. | |
| क) | देशाबाहेरील प्रशिक्षण/अभ्यासदौरा | रु. ६.०० लाख प्रति प्रशिक्षणार्थी १०० टक्के अनुदान देय आहे. | |

सर्व जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे बंधनकारक आहे. तसेच आपल्या गावातील कृषी सहाय्यक, कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांचेशी सपर्क साधावा. योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाचे संकेतस्थळावर https://krishi.maharashtra.gov.in/ येथे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

# भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना



■ **योजनेचे नाव :-** भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना

■ **अनुदानाचे स्वरुप:-** १०० टक्के राज्य योजना

■ **योजनेचा उद्देश :** शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, युवा शेतकऱ्यांसाठी रोजगार निर्मिती, पीक रचनेत बदल घडवून आणणे, उत्पन्नाचा शाश्वत स्रोत निर्माण करणे, प्रक्रीया उद्योगांसाठी आवश्यक कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे हि या योजनेची उद्दीष्टे आहेत.

■ **लाभार्थी निवडीचे निकष :-**

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जे शेतकरी फळबाग लागवडीकरीता पात्र ठरु शकत नाहीत असे शेतकरी

२. या योजनेअंतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांनाच लाभ घेता येईल. संस्थात्मक लाभार्थ्यांना लाभ घेता येणार नाही.

३. शेतकऱ्याच्या स्वत:च्या नावे ७/१२ असणे आवश्यक आहे. जर ७/१२ उताऱ्यावर लाभार्थी संयुक्त खातेदार असेल तर सर्व खातेदारांचे फळबाग लागवडीसाठी विहित प्रपत्रातील संमतीपत्र आवश्यक राहील.

४. जमिन कुळकायदयाखाली येत असल्यास ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना राबविण्यासाठी कुळाचे संमतीपत्र आवश्यक राहील.

५. महाडिबीटीवर प्राप्त झालेल्या अर्जांमधून सर्वसाधारण,अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला व दिव्यांग व्यक्ती यांची सोडतीद्वारे निवड करण्यात येते.

■ **अंमलबजावणी कार्यपद्धती :**

सर्व इच्छुक शेतकऱ्यांनी महा-डीबीटी पोर्टलच्या https://mahadbtmahait.gov.in/ या संकेत स्थळावर अर्ज करावेत. संकेतस्थळावर जाऊन स्वत:ची नोंदणी व आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. शासन अनुदानीत बाबींसाठी पुढील तक्त्यात दर्शविलेल्या कामांचा समावेश राहील. वर्षनिहाय केलेल्या कामानुसार अंदाजपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांमध्ये लाभार्थीच्या बँक खात्यामध्ये अनुदान जमा केले जाते.

**अधिक माहितीसाठी जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा.**

✪

| अ.क्र. | शेतकऱ्याने स्वखर्चाने करावयाची कामे | आर्थिक भार |
|---|---|---|
| १ | जमीन तयार करणे, | १०० टक्के शेतकरी |
| २ | माती व शेणखत/सेंद्रिय खत मिश्रणाने खड्डे भरणे, | |
| ३ | आंतर मशागत करणे | |
| ४ | काटेरी झाडांचे कुंपण करणे | |
| | **शासन अनुदानीत कामे** | **आर्थिक भार** |
| ५ | खड्डे खोदणे. | १०० टक्के राज्य शासन |
| ६ | कलमे/ रोपे लागवड करणे. | |
| ७ | पीक संरक्षण. | |
| ८ | नांग्या भरणे. | |
| ९ | रासायनिक व सेंद्रीय खते देणे | |

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रम

**■ योजनेचे उद्देश :**

- फळबाग लागवड माध्यमातून शाश्वत रोजगार निर्मिती करणे.
- फळबाग लागवडीच्या माध्यमातून पुरक प्रक्रिया उद्योगास चालना देणे व लाभार्थींचे उत्पादन वाढविणे.
- फळबाग लागवडी खालील क्षेत्रात वाढ करणे.
- आर्थिक, सामाजिक स्तर उंचावणे.
- शहराकडे होणारे स्थलांतर थांबवणे.
- लाभार्थ्यांच्या इच्छेनुसार पुष्प /वन/फळपिकांची लागवड.

**■ समाविष्ट जिल्हे : राज्यातील ३४ जिल्हे.**

**■ लाभार्थी पात्रतेचे निकष :**

- लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे.
- जमीन कूळ कायद्याखाली येत असल्यास व ७/१२ च्या उताऱ्यावर जर कूळाचे नाव असले तर योजना कूळाच्या संमतीने राबविण्यात यावी.
- लाभार्थी जॉबकार्ड धारक असावा.
- योजनेसाठी जॉबकार्ड धारक पुढील प्रवर्गातील कोणतीही व्यक्ती वैयक्तिक लाभार्थी म्हणून लाभ घेण्यास पात्र राहील.
  अ) अनुसूचित जाती ब) अनुसूचित जमाती क) भटक्या जमाती ड) विमुक्त जमाती इ) दारिद्र्य रेषेखालील इतर कुटुंबे फ) स्त्री कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे ग) दिव्यांग व्यक्ती कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे ह) जमीन सुधारणांचे लाभार्थी ई) प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण योजनेखालील लाभार्थी ज) अनुसूचित जमातीचे व इतर पारंपरिक वनवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ (२००७ चा २) खालील पात्र व्यक्ती.
- योजनेतील लाभार्थींना लागवड केलेल्या फळझाडे/ वृक्ष / फुलपिके / मसाला पिकांच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी बागायत पिकांकरिता ९०% आणि कोरडवाहू पिकांकरिता ७५% झाडे जिवंत असतील अशाच लाभार्थ्यांना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय राहिल.
- लाभार्थ्यांना ०.०५ हेक्टर ते २.०० हेक्टर क्षेत्राचे मर्यादेत फळझाड लागवड करता येते.

**■ योजनेचे स्वरूप :**

लाभार्थीस सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर विविध फळझाडांची/ वृक्षांची/ फुलपिकांची/ मसाला पिकांची लागवड करता येते.

**■ योजनेची अंमलबजावणी :** जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उप विभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी यांच्या मार्फत केली जाते.

**■ लागवड कालावधी :** माहे जून ते डिसेंबर (लाभार्थी शेतकरी यांचेकडे सिंचन सुविधा उपलब्ध असल्यास वर्षभर लागवड करता येईल.)

**■ फळपीके :** आंबा, काजू, चिकू, पेरु, डांळिब, संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, नारळ (बाणवली/ टी.डी), बोर, सिताफळ, आवळा, चिंच, कवठ, जांभूळ, कोकम, फणस, अंजीर कलमे, द्राक्ष, ड्रॅगन फ्रुट, अॅव्होकॅडो, केळी (३ वर्षे), सुपारी, साग, गिरीपुष्प, कडुलिंब, सिंधी, शेवगा, हादगा, बांबू, जॅट्रोफा, कडीपत्ता, पानपिंपरी, करंज व इतर औषधी वनस्पती.

**■ फुलपिके :** गुलाब, मोगरा, निशीगंध, सोनचाफा.

**■ मसाला पिके :** लवंग, दालचीनी, जायफळ, मिरी.





| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत फळबाग लागवडी तीन वर्षामध्ये मजूरी व सामुग्रीसाठी देय रक्कम मजूरी दर रू. २९७/- प्रति मजूरी दिवसाप्रमाणे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | फळपिकाचे नांव | लागवड अंतर (मी.) | झाडे संख्या | अनुदान रक्कम | अ. क्र. | फळपिकाचे नांव | लागवड अंतर (मी.) | झाडे संख्या | अनुदान रक्कम |
| फळपिके | | | | | ३० | आवळा कलमे | ८ x ८ | १५० | १०९९१५ |
| १ | आंबा कलमे | १० x १० | १०० | १९८९४२ | ३१ | आवळा कलमे | ६ x ६ | २७७ | १५४६७९ |
| २ | आंबा रोपे (इन सिटू पध्दतीने) | १० x १० | १०० | १८८९०० | ३२ | संत्रा कलमे | ५.४०x ५.४० | ३४२ | १९२३२९ |
| ३ | काजू कलमे | ७ x ७ | २०० | १४०८३७ | ३३ | पेरु कलमे | ३ x २ | १६६६ | २९३१७० |
| ४ | चिकु कलमे | १० x १० | १०० | १९४८७१ | ३४ | केळी | १.८० x १.५० | ३७०४ | २७९६०० |
| ५ | पेरु कलमे | ६ x ६ | २७७ | १६०६०७ | ३५ | द्राक्ष | ३ x १.५० | २२२२ | २९८५६९ |
| ६ | डाळिंब कलमे | ५x ५ | ४०० | १६७८५६ | विदेशी पिके | | | | |
| ७ | संत्रा, मोसंबी, लिंबू कलमे | ६ x ६ | २७७ | १८६२६० | ३६ | ड्रॅगनफ्रुट | ३.५० x ३ | ३८०८ | २५२५११ |
| ८ | नारळ रोपे (बाणवली) | ८x ८ | १५० | १६६५०१ | ३७ | अॅव्होकॅडो (बटरफ्रुट) | ८ x ८ | १५० | १७०४१० |
| ९ | नारळ रोपे टी x डी | ८x ८ | १५० | १७४९७१ | फुलपिके | | | | |
| १० | बोर रोपे | ७ x ७ | २०० | १०६५७४ | ३८ | निशिगंध | ०.३० x ०.३० | १११११११ | ३३७०६१ |
| ११ | बोर रोपे | ५ x ५ | ४०० | १२८३६५ | ३९ | मोगरा | १ x १ | १०००० | २८९९५० |
| १२ | सीताफळ रोपे | ५ x ५ | ४०० | १५५९४५ | ४० | गुलाब | १ x १ | १०००० | ३७७०५० |
| १३ | सीताफळ कलमे | ५ x ५ | ४०० | १६७९४५ | ४१ | सोनचाफा | ३ x ३ | ११११ | २४०९४० |
| १४ | कागदी लिंबू रोपे | ६ x ६ | २७७ | १७७३१० | मसाला पिके | | | | |
| १५ | आवळा कलमे | ७ x ७ | २०० | १२८९६० | ४२ | मिरी | ०.३० x ०.३० | ३०० | ५४३९७ |
| १६ | आवळा रोपे | ७ x ७ | २०० | १२२९६० | ४३ | लवंग | ०.६० x ०.६० | १२० | ७११४३ |
| १७ | चिंच, कवठ, जांभुळ रोपे | १० x १० | १०० | ११७९९७ | ४४ | जायफळ कलमे | ०.९० x ०.९० | २५० | १०८११० |
| १८ | चिंच कलमे विकसित जाती | १० x १० | १०० | १२३६४७ | ४५ | जायफळ रोपे | ०.९० x ०.९० | २५० | ९७३६० |
| १९ | कोकम रोपे | ७ x ७ | २०० | ११४९२४ | ४६ | दालचिनी | ०.६० x ०.६० | ३०० | १२६१५३ |
| २० | कोकम कलमे | ७ x ७ | २०० | ११८५२४ | औषधी वनस्पती | | | | |
| २१ | फणस कलमे | १० x १० | १०० | १०३११७ | ४७ | औषधी वनस्पती | १० x १० | १०० | ८८४३१ |
| २२ | फणस रोपे | १० x १० | १०० | १००११७ | इतर पिके | | | | |
| २३ | अंजीर कलमे | ५ x ५ | ४०० | १७१९२० | ४८ | बांबू | ५ x ५ | ४०० | १०४१०४ |
| २४ | सुपारी | २.७x२.७ | १३७० | २६४१२० | ४९ | शेवगा | ५ x ५ | ४०० | ९४६३३ |
| २५ | डाळिंब कलमे | ४.५ x ३ | ७४० | २९३९७९ | ५० | साग | २ x २ | २५०० | १५७३९१ |
| २६ | काजू रोपे | ७ x ७ | २०० | १३२४३६ | ५१ | सिंधी | ५ x ५ | ४०० | १०८५१८ |
| २७ | आंबा कलमे | ५ x ५ | ४०० | २६६६९० | ५२ | हादगा रोपे | ५ x ५ | ४०० | ९४६३३ |
| २८ | संत्रा कलमे | ६ x ३ | ५५५ | २४७४६५ | ५३ | कडीपत्ता | ३ x ३ | ११११ | ९२१२६ |
| २९ | बोर रोपे | ६ x ६ | २७७ | १५०७६० | ५४ | कडूलिंब रोपे | १० x १० | १०० | ७७५७१ |

# महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी काजू फळपिक विकास योजना



महाराष्ट्रातील काजूच्या सर्वकष विकासासाठी काजू फळपिक विकास योजना लागू करण्याबाबत दि. १६ फेब्रुवारी २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात काजू फळपिक विकास योजना सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षासाठी लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी ५ वर्षाच्या कालावधीसाठी रुपये १,३२५.०० कोटी एवढी तरतूद करण्यास मान्यता दिलेली आहे.

■ **योजनेची वैशिष्ट्ये :**

- लागवडीसाठी कलमे उपलब्ध करण्याकरिता रोपवाटिकांची सुविधा निर्माण करणे.
- काजूची उत्पादकता वाढविणे.
- काजू बोंडावरील प्रक्रियेस चालना देणे.
- काजू उत्पादक शेतकरी व काजू प्रकल्प धारकाला अर्थसहाय्य करणे.
- लागवडीपासून प्रक्रिया व मार्केटिंग विषयक मार्गदर्शन करणे.
- रोजगार निर्मिती करणे.

■ **योजनेची व्याप्ती:** राज्याच्या अखत्यारीतील संपूर्ण कोकण विभाग व कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड, आजरा, भुदरगड, गडहिंग्लज व राधानगरी या तालुक्यांचा समावेश आहे.

■ **योजनेंतर्गत आर्थिक मापदंड व अर्थसहाय्य :** प्रस्तावित शासकीय बाबींतील तरतुदीकरिता शासनाच्या प्रचलित योजनेतील अर्थसहाय्याच्या मापदंडानुसार राहतील.

■ **लाभार्थ्याच्या पात्रतेचे निकष :** विभागाच्या संबंधित प्रचलित योजनेतील तरतुदीनुसार राहतील.

■ **क्षेत्र मर्यादा :** विभागाच्या संबंधित प्रचलित योजनेतील तरतुदीनुसार राहील.

■ **काजू फळपिक विकास समितीने केलेल्या खालील शिफारशींस व त्याअनुषंगाने संबंधित विभागाने करावयाच्या कार्यवाहीस मान्यता :**

अ) लागवड विषयक धोरणात्मक शिफारशी.
ब) उत्पादनवाढ विषयक धोरणात्मक शिफारशी.
क) प्रक्रिया उद्योग उभारणीविषयक धोरणात्मक शिफारशी.
ड) चालू असणाऱ्या प्रक्रिया उद्योगांना सहाय्य विषयक धोरणात्मक शिफारशी.

काजू फळपिक विकास समितीने काजू फळपिकाच्या सर्वंकष विकासासाठी शिफारस केलेल्या कृषी विभागाकरिता खालील बाबींसाठी रुपये १६२.०० कोटी एवढी आर्थिक तरतूद सन २०२४-२५ मध्ये करण्यास मान्यता प्राप्त

| अ. क्र | शिफारस करण्यात येणारी बाब | प्रस्तावित भौतिक लक्षांक व आर्थिक तरतुद (रु. कोटी) | | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|
| | | भौतिक लक्षांक | आर्थिक तरतुद | |
| | **(अ) कृषी विभाग** | | | |
| १ | खाजगी क्षेत्रातील रोपवाटीका स्थापना व बळकटीकरण करण्याकरीता अर्थसहाय्य | ३४ | २.५५ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान |
| २ | मागेल त्याला काजू कलमे योजना | ३०००० | ७.५० | राष्ट्रीय कृषी विकास योजना |
| ३ | प्लॅस्टिक आच्छादनासह शेततळ्याची सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देणे. | ५०० | ३.७५ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान |
| ४ | सिंचनाकरिता विहिरिकरिता अनुदान देणे. | १००० | २५.०० | कृषी विभाग, जिल्हा परिषद |
| ५ | टि मॉस्क्युटो, खोडकिडा, फुलकिडे नियंत्रणाकरिता पिकसंरक्षण अनुदान देणे. | ३०,००० हे. | ११.२० | हॉर्टसॅप योजना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | काजू बागेमधील तण नियंत्रणाकरिता फवारणीयंत्र, पॉवर विडर व ग्रासकटर करिता अनुदान देणे. | ६,६६७ | १२.०० | कृषी यांत्रिकीकरण योजना |
| ७ | जुन्या बागांचे पुनरुज्जीवन करण्याकरिता अनुदान देणे. | १३,३३४ हे. | ४०.०० | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान |
| ८ | काजू तंत्रज्ञानावर आधारित शेतीशाळा/ प्रशिक्षण/ क्षेत्रिय भेटी. | ३०,००० | ३.०० | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान |
| ९ | काजू प्रक्रिया उद्योग आधुनिकीकरण | १०७ | १६.०० | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना |
| १० | पॅकहाऊस व ड्राईंगयार्ड उभारणे. | ६६७ | ३०.०० | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान |
| ११ | काजू बोंडूवर प्रक्रीयेकरीता लघुउद्योग उभारणी | ६६७ | १०.०० | मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उन्नयन योजना |
| १२ | ओले काजूगर काढणी व त्यावर प्रक्रियेकरिता संशोधन करणे | १ | १.०० | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान |
| | **एकूण (अ) कृषी विभाग** | | **१६२.००** | |

काजू फळपिक विकास समितीने काजू फळपिकाच्या सर्वकष विकासासाठी शिफारस केलेल्या इतर विभागाकरीता खालील बाबींसाठी रुपये २६३.०० कोटी एवढी आर्थिक तरतूद करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

| **अ.क्र** | **शिफारस करण्यात येणारी बाब** | **प्रस्तावित भौतिक लक्षांक व आर्थिक तरतुद (रु. कोटी)** | | **योजनेचे नाव** |
|---|---|---|---|---|
| | | **भौतिक लक्षांक** | **आर्थिक तरतुद** | |
| **(ब) इतर विभाग** | | | | |
| १ | काजू प्रक्रीया उद्योगांना वर्षभर काजू बी पुरवठ्याकरीता काजू बी खरेदी करण्याकरीता फक्त पहिल्या वर्षासाठी भाग भांडवल उभारणे. | | २००.०० | पणन विभाग |
| २ | प्रत्येक तालुक्यात ५००० मे. टन क्षमतेचे गोडाऊन उभारणे. | २५ | १२.५० | पणन विभाग |
| ३ | काजू बोंड रसावरील सामाईक प्रक्रिया केंद्र उभारणी. | ३ | ६.०० | पणन विभाग |
| ४ | कोकणातील जी. आय. काजूचा ब्रँड विकसित करणे. | १ | ०.५० | पणन विभाग |
| ५ | जिल्हा स्तरावर काजू प्रक्रीयेकरीता आधुनिक मध्यवर्ती सुविधा केंद्र उभारणे. | ५ | १०.०० | पणन विभाग |
| ६ | ओले काजूगर काढणे व प्रक्रीयेकरीता उभारण्यात येणाऱ्या प्रक्रिया केंद्राला अर्थसहाय्य. | १० | ५.०० | पणन विभाग |
| ७ | काजू प्रक्रिया उद्योगाकरीता घेतलेल्या मुदत कर्जावरील व्याजावरील ६ टक्के अनुदान सवलत. | २०० | ४.०० | सहकार विभाग |
| ८ | काजू बी प्रक्रीयाकरिता घेतलेल्या कर्जावर ५० टक्के व्याज अनुदान सवलत | ५०,००० | २५.०० | सहकार विभाग |
| | **एकूण (ब) इतर विभाग** | | **२६३.००** | |
| एकूण (अ) कृषी विभाग व (ब) इतर विभाग आवश्यक तरतूद | | | ४२५.०० | |

- भविष्यात महाराष्ट्र राज्यातील काजू पिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नापासून काजू बागायतदारांना निश्चितपणे सुगीचे दिवस येणार असून आर्थिक उन्नती साधण्यासाठी निश्चित मदत होणार आहे. सदरच्या शासन निर्णयामुळे शेतकरी व प्रक्रिया उद्योजक यांना चांगली चालना मिळणार आहे. त्यानुषंगाने, महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी लागू करण्यात आलेल्या काजू फळपिक विकास योजनेचा पुरेपूर लाभ शेतकरी, काजू बागायतदार व प्रक्रिया उद्योजकांनी घ्यावा.
- सदर योजना राबविण्याकरीता स्वतंत्र आर्थिक तरतूद नसल्याने कृषी व पणन विभागाकडील विविध योजनांच्या अभिसरणातून योजना राबविण्यात येत आहे.

✪



# डाळिंब पिकासाठी अँन्टी हेलनेट कव्हर (गारा विरोधक जाळी) तंत्रज्ञान

**पात्रतेचे निकष**

योजनेअंतर्गत रोपवाटीका पूर्णपणे नव्याने उभारावयाची आहे. या घटकांतर्गत यापूर्वी शासनाचा लाभ घेतलेले खाजगी रोपवाटीकाधारक, शासनाच्या लाभ न घेता उभारलेल्या खाजगी रोपवाटीकाधारक तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजना, एकात्मिक फलोत्पादन अभियान, पोकरा किंवा इतर योजनेतून संरक्षित शेती (शेडनेट व हरितगृह) घटकाचा लाभ घेतलेले लाभार्थी पुन:श्च सदर योजनेंतर्गत लाभास पात्र राहणार नाहीत.

डाळिंब हे भारतातील कोरडवाहू प्रक्षेत्रावर येणारे अतिशय महत्वाचे फळपिक आहे. त्यात महाराष्ट्र राज्य हे अग्रेसर आहे. उत्पादनात अग्रेसर असले तरी महाराष्ट्र राज्यातील डाळिंब पिकाची उत्पादकता कमी होत आहे. यातील अनेक कारणांपैकी प्रामुख्याने वातावरणीय बदल, अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव, जमिनी व पिकाचे आरोग्य इत्यादी महत्वाची कारणे आहेत. डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तींना सतत सामोरे जावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार व निर्यातक्षम डाळिंब पिकाचे उत्पादन घेण्यास मर्यादा येत आहेत. अवेळी पाऊस व गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीपासून डाळिंब बागांच्या संरक्षणासाठी अँन्टी हेलनेट कव्हर घटकाचा शासकीय योजनेअंतर्गत समावेश करण्याबाबत शेतकरी तसेच लोकप्रतिनिधींद्वारे सातत्याने मागणी होत आहे.

डाळिंब फळबागांचे गारपीटीपासून संरक्षणासाठी दक्षतेचा उपाय म्हणून अँन्टी हेल नेट कव्हर एम.एस. अँगल सांगाड्यासहित या तंत्रज्ञानाबाबत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी यांच्या स्तरावर तज्ञ समितीने शिफारस केलेली आहे. अँन्टी हेल नेट कव्हर एम.एस. अँगलच्या संरचनेवर लावल्याने गारपीट व अतिवृष्टीपासून फळे व झाडांचे संरक्षण होते. त्याअनुषंगाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत १०० हेक्टर क्षेत्राकरिता प्रायोगिक तत्वावर सदर घटकाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात करण्यात येत आहे.

**१. योजनेचा उद्देश :**

- गारपीट व अवकाळी पाऊस यापासून डाळिंब बागांचे संरक्षण करणे.
- शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या व उच्च प्रतीच्या निर्यातक्षम डाळिंब पिकांच्या उत्पादनासाठी आर्थिक सहाय्य करणे.
- फळबागांकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे.
- ग्रामीण भागातील युवकांना कृषी क्षेत्रात स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.

**२. लाभार्थी निवडीचे निकष**

- शेतकऱ्याने योजनेअंतर्गत अर्ज करताना त्यांच्या स्वत:च्या मालकीची जमीन असणे आवश्यक आहे.
- स्वत:च्या मालकीची जमीन नसल्यास शेतकऱ्यांच्या आपसातील भाडेपट्टा करार या योजनेत ग्राह्य धरण्यात येणार नाही. तथापि शेतकऱ्याने शासकीय किंवा निमशासकीय घेतलेल्या जमिनीवर डाळिंब पिकासाठी प्लॅस्टिक कव्हर तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा

असल्यास दीर्घ मुदतीचा (किमान १५ वर्ष) व दुय्यम निबंधकाकडे नोंदणीकृत केलेला भाडेकरार या योजनेत ग्राह्य धरण्यात येईल.

- या योजनेअंतर्गत वैयक्तिक शेतकरी, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था/ भागीदारी संस्था, शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या शासकीय, निमशासकीय व अशासकीय संस्था यांना लाभ घेता येईल.
- ॲन्टी हेलनेट कव्हर तंत्रज्ञानाचा वापर डाळिंब बागांसाठीच अनिवार्य राहील.
- या घटकाचा लाभ घ्यावयाचा असल्यास महाडिबीटी प्रणालीवर अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच जिल्ह्यास दिलेल्या लक्षांकाच्या मर्यादेत सदर शेतकऱ्यांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल.
- योजनेंतर्गत निवड होण्यापूर्वी सदर घटकाची अंमलबजावणी/ उभारणी केलेला शेतकरी पात्र राहणार नाही.

**३. अंमलबजावणीची कार्यपद्धती :**

१. लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडिबीटी https://mahadbt.maharashtra.gov.in या ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज करावेत.

२. महाडिबीटी प्रणालीवर सदर घटकासाठी निवड झाल्यानंतर लाभार्थ्यांनी खालील कागदपत्रे अपलोड करावीत.

- ७/१२ उतारा (डाळिंब फळबागेच्या नोंदीसह)
- ८-अ
- आधार कार्डची छायांकीत प्रत.
- आधार संलग्न बँक खात्याच्या पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.
- जात प्रमाणपत्र (अनु.जाती/अनु.जमाती शेतकऱ्यांसाठी)
- विहीत नमुन्यातील हमीपत्र.
- बंधपत्र.
- चतु:सीमा नकाशा.

**डाळिंब पिकासाठी ॲन्टी हेलनेट कव्हर तंत्रज्ञानाच्या खर्चाचे मापदंड व अनुदान मर्यादा**

- एकर डाळींब पिकासाठी M.S. अँगलच्या सांगाड्यासहीत ॲन्टीहेलनेट कव्हर या घटकाकरिता रु.४,२२,६४०/- खर्च येतो (रु. १०६.१६ प्रति चौ.मी.)
- राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अनुदान देय आहे.
- सदर घटकाचा लाभ २००० ते ४००० चौ.मी. च्या मर्यादेत डाळिंब पिकासाठी ॲन्टी हेलनेट कव्हर तंत्रज्ञानाच्या मार्गदर्शक सूचना सन २०२२-२३ सदर घटकाची अंमलबजावणी करुन लाभ घेता येईल.

**१. डाळिंब पिकासाठी ॲन्टी हेलनेट कव्हरकरिता सांगाड्याची उभारणी :**

अ. M.S angle च्या मेन पोलची उभारणी करण्याकरिता २ फूट खोल व १ फूट व्यास घेऊन खड्डा तयार करावा व त्यामध्ये सिमेंट काँक्रीट (M15 ग्रेड) भरुन होलपासच्या (८ इंच लांबी व १० मिमी व्यास) सहाय्याने फाऊंडेशन पोलची जोडणी करुन मेन पोलची उभारणी करावी. तसेच शेवटच्या मेन पोलला आधार देण्याकरिता Supporting MS angle ची जोडणी करावी त्याकरिता १.५ फूट खोल व १ फूट व्यासाचा खड्डा तयार करावा व त्यामध्ये सिमेंट काँक्रीट (M15 ग्रेड) भरुन होलपासच्या (८ इंच लांबी व १० मिमी व्यास) सहाय्याने फाऊंडेशन पोलची जोडणी करुन तिरकस पद्धतीने मेन पोलला Supporting MS angle ची जोडणी करावी.

ब. डाळिंब पिकासाठी मुलभूत 'Y' आकाराचा सांगाडा तयार करण्याकरिता MS STRIP (४ फूट २ इंच लांबी, १ इंच रुंदी आणि ५ मिमी जाडी) ची जोडणी प्रत्येक मेन पोल करिता नट बोल्टच्या (M8 X 25mm, M10 X 40 mm) सहाय्याने करावी. अशा प्रकारे 'Y' आकाराच्या सांगाड्याची उभारणी MS angle (50 X 50 X 5) mm मध्ये करुन यु.व्हि.संस्करित ॲन्टी हेलनेट (गारा विरोधक जाळी) आच्छादन करावे. तसेच ॲन्टी हेलनेट (गारा विरोधक जाळी) व 'Y' आकाराचा सांगाडा यांच्या मध्यभागी कमीत कमी ४ फूट लांब अँगलच्या (Minimum 4ft Length from the beginning of Y-angle) तुकड्याची उभी जोडणी करावी. जेणेकरुन डाळिंब पिकासाठी पोषक वातावरण ठेवता येईल.

२. एक एकर डाळिंब पिकाकरिता ॲन्टी हेलनेट कव्हरचा वापर करावयाचा असल्यास जाळीच्या संरक्षणासाठी पॉलिइथिलीन प्लास्टिक कॅप (UV Stabilized Polymer based Caps for MS-angles for protection of Net) किमान ९० प्लास्टिक कॅपचा वापर करावा.

३. यु.व्हि. संस्करित ॲन्टी हेलनेट (गारा विरोधक जाळी) कव्हरची जोडणी करण्यासाठी मधल्या व बाजूच्या जीआय वायर १० गेजच्या वापरण्यात याव्यात.

४. ॲन्टी हेलनेट (गारा विरोधक जाळी) कव्हर आणि जीआय वायर बांधण्यासाठी पॉलिइस्टर वायरचा वापर करावा.

५. अतिनील प्रतिरोधक ॲन्टी हेलनेट तांत्रिक निकष : स्टँडर्ड साईज: १०० X ९ फूट, किमान ४ मिमी जाड अतिनील प्रतिरोधक दोरी चारही कडांवर एम्बेड केलेली. ॲन्टी हेलनेटचे आयुष्यमान किमान ३ वर्षे, सूर्यप्रकाश आत येण्याची क्षमता ७५ ते ८० टक्के, कमीत कमी वजन ६५ ते ८० ग्रॅ./चौ.मी. ॲन्टी हेलनेट कव्हरच्या बाजुंना ५० सेंमी. पेक्षा कमी अंतरावर छिद्रे असावीत. ॲन्टी हेलनेट ही ॲन्टी सल्फर व ॲन्टी क्लोरीन असावी.

✪

**शेतकरी मासिक PDF स्वरुपात Download करण्यासाठी सोबत दिलेला QR CODE स्कॅन करावा.**



# राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत संरक्षित शेती घटकांतर्गत द्राक्ष पिकासाठी प्लास्टिक कव्हर तंत्रज्ञान

द्राक्ष हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आर्थिक बळ देणारे महत्वाचे फळपिक आहे. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तींना सतत सामोरे जावे लागते. त्यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार व निर्यातक्षम द्राक्ष पिकाचे उत्पादन घेण्यास मर्यादा येत आहेत. अवेळी पाऊस व गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीपासून द्राक्ष बागांच्या संरक्षणासाठी प्लास्टिक कव्हर घटकाचा शासकीय योजनेंतर्गत समावेश करण्याबाबत शेतकरी तसेच लोकप्रतिनिधींद्वारे सातत्याने मागणी होत आहे.

द्राक्ष फळबागांचे अवेळी पाऊस व गारपीटीपासून संरक्षणासाठी दक्षतेचा उपाय म्हणून प्लास्टिक कव्हर या तंत्रज्ञानाबाबत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी स्तरावर तज्ञांच्या समितीने शिफारस केलेली आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत १०० हेक्टर क्षेत्राकरिता प्रायोगिक तत्वावर सदर घटकाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात करण्यात येत आहे.

**१. योजनेचा उद्देश :**

- गारपीट व अवकाळी पाऊस यापासून द्राक्ष बागांचे संरक्षण करणे.
- शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या व उच्च प्रतिच्या निर्यातक्षम द्राक्ष पिकांच्या उत्पादनासाठी आर्थिक सहाय्य करणे.
- फळबागांकरीता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याकरिता शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे.
- ग्रामीण भागातील युवकांना कृषी क्षेत्रात स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.

**२. लाभार्थींच्या निवडीचे निकष**

- शेतकऱ्याने योजनेअंतर्गत अर्ज करताना त्यांच्या स्वत:च्या मालकीची जमीन असणे आवश्यक आहे.
- स्वत:च्या मालकीची जमीन नसल्यास शेतकऱ्यांच्या आपसातील भाडेपट्टा करार या योजनेत ग्राह्य धरण्यात येणार नाही. तथापि शेतकऱ्यांना शासकिय किंवा निमशासकीय घेतलेल्या जमिनीवर द्राक्ष पिकासाठी प्लॅस्टिक कव्हर तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा असल्यास दीर्घ मुदतीचा (किमान १५ वर्ष) व दुय्यम निबंधकाकडे नोंदणीकृत केलेला भाडेकरार या योजनेत ग्राह्य धरण्यात येईल.
- या योजनेअंतर्गत वैयक्तिक शेतकरी, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था/ भागीदारी संस्था, शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्या (Farmers Producer Company), शासकीय, निमशासकीय व अशासकीय संस्था यांना लाभ घेता येईल.
- प्लॅस्टिक कव्हर तंत्रज्ञानाचा वापर द्राक्ष बागांसाठीच अनिवार्य राहील.
- या घटकाचा लाभ घ्यावयाचा असल्यास महाडिबीटी प्रणालीवर अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच जिल्ह्यास दिलेल्या लक्षांकाच्या मर्यादेत सदर शेतकऱ्यांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल.
- योजनेअंतर्गत निवड होण्यापूर्वी सदर घटकाची अंमलबजावणी/ उभारणी केलेला शेतकरी पात्र राहणार नाही.
- सदर तंत्रज्ञानाची शिफारस ही ज्या द्राक्ष बागेकरिता मुलभूत 'Y'

आकाराच्या सांगाडा उभा आहे त्यासाठी केलेली आहे. त्यामुळे 'Y' सांगाड्यावरील द्राक्ष बागेसाठी अंमलबजावणी करता येईल.

**३. अंमलबजावणीची कार्यपद्धती :**

- लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडिबीटी (https://mahadbt.maharashtra.gov.in) या ऑनलाईन संकेतस्थळावर अर्ज करावेत.
- महाडिबीटी प्रणालीवर सदर घटकासाठी निवड झाल्यानंतर लाभार्थ्यांनी खालील कागदपत्रे अपलोड करावीत.
- ७/१२ उतारा (द्राक्ष पिकाच्या नोंदीसह)
- ८-अ
- आधार कार्डाची छायांकीत प्रत.
- आधार संलग्न बँक खात्याच्या पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.
- जात प्रमाणपत्र (अनु.जाती/ अनु.जमाती शेतकऱ्यांसाठी)
- विहीत नमुन्यातील हमीपत्र.
- बंधपत्र.
- चतु:सीमा नकाशा

## द्राक्ष पिकासाठी प्लास्टिक कव्हर तंत्रज्ञानाच्या खर्चाचे मापदंड व अनुदान मर्यादा :

एकर द्राक्ष पिकासाठी प्लास्टीक कव्हर या घटकाकरिता रु.४,८१,३४४/- खर्च येतो (रु.१२०.३४ प्रति चौ.मी.)

- राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अनुदान देय आहे.
- सदर घटकाचा लाभ २००० ते ४००० चौ.मी. च्या मर्यादेत द्राक्ष पिकासाठी प्लॅस्टीक कव्हर तंत्रज्ञानाच्या मार्गदर्शक सूचना नुसार सदर घटकाची अंमलबजावणी करुन शेतकऱ्यांना लाभ घेता येईल.

## द्राक्ष पिकासाठी प्लॅस्टिक कव्हर तंत्रज्ञानाच्या शिफारशीच्या अनुषंगाने साहित्याचे तांत्रिक निकष

१. द्राक्ष पिकासाठी केलेल्या मुलभूत 'Y' सांगाड्यावर प्लॅस्टिक कव्हरसाठी MS angle चा पोल (मध्यभागी) वापरावा व त्याची साईज कमीत कमी 30 x 30 x 5 mm. असावी. तसेच पॉलीथिलीन पेपर व 'Y' आकाराचा सांगाडा यामध्ये कमीत कमी ५ फूट लांबीचा अँगलच्या (Minimum 5ft Length from the beginning of Y-angle) तुकड्याची जोडणी करावी. जेणेकरुन द्राक्ष पिकाच्या वेलीस अनुकूल वातावरण ठेवता येईल.

२. एक एकर द्राक्ष पिकाकरिता प्लॅस्टिक कव्हरचा वापर करावयाचा असल्यास पेपरच्या संरक्षणासाठी पॉलिथिलीन प्लॅस्टिक कॅप (UV Stabilized Polymer based Caps for MS-angles for protection of Fabric/Plastic) किमान २५० प्लॅस्टिक कॅपचा वापर करावा.

३. UV संस्करित Polyethylene Woven Laminated Fabric प्लास्टिक कव्हरची जोडणी करण्यासाठी मधल्या व बाजूच्या UV संस्करित Polyethylene वायर ५ मिमी जाडीच्या वापरण्यात याव्यात.

४. प्लॅस्टिक पेपर व बाजूची पॉलीथिलीन वायर याची जोडणी करण्यासाठी प्लॅस्टिक S हुकचा वापर करावा.


५. तसेच मुख्य Y सांगाड्यावर जोडणी केलेल्या अँगलच्या तुकड्यावर UV संस्करित Polyethylene Woven Laminated Fabric प्लॅस्टिक कव्हरची जोडणी Polyethylene वायर सोबत करण्यासाठी UV संस्करित इलास्टिक कॉर्ड (Elastic Cord चा ४ मिमी व्यास, ५ वर्ष आयुष्य) प्लॅस्टिक दोरीच्या ऐवजी करावा जेणेकरुन वारा व वादळ यामुळे सांगाड्यास निर्माण होणारे धक्के (Shocks) टाळता येतील. जास्तीच्या वाऱ्यापासून सांगाड्याचे संरक्षण करावयाचे असल्यास Elastic Cord Mm ५ मिमी व्यासचा वापर वैकल्पिक साहित्य म्हणून करता येईल.

६. उपसांगाड्यावरती कमीत कमी ५ फूट उंचीवर कमीत कमी 140 GSM असलेले UV संस्करित, कमीत कमी प्रकाश आत येण्याची क्षमता ८० टक्के प्रकाश विस्फरण्याची क्षमता किमान ४० टक्के, १०० टक्के व्हर्जिन, ४ मि.मी. जाड दोरी चारही कडांवर reinforced एम्बेड केलेली, पॉलीथिलीन ओव्हन लॅमिनेटेड फॅब्रिकच्या पेपरची जोडणी करावी. वाऱ्याचा वेग जादा असेल तर 160 GSM पॉलीथिलीन ओव्हन लॅमिनेटेड फॅब्रिकच्या पेपरची (वैकल्पिक साहित्य) जोडणी करावी.

७. प्लॅस्टिक कव्हर या तंत्रज्ञानासाठी प्रामुख्याने एमएस अँगल, UV संस्करित Polyethylene Woven Laminated Fabric, प्लास्टिक दोरी (४ मिमी जाडी) च्या ऐवजी Elastic Cord (4mm Dia), Polyethylene Wire हे साहित्य तांत्रिकदृष्ट्या उपयुक्त आहे.

✪





# मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना – वैयक्तिक शेततळे

**राज्यातील ८२ टक्के शेती ही सर्वस्वी पावसावर अवलंबून असलेली कोरडवाहू शेती आहे. राज्याच्या विविध भागातील पावसाचे असमान वितरण आणि पावसातील अनिश्चित येणारे खंड या प्रमुख नसर्गिक आपत्ती आहेत. यामुळे सिंचनाअभावी पिक उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट येते. जेथे पाण्याचा जास्त ताण पडतो तेथील पिके नष्ट देखील होतात. या बाबीचा विचार करुन शासनाने मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे या बाबीचा समावेश करण्यात आला आहे.**

**१) उद्देश :** पाणलोट क्षेत्राच्या भूगर्भातील पाण्याचे पुर्नभरण करणे, आपात्कालिन स्थितीत पिकास पाणी देण्यासाठी संरक्षित सिंचन सुविधा करणे, संरक्षित सिंचनामुळे पिकाच्या उत्पादनात वाढ करणे, चिबड व पाणथळ जमीन सुधारणेसाठी शेततळ्याचा उपयोग करणे, मोठ्या प्रमाणातील पावसामुळे निर्माण झालेला अतिरिक्त अपधाव साठवून ठेवण्याकरिता शेतावर शेततळ्यासारखी पायाभूत सुविधा उभी करण्यास चालना देणे.

**२) योजनेचे स्वरुप :** मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे या बाबीचा समावेश करण्यात आला असून वैयक्तिक शेततळ्यास किमान रुपये १४४३३/- तर कमाल रुपये ७५०००/- इतके अनुदान देण्यात येते. या योजनेकरिता महा-डीबीटी प्रणाली अंतर्गत शेतकऱ्याकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतात. वैयक्तिक शेततळे या घटकाची महा-डीबीटी प्रणालीव्दारे तालुकानिहाय लक्षांक देऊन ऑनलाईन सोडतीव्दारे लाभार्थ्यांची निवड करुन योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. शेततळे पूर्ण झाल्यानंतर योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेले अनुदान संबंधित शेतकऱ्याच्या आधार क्रमांकाशी सलग्न बँक खात्यावर पीएफएमएस प्रणालीव्दारे वर्ग करण्यात येते.

**३) समाविष्ट जिल्हे :** सर्व जिल्हे

**४) लाभार्थी निवडीचे निकष :** अर्जदार शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर किमान ०.४० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. तर कोकण विभागासाठी क्षेत्राची अट ०.२० हेक्टर इतकी आहे. क्षेत्र धारणेस कमाल मर्यादा नाही. अर्जदार शेतकऱ्याची जमीन शेततळे खोदण्यास तांत्रिकदृष्ट्या योग्य असणे आवश्यक राहील. जेणेकरुन वाहून जाणारे पावसाचे पाणी नैसर्गिक प्रवाहाव्दारे शेततळ्यात साठविणेकरिता पुनर्भरण करणे शक्य होईल. अर्जदार शेतकऱ्यांनी यापूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी किंवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे या घटकाकरिता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

✪

**५) घटकनिहाय आर्थिक मापदंड :-**

शेततळे आकारमानानुसार लाभार्थी शेतकऱ्यास देय अनुदानाचा तपशिल.

| अ. क्र. | आकारमान (मीटरमध्ये) | इनलेट/आऊटलेट खोदाई व सिल्टट्रॅपसह | | | | इनलेट/आऊटलेट खोदाई व सिल्टट्रॅप विरहीत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बाजू उतार १:१ | | बाजू उतार १:१.५ | | बाजू उतार १:१ | | बाजू उतार १:१.५ | |
| | | सर्वसाधारण क्षेत्र | आदिवासी उपयोजना व डोंगराळ क्षेत्र | सर्वसाधारण क्षेत्र | आदिवासी उपयोजना व डोंगराळ क्षेत्र | सर्वसाधारण क्षेत्र | आदिवासी उपयोजना व डोंगराळ क्षेत्र | सर्वसाधारण क्षेत्र | आदिवासी उपयोजना व डोंगराळ क्षेत्र |
| १ | १५x१५x३ | २३,८८१ | २६,०१० | १९,६९३ | २१,४९२ | १८,६२१ | २०,२३५ | १४,४३३ | १५,७१७ |
| २ | २० x१५ x३ | ३२,०३४ | ३४,८२१ | २६,७९९ | २९,१७४ | २६,७७४ | २९,०४६ | २१,५३९ | २३,३९९ |
| ३ | २० x२० x३ | ४३,६७८ | ४७,३९८ | ३७,३९५ | ४०,६२१ | ३८,४१७ | ४१,६२३ | ३२,१३५ | ३४,८४६ |
| ४ | २५ x२० x ३ | ५५,३२१ | ५९,९७४ | ४७,९९१ | ५२,०६८ | ५०,०६१ | ५४,१९९ | ४२,७३१ | ४६,२९३ |
| ५ | २५ x २५ x ३ | ७०,४५५ | ७५,००० | ६२,०७८ | ६७,२८० | ६५,१९४ | ७०,५४० | ५६,८१८ | ६१,५०५ |
| ६ | ३० x २५ x ३ | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७०,९०४ | ७५,००० |
| ७ | ३० x ३० x ३ | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० |
| ८ | ३४ x ३४ x ३ | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० |

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत वयक्तिक शेततळे या योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घेण्याकरीता https://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/loginया संकेतस्थळावर अर्ज करावा.

# राष्ट्रीय कृषी विकास योजना– प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन योजना)

राज्याच्या सर्वांगीण विकासात कृषी क्षेत्राचे अनन्य साधारण महत्व आहे. कोणत्याही पिकाचे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार उत्पादन घ्यायचे असेल तर पाणी हा पिक उत्पादनातील महत्वाचा निर्णायक घटक आहे. पाण्याचे काटेकोर नियोजन आणि व्यवस्थापन हे पिक उत्पादन व गुणवत्ता वाढीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करुन कमी पाण्यात आणि खर्चात जमिनीची सुपीकता आणि उत्पादकता कायम स्वरुपी टिकवून ठेऊन अधिकाधिक गुणवत्तापुर्ण उत्पादन मिळवणे व राज्यातील जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणणे या उद्देशाने देशात राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सन १९८६–८७ पासून राबविण्यात येत आहे.

राज्य पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविणारे महाराष्ट्र हे प्रथम राज्य आहे. केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सन २००५–०६ पासुन सुरु झाली असून सन २०१५–१६ पासून सूक्ष्म सिंचन योजना प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. सन २०२२–२३ पासून ही योजना राष्ट्रीय कृषी विकास योजना (वार्षिक कृती आराखडा आधारित)– प्रति थेंब अधिक पीक या घटकांतर्गत राबविण्यात येत आहे. या योजनेत निधीची तरतूद केंद्र व राज्य ६०:४० टक्के या प्रमाणात आहे.

■ **योजनेचा उद्देश :**

- पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविणे
- सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र वाढवणे (per drop more crop)

■ **अनुदान मर्यादा :**

- अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५%
- इतर शेतकऱ्यांना ४५% अनुदानाचे निकष असून क्षेत्राची मर्यादा ५ हेक्टर आहे.

■ **योजनेची व्याप्ती :** सदर योजना राज्यातील सर्व ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

■ **लाभ क्षेत्र मर्यादा :** सूक्ष्म सिंचन संच घटकाचे आयुर्मान ७ वर्ष करण्यात आले असून ज्या लाभधारकाने ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेतला आहे अशा लाभधारकास ७ वर्षानंतर पुन्हा सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घेता येईल. तुषार सिंचनासाठी लाभ घेतलेल्या क्षेत्रात ३ वर्षानंतर ठिबक सिंचनासाठी लाभ घेता येईल.

■ **योजनेची अंमलबजावणी :** सन २०१२–१३ पासून सन २०१९–२० पर्यंत इ–ठिबक आज्ञावलीद्वारे लाभ देण्यात येत होता. सन २०२०–२१ पासून महाडीबीटी पोर्टलवर अर्ज स्वीकारण्यात येतात. कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या सोयीकरीता सर्व योजनांचा लाभ महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यासाठी एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसीत केली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या बाबी निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आले असून शेतकऱ्यांना शेतीशी निगडीत विविध बाबीकरिता अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर बाबी ज्या योजनेमधून देता येऊ शकतील त्या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांची संगणकीय सोडत पद्धतीने निवड करण्यात येत आहे. यामुळे योजना अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता



व पारदर्शकता येऊन योजना अंमलबजावणी व प्रगतीचे प्रभावी नियंत्रण करणे शक्य झाले आहे.

## महाडीबीटी पोर्टलवरील अर्ज प्रक्रीया

■ **अर्जदारांची नोंदणी व आधार प्रमाणीकरण :**

शेतकऱ्यांना कृषी विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करुन आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना एका अर्जाद्वारे सर्व योजनांसाठी अर्ज करण्याची सुविधा अहोरात्र (२४x७) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**संकेतस्थळ :** महाडीबीटी पोर्टलचे https://mahadbtmahait.gov.in/ हे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळावरील शेतकरी योजना हा पर्याय निवडावा. शेतकरी स्वतःच्या मोबाईल, संगणक / लॅपटॅाप /टॅबलेट, सामुदायिक सेवा केंद्र (CSC), ग्रामपंचायतीतील संग्राम केंद्र इ. माध्यमातून उपरोक्त संकेतस्थळावर जाऊन अर्ज करू शकतात.

**अर्ज शुल्क :**

अर्ज सादर करतेवेळी शेतकऱ्यांनी रु. २०/- शुल्क व जी.एस.टी रु. ३.६० /- मिळून एकूण रु. २३.६० /- शुल्क ऑनलाइन भरावयाचे आहेत.

■ **लाभार्थी पात्रता :**

- शेतकऱ्यांच्या नावे मालकी हक्काचा ७/१२ व ८-अ उतारा असावा.
- सूक्ष्म सिंचन घटकाचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध असावी.

■ **योजनेची वैशिष्ट्ये :**

- महाडीबीटी संकेतस्थळावरून अहोरात्र (२४ x ७) अर्ज प्रक्रिया सुरू आहे.
- संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन असून हार्डकॉपी सादर करण्याची आवश्यकता नाही.
- पारदर्शक पद्धतीने संगणकीकृत सोडत करण्यात येत आहे.
- शेतकऱ्यांच्या आधार लिंक्ड बँक खात्यामध्ये अनुदान थेट जमा होते.
- केंद्राच्या सुधारित खर्च मर्यादेप्रमाणे सर्व पिकांसाठी अनुदान देण्यात येते.

■ **अर्ज करणेपासून अनुदान अदायगी पर्यंत विविध प्रक्रीया खालीलप्रमाणे :**

- **एकत्रित संगणकीय प्रणालीद्वारे लाभार्थी निवड :** महाडीबीटी पोर्टलद्वारे प्राप्त झालेल्या अर्जामधून एकत्रित संगणकीय सोडत काढण्यात येते. संगणकीय सोडतीत निवड झालेल्या लाभार्थ्यांना त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संदेशाद्वारे (SMS) त्यांच्या निवडीबाबत अवगत करण्यात येते.
- **कागदपत्रे अपलोड करणे :** संगणकीय सोडतीत निवड झालेल्या शेतकऱ्यांनी खालील कागदपत्रे १० दिवसांच्या मुदतीमध्ये महाडीबीटी पोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे. जे शेतकरी विहित मुदतीमध्ये कागदपत्रे अपलोड करणार नाहीत त्यांचे अर्ज संगणकीय प्रणालीद्वारे आपोआप रद्द करण्यात येतात.
- **सोडतीनंतर महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करावयाची कागदपत्रे**

१. शेतकऱ्याच्या मालकी हक्काचा ७/१२

२. ८ - अ उतारा (एकूण क्षेत्राच्या माहीतीसाठी व एकापेक्षा अनेक गावात जमीन असल्यास)

- **कागदपत्रांची छाननी करणे :** संगणकीय सोडतीत निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी कृषी सहाय्यक यांचे स्तरावर करण्यात येते. कागदपत्रांची पूर्तता झाली नसेल असे प्रस्ताव शेतकऱ्यांच्या लॉग ईन अकाऊंटमध्ये कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी परत पाठविले जातात.
- **पुर्वसंमती प्रदान करणे :** छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना तालुका कृषी अधिकारी एकत्रित संगणकीय प्रणालीद्वारे पूर्वसंमती प्रदान करतात.
- **संच खरेदी करुन देयक अपलोड करणे :** पुर्व संमती प्राप्त झाल्यानंतर लाभाधारकास त्यांच्या पसंतीच्या उत्पादकांकडून किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या वितरक किंवा विक्रेत्यांकडून ३० दिवसाच्या आत सुक्ष्म सिंचन संच बसविणे आवश्यक आहे. विहीत मुदतीत सुक्ष्मसिंचन संच न बसविल्यास त्यांची









पुर्वसंमती आपोआप रद्द होते. तथापी त्यांना पुन्हा अर्ज करता येतो.

■ **संच खरेदी केल्यानंतर महाडीबीटी पोर्टलवर सादर करावयाची कागदपत्रे**

१. शेतकऱ्याचे हमीपत्र
२. देयकाची मूळ प्रत (टॅक्स इन्व्हाईस)
३. कंपनी प्रतिनिधीने तयार केलेला सूक्ष्म सिंचन संच आराखडा व प्रमाणपत्र.

**मोका तपासणी व देयक छाननी :** कृषी पर्यवेक्षक हे देयक छाननी करतात. तसेच प्रत्यक्ष क्षेत्रिय मोका तपासणी करुन पोर्टलवर अहवालाची नोंद घेऊन छाननीअंती पात्र प्रस्तावास शिफारस करतात.

**देयक छाननी :** छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या प्रस्तावांची अनुदान परीगणना निकषानुसार असल्याची खात्री करुन तालुका कृषी अधिकारी यांचे स्तरावर शिफारस होते.

**अनुदान परीगणना व मंजुरी देणे :** देयकाची रक्कम (जीएसटी रक्कम वगळुन (मोका तपासणी अहवालानुसार निश्चित झालेली रक्कम आणि मार्गदर्शक सूचनेतील मापदंडाप्रमाणे निश्चित झालेली रक्कम यापैकी सर्वात कमी आलेल्या रकमेनुसार अनुदान परिगणना करुन मंजुरीसह शिफारशीस सादर केली जाते.

**लाभार्थ्याच्या बँक खात्यात अनुदान जमा करणे :** तालुका कृषी अधिकारी यांचेकडून मंजुरी देण्यात आलेल्या प्रस्तावास जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे स्तरावरुन शेतकऱ्यांचा आधार क्रमांक त्यांच्या ज्या बँक खात्याशी संलग्न असेल त्याच खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होते.



**आ. तुषार सिंचन संच –केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार अनुदान परिगणनेसाठी तुषार सिंचन संच उभारणीसाठी प्रति हेक्टरी खर्च मर्यादा (रुपये)**

**चल स्प्रिंकलर (पोर्टेबल)**

| क्षेत्र (हे) | ६३ मिमि | ७५ मिमि | ९० मिमि |
|---|---|---|---|
| ०.४ हे. पर्यंत | १३२११ | लागू नाही | लागू नाही |
| १ हे. पर्यंत | २१५८८ | २४१९४ | लागू नाही |
| २ हे. पर्यंत | ३११६७ | ३४६५७ | लागू नाही |
| ३ हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ४६७७९ |
| ४ हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ५८९९५ |
| ५ हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ६६७८९ |

**मायक्रो स्प्रिंकलर**

| क्षेत्र (हेक्टर) | अंतर ५ x ५ मी | अंतर ३ x ३ मी |
|---|---|---|
| ०.४ | ३२७१३ | ३८२६३ |
| १ | ६५१०२ | ७४२५९ |
| २ | ११४४२६ | १३३८२१ |
| ३ | १६४९३७ | १९१०७८ |
| ४ | २२२७२१ | २६३८५२ |
| ५ | २८१५५७ | ३२१४६२ |

**मीनी स्प्रिंकलर**

| क्षेत्र (हेक्टर) | अंतर १०x१० मी | अंतर ८x८ मी |
|---|---|---|
| ०.४ | ४५६९४ | ४७५२८ |
| १ | ९४१३४ | १०३८७३ |
| २ | १७६७६६ | १८७९२९ |
| ३ | २६८४२२ | २९०९३५ |
| ४ | ३४५४९७ | ३८००३१ |
| ५ | ४२३२३६ | ४६९८९० |

**लार्ज व्हॉलूम स्प्रिंकलर इरिगेशन सिस्टीम (रेनगन)**

| क्षेत्र (हे) | ६३ मिमि | ७५ मिमि | ९० मिमि |
|---|---|---|---|
| १ | ३१६८४ | ३८१२७ | लागू नाही |
| २ | लागू नाही | ४८३७० | लागू नाही |
| ३ | लागू नाही | लागू नाही | ६२७६७ |
| ४ | लागू नाही | लागू नाही | ७२७५१ |
| ५ | लागू नाही | लागू नाही | ७९८९४ |

■ **विविध लागवड अंतरावरील क्षेत्राकरीता खर्च मर्यादा व अनुदान मर्यादा :**

**अ. ठिबक सिंचन – केंद्र शासनाने सन २०२४-२५ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार ठिबक सिंचन संचाचे अनुदान परिगणना करणेसाठी खालील प्रमाणे खर्च मर्यादा राहील.**

| लॅटरल अंतर मीटर | 0.२0 हेक्टर | 0.४0 हेक्टर | १ हेक्टर | २ हेक्टर | ३ हेक्टर | ४ हेक्टर | ५ हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२x१२ | १०५२६ | १८००९ | २४५८६ | ३९०९८ | ६०७०४ | ७५५२१ | ९६१६६ |
| १०x१० | १०८५४ | १८६५२ | २६१८१ | ४२२२६ | ६५४८७ | ८२०२५ | १०४२९२ |
| ९x९ | ११०९१ | १९११४ | २७३०४ | ४४४६९ | ६८८५३ | ८६६०६ | ११००२४ |
| ८x८ | ११३३० | १९७११ | २८७७७ | ४७३१४ | ७३२७२ | ९२६१५ | ११७५२९ |
| ६x६ | १२४०० | २१६९३ | ३४६८७ | ५७९८७ | ९३६८८ | ११३६१८ | १४२५६६ |
| ५x५ | १३१४४ | २३४८६ | ३९३७८ | ६७१९९ | ९७११० | १२३४०९ | १६५८१५ |
| ४x४ | १४६०२ | २४३२६ | ४१५३४ | ७२७९९ | ११३५६० | १४८६८४ | १७६९६४ |
| ३x३ | १५७९२ | २६१९० | ४७७५१ | ८२६५४ | १२७३०६ | १६०१०३ | २००४५५ |
| २.५x२.५ | १९५१६ | ३५३९३ | ६८२३४ | १२४२१६ | १८९७२४ | २६६२७४ | ३२५२३३ |
| २x२ | २३९३२ | ४१३०३ | ८३०८५ | १६१२६३ | २३४२८० | ३२५४६९ | ३९९४९४ |
| १.५x१.५ | २८१०६ | ४६९९५ | ९७२४५ | १८५३२४ | २७६७६७ | ३८२२४६ | ४७०३०६ |
| २.५x०.६ | २०२०१ | ३५००० | ७१७३३ | १३१८२४ | २०१४६४ | २७९७७० | ३४३४३३ |
| १.८x०.६ | २४५६९ | ४२९९२ | ९१५६० | १७३२९८ | २६०८६८ | ३५५३२३ | ४४२४८४ |
| १.५x०.६ | २८००३ | ५०११६ | १०९५३१ | २०७८६० | ३१३९०९ | ४२५१८९ | ५३०९०५ |
| १.२x०.६ (किंवा त्यापेक्षा कमी) | ३१४३६ | ५७२४१ | १२७५०१ | २४२४२२ | ३६६९५० | ४९५०५५ | ६१९३२६ |

## सूक्ष्म सिंचन घटक पूरक अनुदानाकरिता विविध योजना

**१. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना**

प्रति थेंब अधिक पीक अंतर्गत लाभ घेतलेल्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनास पुरक अनुदान देऊन आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने सूक्ष्म सिंचन संच बसविणाऱ्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांना मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत पुरक अनुदान देण्याचा निर्णय सन २०२१ मध्ये महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. यामध्ये अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पुरक अनुदान देऊन सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे ८० टक्के व ७५ टक्के एकूण अनुदान देय आहे.

**२. अटल भूजल योजना**

सदर योजना राज्यातील १३ जिल्ह्यातील ४२ तालुक्यातील १४४२ गावांमध्ये केंद्र शासन व जागतिक बँक यांच्या अर्थसहाय्याने ५ वर्षाच्या कालावधीसाठी राबविण्यात येत आहे. अटल भूजल योजनेमधून या योजनेतील समाविष्ट गावामधील अल्प व अत्यल्प भूधारक आणि इतर शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे २५% आणि ३०% पूरक अनुदान देण्यात येत आहे.

**३. राष्ट्रीय कृषी विकास योजना**

प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत लाभ देण्यात आलेल्या शेतकऱ्यांना विक्री पश्चात सेवा देणे व तत्संबंधीत प्रशिक्षण देणे या उद्देशाने वर्षातून एकदा पंधरवडा मोहिम राबविण्यात येते. यामध्ये सुक्ष्म सिंचन संच उत्पादक व पुरवठादार कंपनीकडून सिंचन संच विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतावर जाऊन विक्रीपश्चात सेवा देणे, सिंचन संच घटकास आम्ल प्रक्रीया करुन देणे, सिंचन संच देखभाल व दुरुस्तीबाबत सेवा व प्रशिक्षण देण्यात येते.

महाडीबीटी पोर्टलमुळे योजना अंमलबजावणी व लाभार्थ्यांची पारदर्शक व अचूक निवड तसेच एकाच अर्जावर कृषी विभागाच्या सर्व योजनांचा शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत आहे. तरी राज्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सुक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घ्यावा याकरीता कृषी विभागाकडून सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी व ऑनलाइन अर्ज करण्यासाठी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळास अवश्य भेट द्या. तसेच योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या जिल्हा आणि तालुका कार्यालयाशी तसेच आपल्या गावाच्या कृषी सहाय्यकाशी संपर्क साधावा.

✪

**शेतकऱ्यांनी वर्गणी कशी भरावी याची सविस्तर माहिती घेण्याकरिता शेजारी दिलेला QR Code स्कॅन करा**

# कृषी यांत्रिकीकरण

## केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान व राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण







**■ योजनेचा उद्देश :**

१. शेतकऱ्यांना कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देणे.

२. विभागनिहाय पीकरचनेनुसार गरजेनुरुप व मागणी प्रमाणे पूर्वतपासणी केलेली दर्जेदार कृषीऔजारे अनुदानावर उपलब्ध करुन देणे.

३. कृषी उत्पादनात अद्ययावत यंत्रसामुग्री वापरासाठी प्रोत्साहीत करणे.

**■ समाविष्ठ जिल्हे –सर्व जिल्हे**

**■ लाभार्थी निवडीचे निकष** :

जिल्ह्यातील प्रवर्गनिहाय खातेदार संख्या, पेरणीखालील क्षेत्र, मागील वर्षातील मंजूर कार्यक्रम, मागील ६ वर्षांमधील खर्च विचारात घेऊन जिल्हानिहाय लक्षांक देण्यात येतात.

इच्छुक शेतकऱ्यांकडून https://mahadbt.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर अर्ज मागविण्यात येतात. लाभार्थी निवडीच्या पारदर्शकतेसाठी ऑनलाइन लॉटरी पद्धतीने जेष्ठताक्रम निश्चित करून पूर्वसंमती देण्यात येत आहे. लाभार्थी निवड ते अनुदान अदायगीपर्यंत सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. शेतकरी असणे अनिवार्य आहे.

**■ योजनेचे स्वरूप :**

- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचानांनुसार अधिसूचित कृषी यंत्र/ अवजारांच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यात येते.
- यामध्ये ट्रॅक्टर, पॉवर टिलर, स्वयंचलित यंत्रे, ट्रॅक्टरचलित अवजारे, ट्रॅक्टरचलित पिक संरक्षण अवजारे व पिक काढणीपश्चात प्राथमिक प्रक्रिया अवजारे यांचा समावेश आहे.
- सर्वसाधारणपणे किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा केंद्र शासनाने घोषित केलेली उच्चतम अनुदान मर्यादा यापैकी कमी असेल ते, याप्रमाणे अनुदान देण्यात येते.

**■ योजनेची अंमलबजावणी :**

पूर्वसंमती नंतर शेतकऱ्यांना त्यांच्या पसंतीनुसार खुल्या बाजारातून खरेदीची मुभा देण्यात येत आहे. खरेदीच्या वेळी शेतकऱ्यांनी स्वतःच्या बँक खात्यामधून चेक/डीडी/ऑनलाईन पद्धतीने देयकाची अदायगी करणे आवश्यक, थेट लाभ हस्तांतर (डीबीटी) पद्धतीचा अवलंब करून अनुदानाची रक्कम लाभार्थी शेतकऱ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करण्यात येत आहे.

**■ घटकनिहाय आर्थिक मापदंड:**

| अ.क्र. | यंत्र / औजारे प्रकार | अनुदान दर (**) | |
|---|---|---|---|
| | | अल्प /अत्यल्प /महिला/ अजा/अज 50 % | इतर ४० % |
| १ | ट्रॅक्टर ( ***) | रु. १,२५,००० | रु. १,००,००० |
| २ | पॉवर टिलर | ५०% | ४०% |
| ३ | स्वंयचलीत / विशेष स्वंयचलीत यंत्रे | ५०% | ४०% |
| ४ | ट्रॅक्टर चलीत अवजारे | ५०% | ४०% |
| | i) जमिन सुधारणा मशागत औजारे | ५०% | ४०% |
| | ii) पेरणी लागवड व कापणी औजारे | ५०% | ४०% |
| | iii) अंतरमशागत औजारे | ५०% | ४०% |
| | vi) पिक अवशेष व्यवस्थापन यंत्र / औजारे | ५०% | ४०% |
| | v) कापणी व मळणी यंत्र / औजारे | ५०% | ४०% |
| ५ | काढणी पश्चात यंत्रे | ६०% | ५०% |
| ६ | मनुष्य व बैल चलीत यंत्र / औजारे | ५०% | ४०% |
| ७ | पिक संरक्षण उपकरणे | ५०% | ४०% |
| ८ | कृषी औजारे बँकेची स्थापना | ४०% | |

(***) ट्रॅक्टर या घटकासाठी अनुदान मर्यादा वरीलप्रमाणे सिमित करण्यात आलेली आहे.

(**) किंमतीच्या ५०/४० % किंवा केंद्र शासनाने निर्धारीत केलेली रक्कम या पैकी जे कमी असेल ते

# शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा अंदाज : जुलै ते सप्टेंबर २०२४

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष, स्मार्ट प्रकल्प

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पातील, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - कृषी अंतर्गत बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष (Market Intelligence and Risk Mitigation Cell) कार्यरत आहे. सदर कक्षांतर्गत बाजार माहितीचे विश्लेषण व प्रसार, निवडलेल्या पिकांच्या संभाव्य किंमतीचे अंदाज अहवाल तयार करणे तसेच शेतमाल जोखीम व्यवस्थापन आणि शेतमालाचे उत्पादन, उत्पादकता, पाऊस, बाजारातील आवक व किंमती, आयात व निर्यात इ. विषयक आकडेवारी गोळा करून त्याचे विश्लेषण करण्याचे काम करण्यात येत आहे. सध्या सोयाबीन, कापूस, मका, तूर, हरभरा व कांदा या पिकांच्या संभाव्य किंमती काय असतील याचे अंदाज तयार करण्याचे काम करण्यात येत आहेत. सदर कक्षांतर्गत सोयाबीन, कापूस, मका, हरभरा व तूर या पिकांच्या माहे जुलै ते सप्टेंबर २०२४ या कालावधीसाठी संभाव्य किंमती काय असतील याचा अंदाज तयार करण्यात आलेला आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे:**

**मका -** मका हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशा तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्यप्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तरप्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो. भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.

अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२३-२४ साठी प्रमुख जागतिक व्यापार बदलांमध्ये दक्षिण आफ्रिका, भारत आणि टांझानिया मध्ये मका पिकासाठी निर्यात कमी होणार असल्याचा अंदाज आहे.

Maize Outlook अहवालानुसार इथेनॉल उद्योगांकडून मक्याची मागणी वाढल्याने बहुतांश बाजारपेठेतील मक्याचे भाव स्थिर किंवा वाढीचे राहिले आहे. पुढील काळात औद्योगिक क्षेत्रात इथेनॉल उत्पादनासाठी मक्याची मागणी राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे मक्याची कमी उपलब्धता आणि बाजारात इथेनॉलची वाढती मागणी यामुळे मक्याची किंमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी खरीप हंगामात (२०२३-२४) मक्याच्या उत्पादनात ४% घट होईल असा अंदाज आहे. तसेच महाराष्ट्रामध्ये देखील मागील वर्षाच्या तुलनेत चालू वर्षी खरीप हंगामात (२०२३-२४) मक्याच्या उत्पादनात जवळपास ४७% घट होईल असा अंदाज आहे.

खरीप हंगाम २०२३-२४ साठी मका पिकाची आधारभूत किंमत (MSP) रु. २०९० प्रति क्विं. इतकी आहे.

मागील तीन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या जुलै ते सप्टेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे :

| | |
|---|---|
| जुलै ते सप्टेंबर २०२१ | रुपये १७७४ प्रति क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२२ | रुपये २१५७ प्रति क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२३ | रुपये २०८२ प्रति क्विंटल |

**(स्त्रोत:** Agmarknet)

**तूर:** भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तरप्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. तुरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तुरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे.

तूर हे खरीप पिक असून त्याची पेरणी जून ते जुलै व काढणी डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२३-२४ मध्ये तुरीचे उत्पादन सुमारे ३३.३९ लाख टन होण्याची शक्यता आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच असल्याचे दिसून येत आहे. तसेच महाराष्ट्रातील २०२२-२३ मधील उत्पादन ९.२ लाख टनांवरून सन २०२३-२४ मध्ये ८.७ लाख टनांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. मागील वर्ष २०२१-२२ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये आयात वाढलेली आहे तर निर्यात कमी झालेली आहे

माहे डिसेंबर ते एप्रिल हा तुरीचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष मार्च २०२३-२४ मधील तुरीची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी राहिलेली दिसून येत आहे. जून २०२४ (१३ जून २०२४ पर्यंत) मध्ये २.० लाख टन आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत ६.३ लाख टन होती.

डिसेंबर २०२२ पासून तुरीच्या किंमती वाढत आहेत. गतवर्षीच्या दरापेक्षा चालू वर्षी तुरीचे भाव जास्त आहेत. मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील तुरीच्या जुलै ते सप्टेंबर मधील सरासरी

किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| जुलै ते सप्टेंबर २०२१ | रु. ६,३६२/क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२२ | रु. ७,२८८/क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२३ | रु. १०,२१६/क्विंटल |

स्त्रोत: Agmarknet

सध्याच्या हंगामासाठी सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (रु. ७०००/क्विंटल) सध्याच्या तुरीच्या किंमती जास्त आहेत.

**हरभरा :** हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरूपात केला जातो.

हरभरा हे रब्बी पिक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२३-२४ मध्ये हरभऱ्याचे उत्पादन सुमारे १२१.६१ लाख टन होण्याची शक्यता आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन २७.१५ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ३६.३९ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. मागील वर्ष २०२१-२२ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये निर्यात वाढलेली आहे तर आयात कमी झालेली आहे

मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष जून २०२३-२४ मधील हरभऱ्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी झालेली दिसून येत आहे. जून २०२४ (१३ जून २०२४ पर्यंत) मध्ये ती ०.५ लाख टन इतकी आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत १.५ लाख टन इतकी होती.

ऑक्टोबर २०२२ पासून हरभऱ्याच्या किंमती वाढत आहेत. ऑगस्ट २०२३ नंतर, त्या सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.

मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील हरभऱ्याच्या जुलै ते सप्टेंबर मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| जुलै ते सप्टेंबर २०२१ | रु. ४,९२२ /क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२२ | रु. ४,६३२ /क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२३ | रु. ५,३७६ /क्विंटल |

स्त्रोत: Agmarknet.

सध्याच्या रब्बी हंगामासाठी हरभऱ्याची सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत रु. ५४४०/क्विंटल आहे.

**सोयाबीन :** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किंमतीवर परिणाम होतो.

अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, जून २०२४) अहवालानुसार सन २०२४-२५ मध्ये, जगात ४२२६ लाख टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत टक्क्यांनी (३९५९ लाख टन, २०२३-२४) अधिक आहे. भारतात सन २०२४-२५ मध्ये सोयाबीनचे उत्पादन १२२ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ३ टक्क्यांनी (११० लाख टन, २०२३-२४) जास्त आहे.

कृषी मंत्रालयाच्या तृतीय पूर्वानुमान अहवालानुसार सन २०२३-२४ मध्ये भारतात सोयाबीनचे १३०.५४ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. कृषी विभाग, महाराष्ट्र शासनाच्या तृतीय पूर्वानुमान अहवालानुसार राज्यात सन २०२३-२४ मध्ये सोयाबीनचे ६६.०९ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे.

माहे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत भारतातून सोयामीलची २१.३३ लाख टन निर्यात झाली आहे. मागील वर्षी याच कालावधीत १०.२२ लाख टन ( २०२२-२३) निर्यात झाली होती. मागील वर्षीच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात सोयापेंडच्या निर्यातीत १०९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. एप्रिल २०२४ मध्ये सोयापेंडची २ लाख टन निर्यात झाली आहे. माहे नोव्हेंबर २०२३ ते मे २०२४ या कालावधीत १५.९२ लाख टन सोयातेल आयात केले आहे, मागील वर्षीच्या नोव्हेंबर २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत ३६.७६ लाख टन सोयातेलाची आयात झाली होती (स्त्रोत: SEA अहवाल जून २०२४).

सन २०२३-२४ साठी सोयाबीनची किमान आधारभूत किंमत रु.४६०० प्रती क्विंटल आहे. मागील तीन वर्षातील लातूर बाजारातील सोयाबीनच्या माहे जुलै ते सप्टेंबर मधील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:

| | |
|---|---|
| जुलै ते सप्टेंबर २०२१ | रु. ७७८३/क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२२ | रु. ५३८४/क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२३ | रु. ४८७६/क्विंटल |

स्त्रोत: Agmarknet.

**शेतमालाचे संभाव्य किंमत अंदाज: (किंमती रु./क्विंटलमध्ये )**

| पिके | मका | तूर | हरभरा | सोयाबीन | कापूस |
|---|---|---|---|---|---|
| बाजार | नांदगाव | लातूर | लातूर | लातूर | अकोला |
| MSP (२०२३-२४) | २०९० | ७००० | ५४४० | ४६०० | ६६२०* |
| जुलै ते सप्टेंबर २०२४ मधील संभाव्य किंमती | २१००-२६०० | १०५००-१२५०० | ६०००-८००० | ४३००-५००० | ७०००-८००० |

* सदर MSP ही मध्यम धाग्याच्या कापसाकरिता आहे.

**कापूस** - कापूस हे भारतातील सर्वात महत्त्वाचे व्यावसायिक पीक आहे, जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी २५% वाटा भारताचा आहे. USDA च्या अहवालानुसार जागतिक स्तरावर वर्ष २०२३-२४ मध्ये कापूस उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत किरकोळ वाढण्याची अपेक्षा आहे (०.५ टक्के किंवा ६,००,००० गाठी) ते ११५ दशलक्ष गाठी युनायटेड स्टेट्समध्ये जास्त उत्पादनाची अपेक्षा तसेच चीन, तुर्कस्तान आणि पाकिस्तान मध्ये कमी उत्पादनाचा अंदाज आहे.

भारतामध्ये वर्ष २०२१-२२ मध्ये कापसाचे उत्पादन गेल्या १४ वर्षांमधील नीचांकी उत्पादन होते त्यानंतर २०२२-२३ मध्ये ३३७ लाख गाठी म्हणजे तुलनेने २६ लाख गाठींनी जास्त होते तर वर्ष २०२३-२४ मध्ये ३३४ लाख गाठी असल्याचा अंदाज आहे.

भारतीय बाजारपेठेमध्ये मार्च महिन्यात कापसाची आवक गतवर्षीप्रमाणेच असल्याचे दिसून येत आहे. मागील तीन वर्षातील अकोला बाजारपेठेतील कापसाच्या जुलै ते सप्टेंबर मधील सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| जुलै ते सप्टेंबर २०२१ | रु. ७,२८६ / क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२२ | रु. १०,१५४ / क्विंटल |
| जुलै ते सप्टेंबर २०२३ | रु. ७,४०७ / क्विंटल |

सध्याच्या हंगामासाठी सरकारने मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु. ६६२० आणि लांब धाग्याच्या कापसासाठी रु. ७०२० इतकी किमान आधारभूत किंमत जाहीर केली असून सध्याच्या बाजारातील किमती यापेक्षा जास्त आहेत.

सदर किंमत अंदाज हे त्या पिकासाठी निवडलेल्या बाजाराकरीता असून इतर बाजारामध्ये किंमती वेगळ्या असू शकतील. सदर अहवाल प्रत्येक महिन्याला प्रकाशित केला जाईल. पुढील सुधारित अंदाज अहवाल जुलै २०२४ मध्ये प्रकाशित केला जाईल.

**◈ सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा.**

**अधिक माहितीसाठी :** बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष, पुणे, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, एम.एस.एफ.सी बिल्डींग, २७० भाम्बुर्डा, नारायण एस.बी.मार्ग, सिंबायोसिस कॉलेज, गोखले नगर, पुणे ४११०१६, फोन: ०२०-२५६५६५७७, टोल फ्री: १८०० २१० १७७०, ई-मेल: mirmc.smart@gmail.com, वेबसाईट: https://www.smart-mh.org

✪

## टोल फ्री किसान सेवा

- कृषि विभागाचा टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ४००० ही सेवा जून २०११ पासून कार्यान्वित आहे.
- सदर सेवेतून शेतकऱ्यांना बियाणे, किटकनाशके खते, इत्यादीबाबत अडचणी, शंका व शेती विषयक प्रश्नाबाबत मोफत मार्गदर्शन प्राप्त करुन घेता येते.
- किसान कॉल सेंटर टोल फ्री दूरध्वनी : १८०० १८० १५५१




पीक कोणतेही असो बियाणं फक्त 'महाबीज' च!
भेंडी
संकरित संशोधित
तन्वी
सुधारित वाण
अर्का अनामिका
दुधी भोपळा
संशोधित
ईश्वर
सुधारित वाण
सम्राट
गाजर
पुसा केसर
शिरी दोडका
संशोधित
ऐश्वर्या
सुधारित वाण
पुसा नसदार
महाबीज®
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
''महाबीज भवन'', कृषी नगर, अकोला - ४४४ १०४. फोन : ०७२४-२४५५०९३ फॅक्स : २४५५१८७.
Toll Free No. : 1800 233 8877, E-mail : homarketing@mahabeej.com, web.: www.mahabeej.com
महामंडळाचं महाबीज
तुमच्या विश्वासाचं बियाणं

Registered

RNI No. MAHMAR/2000/01270 पोस्टल रजिस्टर नं. PCW/031/2021-2023
Posted at BPC, Vishrambagwada, Pune 411030, Date of Publication: 01/07/2024 and Posting: 01 To 07/07/2024



कृषी विभाग टेलिग्राम चॅनेल | कृषी विभाग फेसबुक पेज | कृषी विभाग ट्विटर खाते | कृषी विभाग Whats App चॅनेल | कृषी विभाग इन्स्टाग्राम | कृषी विभाग वेबसाइड | कृषी विभाग यू ट्यूब चॅनेल

# टोल फ्री नंबर : 1800 233 4000

**शेतकरी :**
**जुलै २०२४**

प्रेषक

**संपादक**

शेतकरी मासिक, कृषी आयुक्तालय, समिती सभागृह, दुसरा मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५
दूरध्वनी : ०२० २५५३७३३१

**शेतकरी बंधूंनो**
त्वरा करा...
वर्गणी भरा!
पत्त्यावर
* असल्यास आपली वर्गणी एकच महिना शिल्लक आहे.
** असल्यास वर्गणी दोन महिने बाकी आहे.
*** असल्यास वर्गणी तीन महिने बाकी आहे.

**पोस्टमन बंधूनो**

**या पत्त्यावर वर्गणीदार मिळत नसेल तर हा अंक कृपया कृषि विभागाच्या संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालय/ मंडल कृषि अधिकारी कार्यालय किंवा नजिकच्या कृषि पर्यवेक्षक किंवा कृषि सहाय्यक यांच्याकडे द्यावा.**

भारत सरकार सेवार्थ

श्री. ____________________

____________________

____________________

__________ पिन क्र. __________

'शेतकरी' हे मासिक मालक, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक सुनील बोरकर यांनी आंनद पब्लिकेशन्स, १०६/१/ए, मुसळी फाटा, राष्ट्रीय महामार्ग नं. ६, धुळे रोड, धरणगाव, जि. जळगाव-४२५१०५, येथे छापून कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००५ येथे प्रसिद्ध केले. संपादक - पुनम खटावकर.

'Shetkari' monthly publication is owned by Govt. of Maharashtra, Agriculture Department, Printed and Published by Sunil Borkar, Printed at Anand Publications, 106/1/A, Musali Phata, National Highway No.6, Dhule Road, Dharangoan, Dist. Jalgoan-425105 and Published at Commissionerate of Agriculture, Maharashtra State, Krushi Bhavan, Shivajinagar, Pune – 411005, Editor – Punam Khatavkar.

**कृपया वाचकांनी शेतकरी मासिकाच्या प्रत्येक अंका बाबतचे बहुमोल अभिप्राय agrishetkari@gmail.com यावर पाठवावे.**